REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० ५ माहे आगष्ट सन १८७७ इ० | अंक ३१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. बरेच दिवस झाले मी आपल्याकडे पत्र पाठविलें नाहीं. हल्लीं परमेश्वराच्या कोपानें प्राणिमात्रावर दुष्काळाचे योगानें गुजरलेला कहर व झालेला गहजब यांसंबंधी खालीं लिहिलेल्या चार ओळी ( कविता ) पाठविल्या आहेत त्यांस आपल्या पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

इकडील भयंकर दुष्काळाचे योगानें कुटुंबांतील माणसें देशोधडीस लागलीं व तीं असें ह्मणतात कीं:—

श्लोक

ही जाउनी दुस्तर वेळ जेव्हां ।
एकत्र होऊं अवघेहि तेव्हां ॥
मानू अशी स्वीयजना स्वकीय ।
ऐसी असे वेळ वदून काय ॥ १ ॥

हा अनिवार व दुस्तर प्रसंग पूर्वींच घातक असा वाटत होता पण त्या प्रसंगास आज चांगलें ह्मटलें पाहिजे. कां तर तेव्हां पुढील पर्जन्यकाळाची उमेद होती, श्रीमान लोक दयाळुपणें : त्यनुसार गरीबांचा समाचार घेत होते आणि आमच्या कृपाळु सरकारची आपल्या दुष्काळ पीडित प्रजेस होईल तितकी मदत करण्याची गडबड सर्व प्रांतभर गाजून राहिली होती पण आतां सर्व विपरीत. जमीनीकडे पहावें तर पावसा वांचून:—

श्लोक

कांता जशी पतिचिया विरहें अतीव
होऊनि दीनवदना बहु कष्ट जीव ॥
पाहे तिचा तशिच हा! सुवसुंधरा हे ।
मेघें उपेक्षित विशोभित दीसताहे ॥ २ ॥

आणखी

हीच्यावरील लघु वाढिहि वृक्ष थोर ।
तैसीं सुरम्यहि गिरींद्र शिरें अपार ॥
हा! संप्रता दिसति रुक्ष भयाण सारीं ।
त्या हिंडतां वनिं न अल्पहि लभ्य वारी ३

किती ह्मणून लिहावें महाराजः—

दिसे न अश्वत्थनगासि पाला
तशींच बोंडीहि न साबराला
अशेष झालीं नरभक्षभेणें
कसें पुढें होईल कोण जाणे ॥४॥

ईश्वरी क्षोभाचा हा प्रकार झाला पण एवढ्यानेंच संपलें नाहीं. "संपत्ति मागून संपत्ति व विपत्ती मागून विपत्तीच येतात" ही गोष्ट सर्वांशी खरी आहे. महाराज, एवढा कनवाळु नृपश्रेष्ठही या वेळेस असा व्हावा काय ? हायरे दैवा!

श्लोक

कसा राजा झाला
कठिण समयीं या अदयसा।
अहा नेणे चित्तीं
जग जगविण्याला तरि कसा ॥
पहा ही दैवाची
गति बहु विचित्रा तरि किती
न भूतीवान् चित्तीं
द्रवति जरि दीनास बघती ॥ ५ ॥

वरील श्लोक वाचून आपणास वाटेल कीं कवितेस रम्यता आणण्याकरितां हा प्रकार लिहिला आहे पण "विष्णवेनमः" एवढ्या अल्प गोष्टीकरितां मी असें लिहिणार नाहीं हें पुढील लेखावरून ध्यानांत येईल. महाराज जेव्हां महसुलाचा वसूल करण्याचा क्रम सुरू झाला तेव्हां लोक—

साक्या

हाय ह्मणूनी धाय मोकलुनि
ह्मणती सदया राया,
कांहीं नाहीं आह्मा जवळी
छळिसी तरि कां वाया ॥ ६ ॥
तात राज्ञ तूं तवप्रजा ही
पुत्रासम तूं पाळी
पाही पाही अनाथ नाथा
दीन कसी ही झाली ॥ ७ ॥

आणखी हात जोडून पाया पडून असें ह्मणत कीं, हे राजेंद्रा—

साक्या

अंत उपेक्षी तात न रक्षी
अदयत्वें लघु बाळा
सांगा तेव्हां काय तपातें
विलंब न्याया काळा ॥ ८ ॥

अशी पुष्कळ प्रकारें विनंती केली पण—

साक्या

कोण परिसतो परि तद्वचना
कोण दिनाचा वाली ?
आहे भूवरि सांगा सदया
गति कैसी हे आली ॥ ९ ॥

श्लोक.

ध्याया क्षेत्र करा घरांत शिरती
पात्रें गुरें काढिती ।
ओढीती वसनें तशींच असनें
कांहीं न त्या ठेविती॥
तेव्हां ते अति दीन दुःखितपणें
विश्वंभरा बाहती
येरे बा सखया दयार्द्रह्रदया
धावे अतां मापती ॥ १० ॥

दिंड्या.

नको पाहू अंत बा लोक पाला
भक्षिताती नर पशूसदृश पाळा
तारि तारी या दयाब्धे अनाथां
धाव पाव सत्वरी जगन्नाथा ॥ ११ ॥
मेघ, राज्ञ, दैव, हीं कोपलीं कीं
एकसमयीं हीं कसीं बा विलोकी
दया करुनिया तारि दिना आतां
किती बघसी अंत हा विश्वताता १२

सूर्य किरणांच्या तापानें उगवलेलीं धान्यें करपून चाललीं हें पाहून लोक ह्मणूं लागले, देवराया, काय हा कोप —

श्लोक.

करीं दिनमणी तपे करित शुष्क सस्यांकुरा
वदे जनकदंब तें बघुनि होऊनी घाबरा
वदान्यजनसद्गुरो प्रभुवरा कसा कोपसी
स्वसूनुवरि होउनी अदयसा अहा मानसीं! १३

पुन्हाः निरभ्र आकाशाकडे पाहून

अहा! जलधरा कसा धरुनि राग बा अंतरीं
अनापकृतिचा क्षमीं सदय तूंहि भूमीवरी ॥
न वृष्टि करिशी उगा बघत राहतोसी नभीं
वदान्यवर तूं कसा अपुलिया ब्रिदाला न भी
॥ १४ ॥

वर लिहिलेला दुष्काळाचा प्रकार इतका संक्षेपानें लिहिला आहे कीं, ज्यानें एथील त्या लोकांचे हाल दृष्टीनें पाहिले आहेत व अन्नाकरितां ते लोक तळमळून, लज्या सोडून, दीनवाण्या शब्दानें कसे भीक मागत फिरतात, व त्यांचीं शरीरें कशीं गेडलीं आहेत आणि तोंडावर मृत्यूची कळा कशी आली आहे, तसेंच अन्न न मिळणाऱ्या झाडाचा पाला आणि निबडुंगाचीं बोंडें ह्यांजवर त्यांच्या आधाशासारख्या झुंडीच्या झुंडी कशा चालल्या असतात हें ज्यांस माहित आहे त्यानें जर हें वाचलें तर तो ह्मणेल कीं, " या लिहिणारास दुष्काळ कसा आहे तो चांगला माहित नाहीं. आणि लिहिलेल्या वर्णनांत खऱ्या स्वरूपाचा शतांशही साधला नाहीं." सारांश हा प्रकार वर्णनशक्तीच्या पलीकडचा आहे, त्याचें साधारण स्वरूप असें आहे कीं :—

श्लोक

दे दुर्बलासि भय शत्रुकृपाणधारा ॥
कीं सादृशा जलधराप्रति चंड वारा ॥
दुष्काळ घोर बघुनीं ममचित्त भारी ॥
कांपे तसे पळतसे जनचक्रवारी ॥१५॥

तात्पर्य दिवस फार कठीण आले आहेत. आतां अशा प्रसंगीं मजसारख्या गरीबांची स्थिति कशी असेल याचा अनुमान आपणच करावा व आमची दयाळु सरकारास पुनः पुन्हा हीच विनंती आहे कीं,

श्लोक

केलें जसें आजवरी दयाळा ॥
संपाळना तेवि पुढें कृपाळा ॥
हस्तीं करा आणिक व्हा दिना या ॥
तारू कठीण समयांतुनि पार न्याया १६

मुक्काम कोतूळ ता. ३०।७।७७ इ० } आपला क्ष

---

## वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ११ शके १७९९

## WHICH SHOULD BE THE SADAR STATION OF BERAR, AKOLA OR OOMARAOTI?

In replying to the above qnery men will be found to differ in their opinion, as naturally they should, some putting forward the claims of Akola, others urging those Oomeraoti, for being made the Sadar seat of the Province.

We devote a few columns of our today's issue to the consideration of this question as it is desirable "to strike while the iron is hot." We, for one, side with the former class of people named above, and, in so doing, believe that we are but giving an expression so what the generality of the population of the Province would wish in fairness to themselves and the rest of their fellow-bretheren. Subjoind are a few of the most important reasons that weigh with in deciding once for all, as said above, in favour of this town in preference to Oomeraoati, which, if looked upon with an unbiassed soul, will, we are sure, make any one see the truth of what we say. Those reasons are the following:—

Firstly : The District of Akola is more thickly populated, if we mistake not, and at the same time, more heavily worked than any in the Province. If so, it needs no sage to tell us that that district which monopolises the greater portion of the work will in all probability, have more occasions too to deal with the Sadar Courts than the one which is comparatively less worked; and therefore one would naturally wish that they should be among those people that have to deal with them most. By making Oomaraoti the Sadar station, the people of this district, and also those of Buldhana and Bassim which too, we belive, do not yield the palm in point of work to the districts of East Berar, perhaps with the exception of Oomaraoti, will be put to great in-

-convenience in having to go to this latter place, every now and then, for business with the Sadar Courts; whereas it will be a great comfort to East Berar where there is on the whole less work than that in West. And no Government ( we need not doubt the assertion ) will look to the ease and comfort of those who have least to do with the Courts at the expense of the Community which has most to do with them. Thus viewed Akola seems to have a greater claim than its rival.

Secondly: Berar stretches lengthtwise from Khandesh in the West to the Wardha on the East, a distanee of 150 miles, while its breadth averages 144. It is therfore very desirable that the place which will be made the Sadar station of the Province should lie equally between its eastern and western boundaries, as also between its north and south; that is, at a distance of 75 miles from one end, east or west, and 72 miles from the north or the south. Although it may be very difficult to find a good place that will exactly fulfil the above requirements, still, in its absence, it is better to select one which will be more at the centre of Berar than any other. Let us see this with respect to the two rival claimants, Akola and Oomaraoti. Taking the first as the centre we find that Berar stretches about 80 miles towards the north; 64 towards the south; 74 towards the east; and 76 towards the west. Transferring it to Oomaraoti we get the figures of 36, 112, 20, and 130 miles respectively. These figures speak for themselves, and at once strike the balance in favour of Akola, and we do not wish to dilate any more on this important point, as being unnecessary.

It may be urged, as a reason to the contrary, that the railway communication which is open to Oomaraoti will enable men as well to go to and come from that town as to Akola, but we meet the opposition by saying only that the branch line which runs from Badneira to Oomaraoti causes a delay of nearly 3 hours, and that the whole journey is sure to entail more expense, say to the people living on the arthest extremity of the Malkapore Talooka in the Buldhana District, than their journey to Akola, which former they cannot be able to undertake every now and then for business with the Sader Courts. Viewed in this light too, Akola seems to be a better place, in our opinion, than Oomaraoti.

Thirdly: The camp of Oomaraoti does not appear, as is admitted even by those whose opinions with regard to the subject will carry more weight than ours, to equal that of Akola, much less to surpass it. In the first place it is not as healthy, as we hear it reported, as the camp here. Again it has not got as many public buildings as the Town Hall &c., and private quarters for European officers as we have, and it is at a distance of about 3 miles from the town, which causes no small trouble to all Gov't-servants as well as to those who have to deal with them That the camp here is very healthy may be seen from the fact that no death occurred within its limits during the prevalence of the last epidemic, whereas if we remember rightly, we can name two deaths of Europeans that occurred at Oomaraoti at about the same time, and owing to the same cause. But it has been said that the medical returns of Akola show greater numbers of people attacked by diseases than those of Oomaraoti. Certainly. But we have to say in explanation of this that the true fact is quite the reverse. The people of Oomaraoti are more prejudiced and orthodox than we, and very few frequent the Dispensaries and Hospitals, preferring their native Hakims and quacks to those appointed by Government, remarks to which effect are, we believe already to be found passed by medical authorrities on the dispensaries thereof, while people from all quarters pour into Akola, men on business, as well as the infirm and sickly to repair their lost health, which is the main reason to which is to be ascribed the fact so plumed upon by the advocates of Oomaraoti. Similarly it has been affirmed that there occur more deaths in the Akola jail than that of Oomaraoti. This objection will be seen to lose all its importance when it is remembered that the jail here being a central jail, which Oomara-oti jail is not, there are in it prisoners who were sentenced when the Province was administerd by the Nizam, that is before the year 1853; and as it is now 24 years they have been first sentenced, it is no wonder that they should approach the verge of their earthly existence and should breathe their last. If any one takes the trouble of seeing who those prisoners are who die in the jail here, he will, we think, invariably fiind that the majority of them are as old as the year mentioned above, or even more. As facts are facts, we cannot for a moment suppose that, with the explanation given above, any body will attach much significance to the objections shown above, which are merely sham, and not worth the notice of the Government at all.

Fourthly: — As it has been reported that the offices of the Inspector General of Police, and of the Registration are soon to be abolished and incorporated with others, there remains only one Sadar Kutcherry, that is of the Commissioner of the Province, and we hope, that for reasons stated in our second para and as being nearer to Bombay too, he will not hesitade at all to come here with all his office.

If it so happens Government will have to erect one new building only; whereas if Oomaraoti be made the Sadar station, the offices that will have to go there are the following: — 1. Judicial Commissioner's office; 2. The Sanitary Commissioner's office; 3. The Director's office; 4. The Inspector's office; 5. The High School If the two High Schools are disallowed by the Resident, 6. and lastly, The Training College.

Most of these offices and institutions will have new buildings to be erected for them at a great cost to Government, and the money already spent on buildings that accommodate them here, at present, will be so much money thrown away. So financially too Akola is desidedly a better place than Oomaraoti; and we anxiously hope that Government will at once respond to the call of the Akola-Wallas, and turn a deaf ear to the representations of those who have set up a rival to Akola in the Sister town of Oomraoti.

We have already written once in Marathi on the subject as the earnest of a long series of writings, and this is the second time that we have handled it. We hope, therfore, that these few reasons now shown, will be sufficient for our present purpose, which is to convince Government of the advisability of making Akola the Sadar station. We could mention a host of them, but want of space precludes our doing so. However, in taking leave of our readers, we promise to visit them again, if required, and before concluding, earnestly request our worthy Commissioners and the Resident, that they will duly weigh all the *pros* and *cons* and promulgate their final decree, which has held every one in suspense since a long time past, in a way as will tend to the health, ease, and comfort of the most of the natives in the Province as well as, no insignificant thing, of the European officials who wield the helm of power in Berar.

While writing the above we read in the Bombay Gazette a letter from a Badneira corespondent to the paper, in which he says that it has been decided that Oomraoti will be the Sadar station, and that the fate of Akola has therefore been sealed for ever; but as nothing of the sort has come to our ears, we cannot give any credence to it, and we shall be well pleased if, after all, it will turn out to be nothing mere than a more rumour, which we hope, it is.

---

## हैदराबादचे पठाण.

हैदराबादेस पठाण लोकांचें प्राबल्य बरेंच आहे हें सर्वांस माहित आहे. त्यांचा प्रवेश त्या दरबारांत सन १७६१ त झाला. त्या काळीं मराठे, टिपू सुलतान वगैरे यांच्याशी लढाया करण्याच्या कामीं निजाम सरकारास त्यांचा फार उपयोग झाला. ते मनाचे थोर, संपत्तिमान आणि बाके शिपाई असल्याची प्रसिद्धी आहे. निजाम सरकारांत सुनी जातीचे मुसलमानही बरेंच अधिकारविभूषित आहेत. आणि या दोन जातींत परस्पर प्रेम नसून हमेशा भांडणें होतात व रमजानमध्यें बहुशा गर्दी झाल्यावाचून रहात नाहीं अशीं कित्येक उदाहरणें ऐकण्यांत आहेत.

सन १८७६ च्या जानेवारी महिन्यांत हैदराबादेमध्यें मकामशीदींत सरकारचे पारशी आणि आरबीचे शिक्षक यांस एका पठाणानें भयंकर रीतीनें ठार मारिलें. त्यावेळेस शहरांत अतिशय गडबड झाली व कित्येक लोक प्राणास मुकले. दिवाण साहेब सर सालरजंग त्यावेळीं मुंबईस युवराज प्रिन्स आफ वेल्स यांच्या भेटीकरितां गेले होते ते परत आल्यावर त्यांनीं मोठ्या प्रयासानें व युक्तीनें गडबड शांत केली व पठाण लोकांस कांहीं दिवस शहरा बाहेर काढून लाविलें. पठाणांची संख्या थोडी व बाकीच्या मुसलमान लोकांशीं त्यांचें वैर ह्मणून बच्यावाकरितां दुसरे ठिकाणीं तुह्मास पाठवितों असें सांगितल्यावरून ते शहर सोडण्यास कबूल झाले. व सर्व पठाण लोकांस शहराच्या उत्तरेस २० कोसांवर लालगढी ह्मणून गांव आहे तेथें पोंचविलें. एका मनुष्या करितां सर्व पठाण जातीस हें शासन झालें पण त्यांनीं निमुटपणें कबूल केलें. हैदराबादेबाहेर सहा महिने पावेतों रहाण्याची त्यांस पहिल्यानें मुदत ठरवून दिली होती. ती संपल्यावर त्यांनीं सरकारास विचारिलें तेव्हां दिवाण साहेब विलायतेहून परत आल्यावर हुकूम मिळेल असें त्यांस कळविलें. दिवाण सा. परत आल्यावर त्यांनीं अर्ज केला तेव्हां निजाम सरकार दिल्लीस गेले आहेत ते परत येऊं द्या असा त्यांस जबाब मिळाला. पुढें निजाम सरकार आल्यावर त्यांनीं कित्येक अर्ज केले पण दिवाण साहेब त्यांकडे लक्ष्य पुरवित नाहींत असें पाहून त्या पठाण लोकांपैकीं बदनखान, दौलतखान वगैरे प्रमुख प्रमुख सरदार बिगर परवानगी येऊन शहरांत वस्तीस राहिले. पुढें थोड्याच दिवसांत एक सुनी जातीचा मुसलमान एका पठाणाकडून मारला गेला व त्यानें या सरदारांचा पाठंबा केला असें समजतांच दिवाण साहेबाकडून बदनखान व दौलतखान इत्यादिकांस हुकूम झाला कीं, खुनी मनुष्य तुह्मी सरकारचे स्वाधीन करावा किंवा पुन्हा शहरची वस्ती सोडून लालगढीस जाऊन रहावें. त्यांनीं दोहोंतून एकही गोष्ट मान्य केली नाहीं. आणि दिवाण साहेबास सांगितलें कीं, आमचे वडिलांनीं सुमार वीसलक्ष रुपये तुमचे जवळ ठेव ठेविलेले आहेत ते आमचे आह्मांस द्या, ह्मणजे आह्मी तुमचा मुलूख सोडून दुसरे कोठेंही सुखवस्तीस जाऊन राहू. दिवाण साहेबांनीं यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. असें ह्मणतात कीं, हे लोक शांत व कायदेशीर आहेत आणि निजाम सरकारास त्यांहून चांगली प्रजा मिळणार नाहीं. परंतु त्यांच्याशी दिवाण सा

हेवाचें हल्लीं जें वर्तन झालें आहे त्यावरून लोकांत थोडी नाराजी उत्पन्न होईल असें दिसतें. पठाण लोक ह्मणतात कीं, आमचा निकाल करावा व आह्मांस काढून टाकावें त्यास आह्मी खुशी आहों. पण तसा प्रकार होणें कठीण दिसते. आतां पुढें कसा काय निकाल होतो पहावें. शांतता रहावी अशी आमची फार इच्छा आहे.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत अकोल्यास पाऊस बिलकूल पडला नाहीं. तीन आठवडे एथें पाऊस नाहीं त्यामुळें त्याची पिकास फार जरूर आहे. दुसऱ्या जिल्ह्यांतून या आठवड्यांत बराच पाऊस पडला. व अकोल्याचे आसपासही आहे व नदीलाही फूटभर पाणी आलें होतें ह्मणून एथेंही पाऊस लवकरच पडेल अशी आशा आहे.

हैदराबादेकडे पावसाविषयीं फार बोभाटा होता तिकडेही चांगला पाऊस पडला तसेंच सोलापुर, पुणें, कर्नाटक, नाशिक वगैरेकडे व मद्रास इलाख्यांत पुष्कळ ठिकाणीं पाऊस पडल्याची वार्ता आली. आहे तेणेंकरून आह्मी आनंद मानून इश्वराचे उपकार स्मरतें.

इंदुरास श्रीमंत होळकर• सरकार सर्व शहरवासी सुमार १५००० लोकांनिशी ईश्वराची प्रार्थना करण्यास गावाबाहेर कोसभर गेले होते. व तेथें त्यांनीं शेतकऱ्याप्रमाणें स्वतां नांगर हाकला व त्यांच्या राणी साहेबांनीं त्याना शेतकऱ्याच्या बायकोप्रमाणें न्याहारीची भाकरी फडक्यांत बांधून डोकीवर घेऊन जाऊन दिली. व दिवसभर सर्वांनीं ईश्वराची प्रार्थना केली व तेणेंकरून पाउस पुष्कळ पडून सर्व लोक भिजत माघारी आले असें समजतें.

साऱ्या वऱ्हाडचें सदर स्टेशन कोठें असणें योग्य आहे याविषयीं जून महिन्यांत आह्मी लिहिलें होते व आज इंग्लिश भाषेंतही या संबंधानें एक निबंध आहे त्यांत कांहीं विचार जास्तो असलेले आह्मी आपले महाराष्ट्र वाचकांकरितां पुढील आठवड्यांत घेऊ. आमची आशा आहे कीं, हे दोन्ही लेख पाहून व त्यां विषयीं चांगला विचार करून उभयतां कमिशनर साहेब व रेसिडेंट साहेब यांची खात्री होईल कीं सदर स्टेशन अकोल्यासच असणें सर्वोपरि योग्य आहे.

मि० म्याकिंटाश साहेब यांस आक्टोबर अखेर पावेतो सहामहिन्यांची निमे पगारावर रजा मिळाली आहे सबब त्या जागेवर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम ए. अकोला हायस्कूलचे फर्स्ट असिस्टंट मास्तर यांस नेमावें अशी डायरेक्टर साहेबानीं शिफारस केली होती ती मंजूर होऊन आली असें समजतें. ही नेमणूक लोकांनीं इच्छिल्याप्रमाणेंच झाली हें पाहून सर्वांस संतोष होतो. महाजनी यांचे जागेवर रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बि. ए. यांस तूर्त नेमिलें व त्यास निमा पगार रुपये ८७॥ मिळणार असें समजतें. रा. रा. विष्णुपंत उदयीक एथून जाणार. असे विद्वान व सुशिल गृहस्थ एथून जाणार हें अकोल्याचें दुर्भाग्य होय.

कमिशनर साहेब सिमल्यास गेले आहेत तिकडील त्यांचें काम संपलें नाहीं सबब सुमार आणखी महिनाभर ते येत नाहींत असें ह्मणतात. त्यांचे क्लार्क रा. रा. केशवराव जयकृष्ण या आठवड्यांत पुन्हा येथें आले आहेत.

पोलिसचे इन्स्पेक्टर जनरलचें काम हल्लीं मे० लेन साहेब पाहताहेत त्यांसच १५०० रुपये पगार करून तुरुंगाच्या इन्स्पेक्टर जनरलचेंही काम त्यांकडे द्यावें असें ठरत आहे. पण कोणी ह्मणतात कीं ले० क० मेंजिस साहेब उमरावतीच्या स्माल काज कोर्टाचे जडज यांजकडील रेजिस्टर जनरलचें काम निघावयाचें आहे व तसें झाल्यानें त्यांचा ६०० रुपये पगार कमी होईल व त्यांची नोकरी लेन साहेबाचे आधीची आहे सबब त्यांसच इन्स्पेक्टर जनरलची जागा देतील. व असेंनच झालें तर मेंजी साहेबास डिपुटी कामिशनर तरी करितील.

हैदराबादचे असिस्टंट रेसिडेंट मेजर स्मिथ साहेब याचा गेले महिन्यांत विवाह झाला.

मि० हाबसन साहेब येथिल असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट यांस हैदराबादेस पोलिसींत जागा पतकरता काय असें विच्यारिलें आहे.

यवतमाळ—तारीख १ आगष्ट—इकडे पेरण्याचें काम बहुतकरून झालें कांहीं दिवस पर्जन्य नव्हता पण या पंध्रवड्यांत फार चांगला पाउस पडला व रोज येकादी सर येतेच.

अकोल्यास दिवसानुदिवस धान्य महाग होऊन तें गरीबगुरिब लोकांस मिळण्यास फार पंचाईत होऊं लागली व किसेकांचा उपासमारा होण्याचा बेत आला असें पाहून मे० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं व्यापारी व इतर लोकांस जमा करून बोध केला व अतिशय श्रम करून सुमार ५०० रु. वर्गणी जमविली व स्वस्त दरानें विकण्याचें एक धान्याचें दुकान कमिटीकडून सुरू केलें. बाहेर सतरा अठरा पैशानीं पायली जोंधळे मिळतात आणि या दुकानीं बारा पैशानीं पायली दिले जातात. येणेंकरून जो तोटा होईल तो जमविलेल्या पैशांतून भागाविणार व गरज लागल्यास जास्ती खटाट करणार. या दुकानावर मजूर, गरीब व निकृष्ट प्रतीचे लोक यांस मात्र धान्य एक दिवसा पुरतें मिळतें व तें त्यांस मिळावयाकरितां पास दिले आहेत व दुकानावर पोलिसाचा बंदोबस्त ठेविला आहे सुमार दीड खंडी धान्य दररोज विकलें जातें. गरिबास येणेंकरून मोठी मदत झाली आहे सबब ते या कामास सहाय करणारे सर्व उदार गृहस्थांस व प्रवर्तकांस ईश्वराजवळ आशीर्वाद मागतील.

सन १८७७चा अक्ट १ विशेष न्यायाचा कायदा व सन १८७७ चा अक्ट ३ हिंदुस्थानांतील रेजिस्ट्रेशनचा आक्ट हे दोन्ही वऱ्हाडास लागू केल्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा जुडिशियल खात्याकडील जाहिरनामा नंबर ७७ जे ता. २७ जून सन १८७७ चा प्रसिद्ध झाला आहे.

कोणतीं कंत्राटें कोणत्या आफिसराकडून होत जावींत या विषयीं हिंदुस्थान सरकारानें आपलें होम डिपार्टमेंटकडील जुडिशियल प्रोसिडिंग नंबर ९८९ तारीख २३ जून सन १८७७ चें याजमध्यें ठराव केला आहे त्यांतील जी कलम वऱ्हाडाविषयीं आहे तें असें:—

साधारण कंत्राटें— रेसिडेंट, फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट, कमिशनर आणि डिपुटी कमिशनर यांनीं देत जावीं.

पब्लिक वर्क्स खात्याकडे लागणाऱ्या सामानाची कंत्राटें— पब्लिक वर्क्स खात्याचा हेड सुपरइंटेंडिंग इंजिनियर यानें आणि जिल्ह्या जिल्ह्याचे एक्झिक्युटीव इंजिनियर यांनीं देत जावीं.

पोलिसाकडे कापड वगैरेची कंत्राटें— पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल यांनीं देत जावीं.

तुरुंगाकडे लागावयाच्या सामानाची कंत्राटें— तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल यांनीं देत जावीं.

सिकंदराबादचा नेटिव डाक्टर जानकी प्रसाद कामास नालायक ह्मणून काढून टाकिला व त्याचे जागेवर मि. टी रा इटस माजी असिस्टंट अपाथिकारी यांस नेमिलें.

मि० पुरुषोतमराव नारायण मलकापुरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस दिवाणी व फौजदारी अधिकार मिळाला तो:-

पाचहजार रुपये पर्यंत दिवाणी दावे पहावे.

क्रिमिनल प्रोसिजर कलमें २०, २२, २४, २६ आणि २७ प्रमाणें. तुकडी ए १, ६, ७ शिवाय करून फौ. काम पहावें.

मि० बाकरअली वाशिमचे आफिशिएटिंग तहशिलदार यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचे कलम २३ यांतील तुकडी ३ खेरीज करून बाकीचे अधिकार दिले.

वऱ्हाडांत कापसाचा पेरा किती जमिनींत झाला त्याचें टिपण.

| | | |
|---|---|---|
| अमरावती | ४८१६३० | एकर |
| वणी | २७५७७८ | ,, |
| इलिचपुर | २१०१३० | ,, |
| अकोला | ५६११४९ | ,, |
| बुलढाणा | २८२६४५ | |
| वाशिम | १२०५७२ | |

मे महिन्यांत सर्व प्रकारच्या रोगानें वऱ्हाडांत ३६२६ पुरुष व ३३३२ स्त्रिया मिळून ६९५८ मनुष्यें मरण पावलीं.

वऱ्हाडांतून या ७।८ वर्षांत कापूस बाहेरप्रांतीं किती गेला त्याचें टिपण:—

| साल | गड्ठे. |
|---|---|
| सन १८६९—७० | १७११६४ |
| १८७०।७१ | २०५२९३ |
| १९७१।७२ | १४८३६३ |
| १८७२।७३ | २०४६०९ |
| १८७३।७४ | २६१९२० |
| १८७४।७५ | २७४४४४ |
| १८७५।७६ | २१५००१ |
| १८७६।७७ | २८०४३४ |

यावरून दिसेल कीं, सन १८७४।७५ सालीं चांगलें पीक आलें होतें त्यापेक्षां ही सालगुदस्त अधिक पीक येऊन सुमार ६०००० गड्ठे अधिक गेले. एक गठ्ठा २०० पक्के शेराचा असतो.

येत्या बुधवारीं इचलकरंजीकर नाटकवाले युरोपियन स्त्रिया व पुरुष यांकरितां एक स्वतंत्र खेळ करणार आहेत. व पुढील शनिवारीं "कामेडी आफ एरर्स" नावाचें जें शेकसिपयरचें गमतीचें नाटक आहे तें मराठींत करणार आहेत. त्याचा तरजुमा एथील चांगल्या विद्वान गृहस्थानीं त्यांस करून दिला आहे व तसा रसाविर्भाव रंगभूमीवर उतरला तर तें नाटक फारच मनोरम होईल यांत संशय नाहीं.

वाशिम ता. १ आगष्ट— या आठवड्यांत तीनच्यार पाऊस चांगले पडले तेणेंकरून सर्वांस आनंद झाला आहे— तापाची सांत गावांत थोडी सुरू झाली आहे— मि० चार्लस डेपुटी कमिशनर आफिसांतील क्लार्क याजवर कलम ३५३ प्रमाणें गुन्हा शाबीद होऊन त्यास ५० रुपये दंड झाला— मंगरूळास एका मुसलमानानें एका रजपुतिणीचा ता. २७ माहे गुदस्त रोजीं खून केला त्याच्या चौकशी करितां मे० ताजुदीन साहेब गेले आहेत. खुनी मनुष्य वेडसर आहे— म्युनिसिपल सेक्रटरी यांनीं बिगर हुकूम २२०० रुपये खर्च केले असा बोभाट आहे. व त्याजबद्दल रा. रा वामनराव बाळाजी, रा. रा. शंकराव राजेउदाराम, व रा. रा. पांडुरंग विनायक या मेंबरानीं हिशेब तपासून रिपोर्ट केला आहे. त्यांत काय आहे तें अजून बाहेर पडलें नाहीं.

मलकापुर ता. १ आगष्ट— दोन महिने पाऊस नाहीं. लोक हवालदील झाले आहेत. पेरे वाळत चालले आहेत. जवारीचा भाव ८५ पासून ८९ रुपये पावेतो चढला आहे. गोरगरिबास धान्य स्वस्त दरानें मिळावें ह्मणून परोपकारी लोकांनीं रु. ८०० जमा करून एक दुकान मांडेल आहे. एकस्ट्रा असिस्टंट, तहशिलदार व हेडमास्तर यांनीं या कामीं फार मेहेनत घेतली. त्या हाकिकतीचें पत्र आलें आहे तें पुढें घेऊ.

## वर्तमानसार

उसमान पाच्छाचे हाताखालील फौज सोमवारीं सारादिवस प्लेव्हना येथें रशियना बरोबर लढत होती. रशियन लोक ६०००० होते.

गोव्याचा जनरल काळजांतील रोग होऊन २४ वे तारखेस मरण पावला. याचें वय ६७ वर्षांचे होतें व हा फार लोकप्रिय होता.

सर लुइ पेली अक्टोबर महिन्यांत बिलायतेहून परत येणार. काबुलसंबंधी गवरनर जनरल साहेबांच्या कोणत्याही बेतास आपलें अंग होतें किंवा काबुलांत इंग्लिश रेसिडेंट ठेवण्याविषयीं आपण आग्रह धरिला होता असें मुळींच नाहीं ह्मणून विलायतेकडील वर्तमानपत्रांतून त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

मि. नाना मोरोजी यांजकडील जुडिशार्क रघुनाथ सदाशिव जयकर यांस गोंडल संस्थानांत फलपावर माजिस्ट्रेट व मुनसफ नेमिलें.

मि. टाड रत्नागिरीचे असिस्टंट कलेक्टर ज्यांनीं आगबोटींत एका हिंदु गृहस्थास चाबकानें मारल्याबद्दल ५० रुपये दंड भरला. त्यांविषयीं सरकारानें ठराव केला कीं त्याची वर्तणूक फार दांडगेपणाची होय, व त्याला तेथून बदलावें.

हिरातचा जनरल हसन अलीखान व दुसरा एक गृहस्थ टर्कोमान खान यांनीं शियर अलीच्या हुकुमावरून ४०००० स्वार जमा केले आहेत व ते अमीराचे हुकुमाची वाट पाहून आहेत.

बंगाली आफूच्या ४००० पेट्या ता० ४ जुलैस विकल्या. त्याचे ४९९९४७५ रुपये आले. हे अजमासाहून ३६७४७५ रुपयांनीं जास्त आले. आजपर्यंत एकंदर १६००० पेट्या विकल्या गेल्या. व त्याचें उत्पन्न १९८८६०५९ रुपये झालें. यावरून सरासरी दर पेटीस १२४२८७५ रुपये आले असें समजतें.

मुंबई इलाख्यांतील कापूस खात्याच्या चीफ इन्स्पेक्टरची जागा कमी करणार,

तुर्की लोकांनीं मेडाईसचें ठाणें सोडून दिलें व तें रशियानें आपलें हस्तगत केलें

याकुबखान मरण पावला असें वर्तमान आलें आहे.

अमेरिकेंत रेलवेकडील मजूर लोकांनीं मोठा दंगा मांडला आहे व त्याकरितां चहोकडे फौजांची तयारी त्यांवर झाली आहे.

मद्रासमेल नामक पत्रांत लिहिलें आहे कीं सन १८७३ सालीं बंगाल इलाख्यांत दुष्काळ पडला होता तेव्हां मद्रासेकडून तिकडे १०५००० रुपये वर्गणी करून पाठविले. व बंगाल्याकरितां एकंदर वर्गणी २८२६६९० रुपये झाली. इंग्लंडाहूनही १४६५००० रुपये धर्मार्थ आले. आणि या वर्षीं मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडलेला आहे तर कोणासच कांहीं मद्रासेकडे पाठविण्याविषयीं बुद्धी होत नाहीं. ही केवढी दुःखाची गोष्ट आहे. मद्रासेनें काय पाप केलें? विलायतेहून लेडी होबर्ट ( माजी ग. सा. च्या पत्नी ) यांनीं फक्त १००० रुपये पाठविले. चवदा लक्ष कोठें आणि हजार कोठें ?

बेळगाव धारवाडाकडे बैलांच्या बदला माणसें गाड्या ओढून नेऊं लागलीं याजबद्दल सरकारानें संतोष प्रदर्शित केला आहे. सरकार ह्मणतें, लोक उगीच आयधी बसून उपाशी मरतें त्या पेक्षां याकामाकडे त्यांचा कल लागला येणेंकरून बहुत लोकांस पोट भरण्यास हे नवें साधन होईल. व त्यास मदत करण्याकरितां सरकारानें ठराव केला आहे कीं मनुष्यानीं ओढून न्यावयाच्या गाड्यांवर दस्तुरी घेऊं नये. व त्यांच्या संरक्षणाकरितां पोलिसही जास्ती ठेवण्याचा ठराव झाला आहे.

उत्तर हिंदुस्थानांत धान्याचा पुरवठा कोणत्या प्रकारचा आहे, ह्या संबंधानें दि. म्या. कर्ते ह्मणतात कीं तें धान्य दक्षिण हिंदुस्थानांत नेल्यास दुष्काळ समूळ नाहींसा होईल. तर आमच्या सरकारानें तिकडून धान्य रेलवे भाड्याचे माफीनें इकडे आणण्याची लवकर तजवीज केल्यास फार बरें होईल. दी. बं.

धुळें या आठवड्यांत तारीख २५।२६ रोजीं बराच पाऊस पडला.

अजम रामचंद्र बनाजी नगरचे नाझर यास रावसाहेब आबाजी बळवंत भिसे यांचे जागीं भुसावल एथें तूर्त से. स. जज्य नेमिलें. आ. व.

गेले रविवारीं रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांनीं मुंबईस आर्यसमाजांत “ कलियुग” या विषयावर सुंदर व्याख्यान दिलें.

रजपुताना रेलवेचें काम सुरू झालें.

शंभुचंद्र नंदी बंगाल्यांतील एक तरुण बाबू औषधक्रियेचा अभ्यास करण्याकरितां विलायतेस गेले.

नामदार सर रिचर्ड टेंपल साहेब काठेवाडांत राजे लोकांचा परिचय करून घेण्याकरितां या महिन्यांत जाणार आहेत.

सर माधवराव बडोद्याच्या संस्थानांत पाठबंधाऱ्यांचीं कामें करण्याकरितां ८९ लक्ष रुपये खर्चीं घालणार आहेत.

तुर्कस्थान देशच्या संबंधानें पारीस शहरांतील ज्या उंच घराण्यास विशेष काळजी वाटते त्यांनीं माजी सुलतानाचे दागदागिने व जडित जवाहीर यांच्या तारणावर २० लक्ष रुपये बिनव्याजी गादीवर असणाऱ्या सुलतानास उसनवार दिले.

महाराणी साहेबांस हिंदुस्थानांतील शाली फार आवडू लागल्या आणि ४०००० रुपये किमतीची एक नवी शाल करविण्याचा त्यांचा बेत झाला आहे.

वकील लोकांची दशा— बेलारी व कर्नूल जिल्ह्यांत खालच्या कोर्टांतील वकिलांस काम नसल्यामुळें कितीएक वकिलांनीं धंदा सोडून पंचवीसपासून तीस रुपयापर्यंत जागा पतकरल्या व कितीएक दुष्काळापीडितार्थ नवीन काढलेल्या कामावर मजुरी करण्यास जाऊं लागले. ई. प्र.

मुंबईस बोरीबंदर स्टेशनाजवळ जी. आय. पी. रेलवेचें सरते शेवटचें स्टेशन बांधण्याचें काम लवकर सुरू होणार. या इमारतीस सुमारें २३००००० रुपये खर्च होणार आहे.

बाबू सत्येंद्रनाथ टागोर सी. एस. यानीं आपलें कुटुंब व मुलें विलायतेस विद्याभ्यासाकरितां पाठविलीं.

कांहीं दिवसांपूर्वीं मद्रासेंत एक मनुष्य नदीवर स्नानास गेला असतां बरोबर असलेला हातरुमाल नदींत धुवावयास लागला तों त्याचे एका शेवटास गांठ होती ती गांठ सोडून पहातां त्यांत एक हजार रुपयांची नोट होती. ती नोट पाण्यानें भिजून अगदीं खराब होऊन निरुपयोगी झाल्यामुळें ती तो पाण्यांत कुसकरून पिळून गेला, व आपली १००० रुपयांची नोट व्यर्थ न जातां ती आपण खाल्ली असें सुख मानून घरीं आला.

काबूल एथें वर्तमानपत्रांस बातम्या लिहिणाऱ्या तिघांजणांस पकडलें असून त्यापैकीं प्रत्येकास निरनिराळ्या शिक्षा दिल्या आहेत. एकास तोफेचे तोंडीं, दुसऱ्यास फाशी व तिसऱ्यास शिर उडविणें अशा शिक्षा दिल्या आहेत. ने. ओ.

नगर— गेले २३।२४।२५ तारखेस या जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांतून कित्येक गावास बराच पर्जन्य पडल्याची खबर समजते. यासालीं पर्जन्य जो पडत आहे तो खंडवृष्टीनें पडतो. न्या. सिं.

---

## नोटिस

नोटिस बेशुमी राघोभट बिन शिवराम भट जोशी रहाणार मौजे पळसो खुर्द प्रगणे मूर्तिजापुर तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, आह्मी तुमची जवारी खंडी ५० दर ८ रुपये प्रमाणें आश्विन शुध्द ७ सन १८७६ इसवीला ठावून विकत घेतली असून त्याचा तपशील असा:—

२५ खंडी रंगराव विठ्ठल जहागिरदार बाबुळगावकर मार्फत मानाजी पाटील शहापुरकर.

२५ खंडी जवारी तुमची खुद्द जातीची

——

५०

या पन्नास खंडीपैकीं वसूल मानाजी पाटील याजपासून जहागिरदाराबद्दल २५ खंडी व तुह्मापासून घरगतीबद्दल २०। खंडी येकूण ४५। सवापंचचाळीस खंडी जवारी पायली माप एकवीस कुडो खंडी वजा जातां बाकी तुमचे कडेस जवारी पावणेचार खंडी घेणें राहिली असून त्याचे सर्व जवारीचे रुपये तुह्मास दिले असून आह्मास जवारी ४॥। पावणेपांच खंडीचें माप अद्यापपावेतों दिलें नाहीं. आह्मी तुह्मास दहापांच वेळ जवारी मागितली असतां तुह्मी आह्मास जवारी देतों देतों ह्मणून अद्यापपावेतों दिली नाहीं. आमची ही नोटिस तुह्मास पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत जवारीचा निकाल करून द्यावा. अगर न दिला तर रीतीप्रमाणें हलींचे भावानें दावा धरून दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचा खर्च व दिवाणीचे खर्चासुध्धां कोर्टाचे मार्फत घेण्यांत येईल. कळावें. तारीख २६ माहे जुलै सन १८७७ इसवी.

(सही) शेखइमाम वल्लद शेखचांद रहाणार सोनोरी तालुके मूर्तिजापुर दस्तुर खुद्द.

[सही] रामधन बाळाराम मारवाडी दुकान पळसो बु॥ तालुके अकोलें दस्तुर खुद्द.

### नोटिस.

भग्या वल्लद नटव्या माहार रहाणार मौजे शहापुर प्रगणे मूर्तिजापुर तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुमचेकडे आमचे रुपये ६। व त्याचें व्याज याशिवाय जवारी १॥ खंडी पायलीं दोन शेरी कुडोखंडीची अशी तीं अद्यापपावेतों जवारी व रुपये तुह्मी दिले नाहींत करितां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत आमची जवारी व रुपये असे नोटिशीचे खर्चासुद्धां द्यावे अगर न दिल्यास रीतीप्रमाणें हलींचा भाव जवारीचा दरखंडी २५ प्रमाणें व ६। रुपये आणि त्याचें व्याज असे दिवाणींत फिर्याद करून या नोटिशीच्या व कोर्टाच्या खर्चासुध्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावें तारीख २७ माहे जुलै सन १८७७ इसवी.

(सही) रामधन बाळाराम मारवाडी दुकान पळसो बु॥ तालुके अकोलें दस्तुर खुद्द

---


## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां. ]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ………… | ३—० |
| मागाहून. …….. | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपालहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. आ ३. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

☞ मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे, विशेषतः संस्थानक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.


---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० १२ माहे आगष्ट सन १८७७ इ० अंक ३२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ॰४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १॰८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ॰१॰६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ॰१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ॰४ |
| „ दुसरे खेपेस | ॰२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मलकापुर ता. १ माहे आगष्ट
सन १८७७ इसवी.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपला व आमचा हा भेटीचा नवीनच प्रसंग आहे तर कृपा करून या खालीं लिहिलेल्या चार ओळींस आपल्या पत्रा अंकीं जागा मिळेल अशी आशा बाळगून आपणाकडे पाठविल्या आहेत.

आज दोन महिने झाले पाऊस बिलकूल नाहीं त्यामुळें लोक अगदी हवालदील झाले आहेत. शेतांत पेरलेल्या धान्यास आलेले अंकूर वाळत चालले आहेत. आज जवारीचा भाव दरखंडीस ८५।८९ पावेतों आहे. मागील शनवारचे बाजारांत धान्य बिलकूल विकण्यास आलें नव्हतें व जें आलें होतें त्याचा भाव १२ पैसे ह्मणजे ६ आणे असल्यामुळें गरीब लोकांस फार त्रास होऊं लागला. तेव्हां कांहीं लोक तहशिलदार साहेब यांजकडेस जाऊन व त्यांनीं धामधूम करून ते दिवशीं लोकांस धान्य देवविलें. दुसरे दिवशीं तहशिलदारानीं व्यापारी लोकांजवळून धान्य विकत घेऊन गावांतील पाटील चावडीवर स्वल्प दरानें विकण्याचें दुकान घातलें आहे.

कालरोजीं सकाळीं सात वाजतां हिंदुस्थानी शाळेंत सभा भरली होती. मेहेरबान एक्स्ट्रा अ० कमिशनर, तहशिलदार, शाळा मंडळी कारकून मंडळी, वकील मंडळी, देशपांडे, देशमुख, सभ्य लोक साहू सावकार वगैरे मिळून सरासरी दोनशें मनुष्यें जमलीं होतीं. ए० अ० कमिशनर यांचे सांगण्यावरून रा. रा. रावजी राघव वकील ह्यांनीं प्रथम सभा भरविण्याचा उद्देश थोडक्यांत सांगितला तो असा कीं, धान्य अतिशय महाग झाल्या कारणानें गरीब लोकांस अन्न त्यांचे चरितार्थापुरतें मिळत नाहीं करितां कांहीं भांडवल जमवून त्याचें धान्य घ्यावें व तें धान्य स्वस्त दरानें विकून गरीब लोकांचा चरितार्थ चालवावा इतक्याकरितां ही सभा भरविली आहे. त्यांचे भाषणावर स्वदेशहितेच्छु रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे हेड मास्तर यांहीं मनोरंजक असे कांहीं वेळ ह्याच विषयावर संभाषण केलें. त्या योगानें हा उद्देश सर्व सभासद लोकास मान्य होऊन एकंदर सुमार ८०० रुपयांचे आकडे पडले. मोठमोठे गृहस्थांस ह्या कृत्याची देखरेख व तजवीज ठेवण्यास सांगितलें. व ते गृहस्थ आपआपलें काम चांगल्या रीतीनें बजावतील अशी आशा आहे व ज्याप्रमाणें आमचे दयाळु रावसाहेब पुरुषोत्तमराव नारायण, रावसाहेब त्रिंबकराव तहशिलदार, व रा. रा. हरी मोरेश्वर हेड मास्तर या त्रिवर्गांनीं एथील गरीब गुरीब यांस व सर्व ग्रामस्थ लोकांस सुखी होण्याचा जो स्तुत्य उद्योगाचा किता घातला आहे तसाच सर्व देशबांधवांनीं उचलावा अशी विनंती आहे.

तहशिलदार यांणीं गावांतील सडका फार चांगल्या केल्या हें पाहून आह्मास संतोष वाटतो. परंतु श्रीरामचंद्राचे देवळाकडे जो रस्ता नेमिवंताचे हवेलीवरून जातो तो कांहीं ठिकाणीं उंच सखल असून रस्त्यांत मोठमोठे थोडे दगड आहेत त्या योगानें जाणारे येणारे ह्मातारे लोकांस अंधारे रात्रीं न दिसल्यामुळें ते अडखळून पडतात व ह्याच रस्त्याला एक लादणी आहे तींतून असा कांहीं सुगंध येतो कीं, त्या योगानें तिकडून कोणास जाववत नाहीं. तर अशी जागा सदहू अधिकाऱ्यांनीं स्वतः पाहून तिकडे लक्ष्य पुरवावें. पत्रविस्तार फार झाला सबब लायब्ररीच्या वाईट स्थिती विषयीं लिहिलें नाहीं. पुढें कळवूं. कळावे ही विनंती.

आपला
एक फिरस्ता.

इचलकरंजीकर नाटकवाले.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. हल्लीं एथें जे नाटकवाले आहेत त्यांचे २।३ खेळ पाहिले, याविषयीं जें माझें मत आहे तें कळवितों येते अंकीं स्थळ देण्याची कृपा व्हावी.

प्रथम खेळ वत्सलाहरण हा पहिलाच असल्यानें उत्तम होईल ह्मणून जी सर्वांस आशा होती त्याप्रमाणें बराच झाला पण त्यांत दुःशासनाचे पात्र अगदी बेंगरूळ होतें त्याचप्रमाणें कर्णाच्या पात्रांत क्रौर्य फार होतें तें त्यांत नसतां दुःशासनांत असतें तर बरें होतें. त्याप्रमाणें दुर्योधन कोत्या आवाजाचा होता त्याची बदली कर्ण पात्राकडे व कर्ण पात्राची योजना दुर्योधन पात्राकडे झाली असती तर बरें होतें त्यापुढील सर्व भाग चांगला व सुभद्रेचे पूजेचा जो थाट केला तोही नामीच झाला. पण पुजारी आले तेव्हां सुभद्रेनें उठून उत्थापनासह त्या ब्राह्मणास नमन करावयाचें तें केलें नाहीं ही थोडीसी उर्मठ रीत दिसते नाहीं बरें? एडिटरराव, तुह्मास नाहीं का असें वाटत? कारण आह्मीं ब्राह्मणांस देखील ब्राह्मण वंद्य आणि ही तर क्षत्रियाची मुलगी — त्यांतून श्रीकृष्णाची भागिनी तेव्हां तिची रीत तर दुसऱ्यांनीं घेण्यासारखी असावी, तेव्हां आमच्या मतेंही मोठी चूक झाली. त्याचवेळेस सुभद्रेचे बळावण्यावरून कोणी विठ्ठल सुवासीनही पुराण ऐकण्यास आली होती तिनें विडा खाऊन ओठ पोवळ्यावाणी रंगवले होते हें तर अगदीच गैर झालें. पात्रानें तो वेष घेण्याचे आधीं विडा खाल्ला होता तर जरा गुळणा करून ओंठ धुऊन टाकले असते ह्मणजे झालें पण वऱ्हाडांत नाटक आहे सबब "देश तसा भेश" असें जर झालें असेल तर न कळे! कारण या देशीं विधवा बाया विडे खातात! तसेंच खेळ अर्धाच आटपला कौरवादिकांची राक्षसी मायेनें फजीती झाली तो भाग तर अजीबात गाळला. आमच्यामतें त्यापैकीं कांहीं मौज दृश्यमान होणें अवश्य होतें. अस्तु.

"दामाजीचें" आख्यान झालें त्यांत तर दामाजी व त्यास कैद करण्यास हुजुरांतून जो शिखानष्ट आला होता तो हीं पात्रें मात्र चांगलीं नव्हतीं बाकीचा सर्व थाट अगदी नामी झाला. कारण हा खेळ याचाच मी कित्येक वेळ पाहिला व इतरांचाही पाहिला पण या खेळांत यांची जी उत्तम टीप दिसली तीबद्दल यांची स्तुति करणें योग्य आहे. दामाजीचें पात्र वक्तृत्वांत विशेष चांगलें, व त्यास नेण्यास आलेल्या खासाहेबांचें विशेष तीव्र हवें होतें.

याच रात्रीं "सीताहरण" हा दुसरा भाग केला त्यांत कांहीं अर्थ नव्हता. अगोदर तर राम लक्ष्मण येऊन त्यांचें व राक्षसाचें युद्ध होऊन तो मेल्यानें शूर्पनखा क्षुब्ध झालेली आली पाहिजे; नंतर ती राम लक्ष्मणास मारण्याचे हेतूनें येऊन लक्ष्मणाचें उत्तम रूप पाहून मोहित झालेली लागलीच उत्तम रूपयौवनसंपन्न स्त्री बनली असें व्हावें. रामाचे खुणेवरून लक्ष्मणानें तीस अकर्णनासिका केलें इ० हा भाग तर मुळींच गळाला असें होऊं नये. दर नाटकास आटपतें घेतात हें बरें नव्हे. लोकांच्या पैशाचा योग्य मोबदला देणें उचित आहे. या खेळांत सीतेचें पात्र व नृत्यांगना हीं उत्तम होतीं यांत संशय नाहीं. नृत्य करणाऱ्या पात्रास तर त्यानें आपलें उत्तम कौशल्य दाखविल्याबद्दल कांहीं बक्षीस मिळणें अवश्य होतें. पण पुढें बसलेल्या मोठमोठ्या धेंडापैकीं, तसेंच सावकारापैकीं कोणीच तसें केलें नाहीं हें त्या पात्राचें दैव ! !

आह्मीं खामगावासही या नाटकवाल्यांचा एक "अफजुलखानाचा" खेळ पाहिला तोही चांगलासा झाला पण त्यांत जीं व्यंगें दिसलीं तीं अशीं:— रामदासाच पात्रास धोत्राबद्दल कोपीन व डोकीस रुमालाबद्दल उत्तम जटा व दाढी पाहिजे तसेंच बगलेंत झोळी नसून हातांत फक्त कुबडीच बस. शिवाजी पात्र तर उत्तम पण विदूषकच हैबती जासूद व विदूषकच तान्हाजी मालुसरे होतो असें नसावें. तसेंच अफझुलखान पाहिल्या बरोबर भिणें, दबकत दबकत जाणें हे हावभाव शिवाजीकडून उत्तम वठले नाहींत ते वठले पाहिजेत. तसेंच अफझुलखान व शिवाजी यांची भेट झाली त्यांत शिवाजीनें सलाम करणें वगैरे कांहीं झालें नाहीं व भेटण्यांत खानानें घाई केली ती नसावी ह्मणजे सर्व खेळाचा ओढ उत्तम उतरेल. एकंदरीत पहातां सर्व नाटकांत हें नाटक उत्तम ठरेल व राघोपंतास टापटिपेची कळा चांगली साधली आहे असें ह्मणण्यास कांहीं बाध आहे असें वाटत नाहीं.

हीं जीं व्यंगें दाखविलीं यांत त्या नाटकाचा कांहीं उणेपणा मुद्दाम दाखवावा असा आमचा बिलकूल हेतु नाहीं. खरीखुरींच जीं व्यंगें दिसलीं तीं दाखविलीं तर नाटकवाल्यांनीं व मुख्यत्वें त्यांच्या मुख्यानीं याबद्दल रोष धरूं नये. हेच खेळ त्यांनीं पुन्हा केले ह्मणजे ही सदरील व्यंगें त्यांनीं सुधारावीं व उणेपणा काढून टाकावा इतकाच काय तो हेतु. वस्तुतः त्यांचे बद्दल आमचा कोणतेही प्रकारें वाईट ग्रह नाहीं. चांगल्यास चांगलें व वाइटास वाईट ह्मणण्याचा प्रत्येकास ज्याच्या त्याच्या समजाप्रमाणें हक्क आहे व दोन्ही प्रकार आह्मी दर्शीत केलेच आहेत. कळावें लोभ करावा ही विनंती.

आपला
राजश्री मंडळींतील एक

## वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुध्द ४ शके १७९९

## रक्तवर्ण पर्जन्यावरून अनिष्टसूचक व्यर्थ कल्पना.

गेल्या महिन्यांत रायचुराकडे पाऊस पडला त्याच्या पाण्याचा रंग तांबूस होता ह्मणून सर्वत्र असें प्रसिद्ध झालें कीं तो पा

ऊस रक्ताचा पडला. व असा रक्तस्राव होणें अनिष्टसूचक आहे. व तशी धास्ती मनांत राहिल्यामुळें पाऊस रक्तावर पडत नाहीं. युरोपांत व एशियेंत लढाया चालू आहेत हे त्या दुष्ट चिन्हाचे परिणाम होत असें बहुत लोकांस वाटूही लागलें आहे. पण ही कल्पना भ्रांतिमूलक होय आणि अशा पावसापासून कांहीं एक वाईट व्हावयाचें नाहीं हें सर्वांनीं पक्कें समजावें व स्वस्थचित्त रहावें असें आमचें त्यांस सांगणें आहे.

रायचूर प्रांत निजाम सरकारचा आहे ह्मणून या आफिसवरून त्या पावसाचे पाण्यांत वस्त्र भिजवून हैदराबादेस नेविलें व त्याची चिकित्सा करून पाहिली तेव्हां समजून आलें कीं त्यांत रक्ताचा अंश अथवा गुण तिलमात्र नाहीं.

पावसामध्यें असे व अशा प्रकारचे दुसरे कांहीं पदार्थांचे अंश कधीं कधीं पडत असतात अशाविषयीं ग्रंथाधार आहेत व तत्ववेत्यांनीं त्याचें कारण, असें मानिलेलें आहे कीं, चंद्रावरील ज्वालामुखी पर्वतांतून रस निघतात त्याचे परमाणू कधीं कधीं वातावरणांतून पृथ्वीवर येतात तसेंच तार्यांचें कधीं कधीं पतन होतें ह्मणजे तो फुटून त्याचे तुकडे होतात व त्याचे रजःकण वातावरणांतून पृथ्वीवर येतात व हे ज्या वेळीं जशी हवा असेल तसे म्हणजे रुक्ष हवा असल्यास शुष्क परमाणूनें व सार्द्र हवा आणि पर्जन्याचे तुषार असल्यास द्रवरूपानें जमीनीवर पडतात व त्यांचा रंग तांबडा असल्यास त्यास रक्तपर्जन्य ह्मणतात ह्मणून त्याविषयीं दुश्चिन्ह किंवा भीति मानण्याचें कांहीं कारण नाहीं.

मागें एके वेळीं अटलांटिक महासागरांत सतत १९ तास वाळूचा पाऊस पडला होता. व सन १७२१ त ब्रन्स्वीक एथें गंधकाच्या चुराचा पाऊस पडला यावरून इतकेंच समजावयाचें आहे कीं वातावरणांतील वस्तूवर पृथ्वीचें आकर्षण घडतें. व त्या वस्तु तिच्या पृष्ठभागावर येऊन पोचण्यापूर्वींच आवाजानें त्याचे बारीक परिमाणु होतात व त्याचें पतन तो तऱ्हेवाइक पाऊस होय, त्यांत अनिष्टसूचक कांहीं नाहीं.

## मद्रासेकडील भयंकर स्थिति.

ईश्वराचे नेम कोणास कळत नाहींत. आपलें चांगलें व्हावें ह्मणून हमेशा आपण जपत असतों पण कधींकधीं परमेश्वर केव्हांच वाईट करून टाकितो ते आपणास समजत नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत साऱ्या राष्ट्राच्या सुखाविषयीं मोठी काळजी उत्पन्न झाली आहे. गुदस्तां पाउसावाचून बारा महिने लोकांनीं दुष्काळांत काढिले त्या दुःखाचें पारणें यावर्षीं फिटेल अशी आशा धरून लोक आहेत तों पर्जन्यानें पुन्हा डोळे वटारले. बरसातीचा हंगाम ह्मटला ह्मणजे आज अढीच महिने झाले, इतक्या काळांत जसा असावा तसा पाऊस कोठेंच नाहीं. अतिशय ओरड झाली ह्मणजे एकादे दिवशीं मेघराजानें दर्शन द्यावें पुन्हा महिना पंध्रा दिवस कांहीं नाहीं असें बहुधा सर्वत्र चाललें आहे यामुळें याचा अखेर परिणाम काय होतो तो कळत नाहीं. यंदाही जर गुदस्तांची पाळी आली तर खरोखरी लक्षावधि लोक मेल्यावाचून रहाणार नाहींत. गेल्यावर्षीं सरकारानें व लोकांनीं तजविजी केल्या असतांही हजारो लोक मरण पावले, आणि आतां तर देशांत धान्याचा पुरवठाच राहिला नाहीं मग कोट्यावधि जीव कसे जगावे! हा मोठा प्रश्न आहे. व तो परमेश्वरास सोडवितां येईल. व लोकांस सुख देतां देईल. नाहींपेक्षां घरांतल्या घरांत सुखवस्तु मरण प्राप्त होणार यांत संशय नाहीं.

मद्रासचे गवरनर ड्यूक आफ बॉकिंगहाम हे फार दयाळु आहेत व त्यांच्या इलाख्यावर असा दुष्ट प्रसंग आला त्याजबद्दल ते फार दुःखी आहेत; व लोकांच्या दुःखपरिहारास असतील तितके सर्व उपाय योजण्याच्या तजविजीस ते लागले आहेत. हें पाहून त्यांचे सहायास देव धावो असें आह्मी इच्छितों. मागील शनवारीं मद्रासेंत मोठी सभा भरली होती तिचे अध्यक्ष गवरनर साहेब झाले होते त्यांनीं. दुष्काळ संबंधानें लोकांची स्थिति कशी झाली, आहे याजवर अतिउत्तम व्याख्यान दिलें. ते ह्मणाले हा वेळपर्यंत इकडील लोकांनीं दम धरिला पण आतां ते साऱ्या हिंदुस्थानांतील व विलायतेंतील उदार, धनिक व परोपकारी लोकांस हात पसरीत आहेत. कृष्णा नदीच्या काठापासून कन्याकुमारी केपापर्यंत देशाची स्थिति मोठी भणाण झाली आहे. लोकांजवळ धान्य नाहीं, त्यांचीं जनावरें मरण पावलीं, आणि पाऊस न पडल्यामुळें पेरलेलें धान्य जळुन गेलें असे रिपोर्ट आले आहेत. हा कहर एक कोटि एंशीलक्ष लोकांवर उसळला आहे. देशांतील धान्याचा साठा सोंपून गेला आहे, बाहेरून येणाऱ्या धान्यावर लोकांची गुजराण चालली आहे, रेलवेनें जो माल येत आहे तेणेंकरून फक्त ९० लक्ष मनुष्यांची जोगवणूक होईल, सारांश बाहेरून मालही पुरता येत नाहीं, जलमार्गानेंही धान्य कमी येऊं लागलें आहे. इलाख्यांत जें धान्य आहे तें साऱ्या लोकांनां ८ दिवसही पुरणार नाहीं. सरकारानें लोकांनां अन्न पुरविलें पाहिजे तें तें पुरवितेंच पण त्याहून अधिक पाहिजे. गरीब लोकांचें राहो, पण धान्याचे दर हल्लीं जे आहेत त्याचे योगानें सामान्य प्रतीच्या चांगल्या मनुष्यासही कुटुंबपोषणाविषयीं संकट उत्पन्न झालें आहे. १८७४ सालीं बंगाल्यांत दुष्काळ पडला होता त्या वेळीं धान्याचे जे दर होते त्याच्या हल्लीं दुप्पट झाले आहेत. कित्येक जिल्ह्यांतून मोठा कहर उसळला आहे. ह्मणून हा सर्व बोजा सरकाराच्यानेंच केवळ उचलला जाणार नाहीं. देशाच्या बऱ्याकरितां लोकांनींही यास अवश्य मदत केली पाहिजे. अशा मजकुराचे मोठें हृदयभेदक भाषण गवरनर, साहेबांनीं केलें. व विलायतेस लंडन, यार्क, डब्लिन वगैरे शहराचे कोतवालास तारेंतून विनंती पत्रें पाठविलीं कीं हिंदुस्थानच्या मरणाऱ्या लोकांस जगविण्याकरितां तुमच्या तेथील उदार लोकांकडून धर्मार्थ मदत येण्याजोगी असेल तितकी कठीण प्रसंग जाणून तावडतोब पाठवून द्या. त्याचप्रमाणें विलायतेंतील व हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रकर्त्यांस ही त्यांनीं विनंती केली आहे कीं तुह्मी कलम चालवून धनिकांच्या हृदयास पान्हा आणण्याचा हाच वक्त आहे, सबब कसर करूं नये. याचप्रमाणें सर्व इलाख्या इलाख्याच्या गवरनरांस ही सभा भरवून आपले वजनानें होईल ती मदत मिळवावी असें विनविलें आहे व सर्व आहवाल हिंदुस्थान सरकारास कळविला त्यावरून त्यांनीं तावडतोब तारेंतून जबाब पाठवली कीं आह्मी त्या स्थळीं समक्ष येऊन तुह्मास भेटतों नंतर तुमचे आमचे विचारानें सरकारांतून ज्या तजविजी होणें अवश्य आहेत त्या आपण करूं. व त्याप्रमाणें परवाचे दिवशीं लार्ड लिटन साहेब सिमल्याहून निघण्याचा निश्चय झाला आहे. आतां काय तजवीज लागते पाहूं.

---

इचलकरंजीकर नाटकवाल्यांनीं काल जो खेळ केला तो फार चांगला जमला. अशा अवघड व घोटाळ्याच्या खेळाची त्यांनीं फार थोड्या दिवसांत इतकी उत्तम तयारी केली हें त्यांस मोठें भूषणास्पद आहे यांत संशय नाहीं.

या नाटकाचें संविधानक मोठें मौजेचें आहे. ह्मणून तें आह्मी आपल्या वाचकांकरितां एथें घेतों:—

### कामेडी आफ एरर्स अथवा भ्रांतिकृत चमत्कार.

शृंगारपुर नामक नगरांत धनपाल ह्मणून एक गृहस्थ रहात असे त्याच्या बायकोचें नाव इंदुमति. तिला एके समयीं आवळे जावळे दोन पुत्र झाले ते अगदीं हुबेहूब एकासारखे एक होते. इतके कीं त्यांपैकीं फक्त एकाची आपली वीस पंचवीस वर्षांची जरी ओळख असली तरी दुसऱ्यास जर एकदम पाहिलें तर तो पहिलाच आहे असें वाटावें व आईस व बापास देखील कोणता कोण हें ओळखतां येऊं नये. हे मुलगे झाले त्या वेळेस धनपाळ जेथें राहिला होता तेथेंच एक गरीबाची बायको प्रसूत झाली व तिलाही त्याच वेळेस जुळे दोन मुलगे झाले व तेही अगदीं हुबेहूब सारखे झाले. हे दोन्ही मुलगे धनपाळानें पुढें आपल्या पुत्रांचे चाकर होण्याकरितां घरीं बाळगले. धनपाळानें आपल्या दोन्ही मुलांचें हेमकांत हें एकच नाव ठेवलें व तसेंच दुसऱ्या दोन मुलांसही धर्म्या हें एकच नाव दिलें. पुढें ही सर्व मनुष्यें गलबतांत बसून दुसऱ्या ठिकाणाहून शृंगारपुरास येत असतां मोठें तुफान झालें व गलबत अगदीं फुटलें त्यामुळें या मनुष्यांची तुटातूट झाली; परंतु ईश्वरी कृपेनें सर्व मनुष्यें वांचलीं धनपाळ व एक हेमकांत आणि एक धर्म्या हे शृंगारपुरास आले. इंदुमति एकीकडे गेली व गोसावीण होऊन राहिली, आणि दुसरा हेमकांत व दुसरा धर्म्या हे दुसरीकडे जाऊन एकत्र राहिले. सारंगपुर नामक शहरांतील एका मठांत इंदुमति राहिली. त्याच शहरांत परंतु इंदुमतीस न कळतां दुसरा हेमकांत व धर्म्या हे राहिले. जे हेमकांत व धर्म्या आपल्या बापाजवळ शृंगारपुरांत राहिले त्यांस शृंगारपुरकर व जे दोघे सारंगपुरांत राहिले त्यांस सारंगपुरकर अशा संज्ञा दिल्या होत्या.

पुढें शृंगारपुरकर हेमकांत व धर्म्या हे दोघे आपल्या भावांचा शोध करण्याकरितां निघाले त्यांस जाऊन कित्येक वर्षें झालीं व तेही येत नाहींत असें पाहून धनपालही त्यांच्या शोधास्तव निघाला. कर्मधर्मसंयोगानें एके दिवशीं हे तिघे सारंगपुरांत आले. परंतु धनपाळास कांहीं माहित झालें नाहीं. कोणीही शृंगारपुरकर आला तर त्यास ठार मारावें असा सारंगपुरींतील कायदा होता, ह्मणून धनपाळास धरून राजापाशीं नेलें व त्यानें सायंकाळपर्यंत खंडणीचा पैसा मिळाला नाहीं तर त्यास ठार मारावें असा हुकूम केला. एथून खेळास आरंभ झाला

शृंगारपुरकर व सारंगपुरकर हेमकांत व धर्मे हे त्या दिवशीं एका गावांत असल्यामुळें जे जे हेमकांत सारंगपुरकराच्या ओळखीचे होते त्यांस दुसरा हेमकांत भेटून त्याच्याशीं आपल्या ओळखीच्याप्रमाणें ते वागूं लागले. धर्म्ये, तारामति, भानुमति, सोनार, आणि व्यापारी असे पुष्कळ फसले व त्याचकरितां दोन्ही हेमकांतांस भ्रमिष्ट झाल्यासारखें वाटूं लागलें यामुळें फारच चमत्कारिक गमती झाल्या.

प्रथम राजापाशीं धनपाळानें आपली सर्व हकीकत सांगतली. राजास दया आली. परंतु कायद्याविरुद्ध वागतां येत नाहीं ह्मणून सायंकाळपर्यंत खंडणीचा पैसा मिळविण्याकरितां राजानें त्यास मुदत दिली.

सारंगपुरकर हेमकांताचें लग्न झालें असून त्याची पत्नी तारामति सुंदर होती व तिची अविवाहित बहीण भानुमति तिच्या घरींच होती. तारामतीला कंठा आणून देतों म्हणून कबूल करून हेमकांत सारंगपुरकर बाहेर गेला. मग कांहीं वेळानें तारामतीनें धर्म्या सारंगपुरकरास आपल्या पतीस जेवायला बोलावून आणावयास पाठविलें. इकडे हेमकांत शृंगार० करानें आपल्या धर्म्यास विहारांत जवळचें द्रव्य देऊन पाठविलें व सांगितलें कीं हें द्रव्य घेऊन तूं तेथेंच राहा पुढें लागलेंच त्यास धर्म्या सारंगपुरकर भेटला. आणि म्हणाला "बाईसाहेब जेवावयास बोलावतात" आपला हा चाकर भलत्याच वेळें थट्टा करितो असें वाटून हेमकांत शृंगार० करानें धर्म्या सारंगपुरकरास मारिलें, व तो पळून गेला, आणि आपण विहाराकडे जावयास निघला.

इकडे धर्म्या सारंगपुरकर घरीं गेला. तों तारामति व भानुमति यांचें भाषण चाललें होतें. "मला यजमानांनीं मारलें. व ते म्हणतात मला बायको नाहीं, मी कोणाला ओळखत नाहीं." हें वर्तमान त्यानें तारामतीस सांगितलें मग ती आपल्या बहिणीस घेऊन नवऱ्यास आणावयास गेली. इकडे हेमकांत शृंगारपुरकराची व धर्म्या शृंगारपुरकराची गांठ पडली व पूर्वीं जी सारंगपुरकर धर्म्याची गांठ पडली होती ती त्याचीच असें समजून पूर्वींच्या असंबद्ध भाषणाबद्दल त्यानें विचारिलें. आणि तो कांहीं त्या भेटीची ओळख देत नाहीं अ-

से पाहून त्यास मारलें. इतक्यांत तारामति व भानुमति येऊन त्या दोघांस सारंगपुरकर समजून घरीं जेवावयास घेऊन गेल्या. व दार लावून घेऊन त्यांनीं त्यांस जेवावयास घातलें.

दरवाजाबाहेर हेमकांत व धर्म्या सारंगपुरकर आणि ताराचंद, जगजीवन वगैरे मंडळी आली. परंतु आपला नवरा घरीं आहे या भ्रांतीनें तारामतीनें त्यांस दार उघडिलें नाहीं. पुढें जगजीवन सोनार कंठा आणून देण्याचें कबूल करून निघून गेला व धर्म्यास चाबूक घेऊन येण्याकरितां हेमकांतानें पाठविलें.

इकडे हेमकांत शृंगारपुरकर तारामतीशीं नीट बोलत नाहीं ह्मणून तोच आपला मेहुणा या भ्रांतीनें भानुमतीनें त्यास उपदेश केला. तो तिला ह्मणाला तारामति माझी बायको नाहीं, तूंच मला प्रिय आहेस; ती भिऊन निघून गेली व गजी कांहीं भ्रांतीनें आपल्या पाठीस लागली ह्मणून धर्म्या शृंगारपुरकर धांवत धांवत आपल्या धन्याकडे गेला. त्यानें त्याला सांगितलें " लवकर गलबताचा शोध करायला चला. इथें सर्व भुतें आहेत" इतक्यांत जगजीवन आला व शृंगारपुरकर हेमकांतास सारंगपुरकर समजून त्यानें कंठा दिला.

इकडे हेमकांत सारंगपुरकरानें वेश्येच घरीं जाऊन तिचें गाणें ऐकलें व तिची अंगठी घेऊन कंठा देण्याचें कबूल केलें.

पुढें जगजीवनानें एका व्यापाऱ्याचें देणें होतें त्यानें त्यास तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडून पकडविलें. इतक्यांत हेमकांत सारंगपुरकर त्यास भेटला. त्याला कर्जाची फेड करण्याकरितां कंठ्याची किंमत मागतली. हेमकांत ह्मणाला " मला कंठा मिळाला नाहीं "या भांडणाच्या चुकीपासून त्यांचा कज्जा झाला व जगजीवनानें त्यास जमादाराकडून हेमकांत सारंगपुरकरास कैद करविलें इतक्यांत गलबताच्या शोधाकरितां गेलेला धर्म्या शृंगारपुरकर कैद केलेल्या सारंगपुरकर हेमकांतास भेटला व "गलबत मार आज जाणार आहे"असें सांगितलें! त्यानें त्यास घरीं होनाची थैली आणावयास पाठविलें. त्यानें तारामतीपासून थैली घेऊन हेमकांत शृंगारपुरकराची गांठ पडली त्यास थैली दिली! व सारंगपुरकर हेमकांताकडे त्याच्या धर्म्यानें चाबूक आणून दिला! व वेश्या शृंगारपुरकरापाशीं येऊन "कबूल केल्याप्रमाणें कंठा द्या "असें ह्मणाली. तिला हडळ समजून ते निघून गेले. वेश्या हेमकांताला वेड लागलें असें समजून त्याची बायको तारामति इकडे गेली.

मग तारामति, भानुमति, वेश्या व पंचाक्षरी हीं आलीं. हेमकांत सारंगपुरकरास वेड लागलें असें समजून पंचाक्षऱ्यानें परीक्षा केली. व हेमकांत व धर्म्या सारंगपुरकर यांस बांधून पंचाक्षरी आणि कांहीं दुसरे लोक घरीं घेऊन गेले.

इकडे तारामति जगजीवनाचा शोध करीत असतां तिला शृंगारपुरकर हेमकांत व धर्म्या हे दिसले. व त्यांच्या हातांत तरवारी पाहून ती भिऊन पळाली. हे वेडे पुनः सुटले या भ्रांतीनें पुनः त्यांस धरण्याचा तिनें प्रयत्न केला,

पुढें हेच हत्यारबंद शृंगारपुरकर जगजीवन व व्यापारी यांस भेटले. कंठा पुर्वीं नाकबूल केल्याबद्दल वाद होऊन व्यापाऱ्याची व हेमकांत शृंगारपुरकराची लढाई झाली. इतक्यांत तारामतीनें येऊन त्यास वेड लागलें आहे ह्मणून सांगून बांधावयाचा प्रयत्न केला. परंतु हेमकांत व धर्म्या शृंगारपुरकर हे मठांत शिरले. मठांतून गोसावीण ( इंदुमति ) बाहेर आली व काय आहे ह्मणून विचारिलें. तारामति माझ्या नवऱ्याला वेड लागलें आहे त्याला "माझ्या स्वाधीन करा" असें ह्मणाली. इंदुमति न ऐकतां निघून गेली.

पुढें राजापाशीं फिर्याद करावी असा तारामतीनें बेत केला व राजा धनपाळाचा वध पाहण्याकरितां त्याच वाटेनें आला. तारामतीनें सर्व वृत्तांत राजास निवेदन केला. इतक्यांत पंचाक्षऱ्याच्या हातून सुटून हेमकांत व धर्म्या सारंगपुरकर आले. हेमकांतानें राजापाशी बायकोनें छळ केला ह्मणून फिर्याद केली. तेव्हां हेमकांत व धर्म्या हे मठांत शिरले असून भलतीकडून पुनः आले याचा सर्वांस चमत्कार वाटला. राजासही सर्वांची हकीकत ऐकून फार आश्चर्य वाटलें व न्याय काय करावा व खरें काय आहे याच्या निर्णयाची पंचाईत पडली. मग त्यानें गोसाविणीला बोलावणें पाठविलें ती दोघा शृंगारपुरकरास घेऊन आली. मग धनपाळ आणि इंदुमति यांनीं एकमेकांस ओळखलें व सर्व खरी हकीकत सर्वांस समजली.

## वऱ्हाड.

क्या. आर बुलक वार्शमचे आफिशियेटिंग डिपुटी कमिशनर यांस अधिकार मिळाले तेः—

१ क्रिमिनल प्रोसिजर कलम ३६ प्रमाणें माजिस्त्रटचे अधिकार.

२ जिल्हा जडज या नात्यानें कोणत्याही रकमेचे व कसल्याही प्रकारचे दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार.

३ क्रिमिनल प्रोसिजर कलम २७ प्रमाणें सेकंड व थर्ड क्लास माजिस्त्रटचे ठरावावर अपिलें घेण्याचा अधिकार

४ वाशीम जिल्ह्यांतील फक्त मि. ताजूदीन साहेबांचें कोर्ट शिवाय करून बाकी सर्व कोर्टांच्या दिवाणी फैसल्यावर अपिलें घेण्याचा अधिकार.

---

हेदराबादच्या मेडिकल स्कूलमध्यें वऱ्हाडांतून शिकावयास गेलेल्या विद्यार्थ्यांपैकीं महमद अबदुला हा पास झाला व बाकीं ४ जण नापास झाले ह्मणून त्यांस काढून टाकिलें त्यांचीं नावें:—

सय्यद अब्दुल रहिमान, अबदुल खां, महमद फरीद, व रामसिंग.

---

मि. हणमंतराव देशपांडे बाळापुरकर यानीं स्पेशियल माजिस्त्रटच्या अधिकाराचा राजीनामा दिला तो मंजूर झाला.

---

मि. एल लेस्ली पश्चिम वऱ्हाडांतील असिस्टंट इंजिनियर यास परीक्षेकरितां तीन महिन्यांची रजा मिळाली व गेल्या महिन्याच्या १४ वे तारखेस ते रजेवर गेले.

---

रुरकीच्या सिव्हिल इंजिनियरिंग कालेजापैकीं पास विद्यार्थी ठाकूरदास यास टेंपररी थर्ड ग्रेड ओव्हर सियर केलें व पश्चिम वऱ्हाडांत सर्वेच्या कामावर नेमिलें.

---

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एथून जाणार ह्मणून गेले रविवारीं तीन चार ठिकाणीं त्यांस पानसुपारीचा समारंभ झाला. त्यांत रा. रा. बजाबा रामचंद्र डिपुटी इन्स्पेक्टर यांजकडे व रा. रा. देवराव विनायक वकील यांजकडे मंडळीचा समाज मोठा जमला होता. दोन्ही ठिकाणीं गाणीं झालीं व विष्णुपंत यांच्या उत्तम योग्यतेबद्दल व वियोगजन्य दुःखाबद्दल भाषणें झालीं. बजाबांचे एथें राव बहादूर नारायण भाई डायरेक्टरही आले होते. व त्यांनींही यांच जाण्याबद्दल मोठी हळहळ दाखविली. सर्व ठिकाणीं विष्णुपंतानीं प्रत्युत्तरें देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांस गहिंवर दाटून कंठ सद्गदित होत गेल्यानें फार थोडे शद्ब बोलून ते स्तब्ध रहात गेले. मंगळवारीं रेलवे स्टेशनावरही त्यांस पोंचविण्याकरितां पुष्कळ मित्र मंडळी गेली होती. त्या वेळीं ते सडे गेले होते व सर्व खटलें नेण्याकरितां काल सायंकाळीं परत आले आहेत. पुन्हा उद्या दोन प्रहरीं परत जातील.

---

मि॰ गी साहेब बेलारी येथिल आर्बथनाट कंपनीचे एजंट यांस हैदराबादेस मिलिटरी सेक्रटरी नेमिलें असें समजतें.

---

मूर्तिजापुर नजीक शिरसो येथें सरकारी शाळा आहे तिजमध्यें ग्रामस्थ लोकांनीं जाऊन परीक्षा घेतली व १८ रुपये वर्गणी घड्याळ वगैरे घेण्याकरितां दिली असें समजतें-

---

जळगाव तालुक्यांतील तामगावचे चीफ कान्स्टेबल मि॰ अबदुल रहिमान यांजवर अब्रू घेतल्याच्या फिर्यादी दोन मारवाड्यांनीं केल्या होत्या. त्यांत बारिस्टर व नामांकित वकीलही फिर्यादीतर्फे होते. मुकद्दमा मे॰ दस्तुर बहिमनजी साहेब यांपुढें चालला होता. पोलिसचे असिस्टंट सुपरइंटेंडेंट मि॰ हाबसन साहेबही हजर होते. च्यार्ज ठेवण्याजोगा पुरावा न दिसल्यावरून चीफ कान्स्टेबल यांस डिश्चार्ज केलें. शहर सफाईचे कामीं ३४वे कलमबरहुकूम चीफ कान्स्टेबल हे मारवाडी मजकूर यांस रस्त्यावरील हेंदर काढण्याविषयीं सांगण्यास आले असतां त्यांनीं बहुत अपशद्ब बोलून अब्रू घेतली अशी फिर्याद होती.

---

**बदनमाळ**— एथील लोकप्रिय पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. कृष्णराव सखाराम यांची बदली उमरावतीस झाल्यामुळें एथील आबाल वृद्धांस फार दुःखास कारण झालें. त्यांचे सन्मानार्थ पुस्तकालयांत सभा भरली होती. त्यावेळीं हेडमास्तर यांणीं मराठीमध्यें चांगलें सभाषण केलें. नंतर डिपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर हे बोलले मग कृष्णराव यानीं सर्व मंडळींचा वियोग होणार ह्मणून खेद प्रदर्शित केला; व सरते शेवटीं रा. रा. विठ्ठल नारायण एथील एक्झिक्युटिव् इंजिनियरचे आफिसांतील क्लार्क, यांनीं इंग्रजीमध्यें सुरस भाषण केलें. पुढें पानसुपारी, अत्तर, गुलाब हारतुरे वाटून सभा विसर्जन झाली.

जुलाई अखेर आठवड्यांत इकडे पर्जन्य चांगला पडला. त्या आलीकडे पाऊस नाहीं, पण पिकें चांगलीं आहेत. व रोगराई कांहीं नाहीं.

---

उमरावती ता. ६ या आठवड्यांत एक दोन पाऊस पडले. अकाश हमेश ढगानीं अच्छादित असतें. हवा गार आहे. ताप खोकल्याचा थोडा आजार आहे.

बदल्या—उमरावतीचे पोलिस इन्स्पेक्टर मि. दुनियासिंह यानां मोर्शीस, तेथील मि. शाहामहमदखा यांस यवतमाळास व तेथील पो. इ. रा. रा. कृष्णराव सखाराम यांस उमरावतीस बदलले. प्र. सि.

---

## जाहिरनामा.

वऱ्हाडांतील रेलवे स्टेशनावर माल ठेवण्याचे जागीं व्यापारी लोकांनीं धान्य किंवा इतर माल ठेविला असून तें धान्य किंवा तो माल रेलवेकंपनी हल्लीं पाठवूं शकत नाहीं, तसे मालास किंवा धान्यास गैरसोय किंवा नुकसान न व्हावें ह्मणून या जाहिरातीनें सर्व व्यापारी व इतर लोकांस असें कळविण्यांत येते कीं तसेप्रकारचे धान्यावर किंवा मालावर कांहीं छावणी व्हावी किंवा इतर रीतीनें त्याचें संरक्षण व्हावें याकरितां लोकांनीं डिपुटी कमिशनर अकोले, उमरावती व बुलढाणा यांजकडेस अर्ज केला असतां मदत मिळेल. मदत कोणते शर्तीवर मिळेल याजविषयीं डिपुटी कमिशनर साहेबांकडे अर्ज केला असतां कळेल.

कमिशनर कचेरी उमरावतीतारीख ३ आगष्ट १८७७ } J. G. Bell आफि॰ कमिशनर H. A. D.

---

## वर्तमानसार

### लढायी.

गेल्या आठवड्यांत प्लेवना एथें मोठी लढाई होऊन रशियन लोकांचा पराभव झाला व त्यांस तें स्थळ सोडून मागें जावें लागले. व त्यांचें नुकसानही पुष्कळ झालें. तुर्क लोकांच्या लिहिण्यांत रशियाचे ८००० लोक मेले व २४००० जखमी झाले असें आहे. रशियन ह्मणतात कीं, आमचे ५००० लोक जाया झाले. तरी आजपर्यंत झाल्या लढायांतही लढायी फार मोठी झाली यांत संशय नाहीं तुर्क लोकांची सरशी झाल्यावरून ते बऱ्याच उत्साहांत आहेत. व बालकान पर्वताचे तीन दरवाजेही त्यांनीं रोखले आहेत. आतां रशियन फौजेच्या दोन्ही बाजूस टर्कींचा मारा आहे. रशियानें ही १९०००० फौज आणली दुब्रोज्यास बोलाविली आहे व ती डान्यूब नदी उतरून पलीकडे चालली आहे आतां पुढें काय होतें पाहू.

मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडला आहे सबब ते प्रांत स्वतां जाऊन पहावे अशी व्हाईसराय साहेबांस इच्छा झाली आहे व त्याप्रमाणें ते १४ वे तारखेस सिमल्याहून निघणार व नीट पुण्यास येणार व पुढें मद्रासेकडे जाणार. लवाजमा बरोबर फारसा न घेतां केवळ घरगुती बेतानें व्हाईसराय साहेब हा प्रवास करणार व एक महिन्यानें परत जाणार आहेत. आह्मी इच्छितों कीं दुष्काळ संबंधी लोकांच्या सर्व विपत्ती ते स्वतां पाहून त्यांचा उत्तम प्रकारें परिहार करितील. पुण्याची सार्वजनिक सभा त्यास अड्रेस देणार आहे.

गायकवाड सरकारास अमदाबादेहून पालनपुरापर्यंत रेल्वे करण्यास हिंदुस्थान सरकारची परवाणगी मिळाली. या रेल्वेची रुंदी मोठी ह्मणजे ५॥ फूट धरणार.

येरंडोल एथील मुनसफास पैसा खाल्ल्याच्या आरोपावरून सरकारानें कांहीं दिवस सस्पिंड केलें होतें. आतां असें समजतें कीं हा खटला हायकोर्टपर्यंत जाऊन मुनसफ यांनीं एक दिवस काम पाहून पुढें पेनशन घ्यावें असा ठराव झाला.

अमेरिकेंत न्यूयार्क एथें नवीन स्टेशन उघडलें. हें स्टेशन सर्व पृथ्वींत मोठें आहे. प्लाटफार्मची लांबी १५०० फूट व आंतील जागा ७०० फूट लांब व २३४ फूट रुंद, उंची ९० फूट आणि एकंदर प्लाटफार्मचें क्षेत्रफळ १,७१,९११ फूट आहे.

---

## नोटिसा

अबदुलखां वल्लद मुजफरखां मुसलमान रहाणार मौजे रेल तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून उर्दूअखबारांतील नोटिसीचे उत्तर देण्यांत येतें कीं शराकत तिळाची होती नवसाची मुळींच नाहीं. तिळांत आमचा हिसा तिसरा असून असा करार ठरला होता कीं रकम तुह्मी द्यावी व आह्मी खटपट करावी त्याप्रमाणें आह्मी अकोलें येथें जाऊन माल खरिदी केला व तुह्मी कराराप्रमाणें रुपये आणून दिले व माल मोजून घेतला व रेल येथें नेला आमचे हिशाचाही माल तुह्मींच नेला पुढें तुमचा आमचा अपसात बिघाड आला तेव्हा तुह्मास आह्मी पुष्कळ वेळां ह्मटलें कीं आमचा माल आह्मास द्यावा. परंतु तुह्मी न ऐकतां तुह्मीच माल विकला याजला दहिहांडा येथील दहा भले मनुष्य साक्षिदार आहेत व माझे रुपये तुमचेकडे आहेत ते खाली लिहिले प्रमाणें

१५० नथुरामचे जवारी बद्दल
२० जानजी माळी याचे जवारीबद्दल
९।=पोतीं २५ गुजराथ्याचे दुकानचीं
११ सवद्याबद्दल
२५ मारुतीचे जवारीबद्दल
२६ नवाजखान मास्तरचे नवारीचे नफ्याबद्दल
६। पोतीं १०

२४७॥=

सदर्हू प्रमाणें माझे रुपये तुमचेकडे आहेत त्यांत ५७ रुपये वसूल आहे बाकी अजून देत नाहीं सबब मालाबद्दल व रुपयाबद्दल ही नोटिस तुह्मावर केली आहे. तिळाचा भाव २०० रुपये प्रमाणें देऊन शिवाय व्याजाचेही रुपये तुह्मास द्यावे लागतील याजबद्दल तुमचे कांहीं बोलणें असेल तर अकोल्यास आमचे दुकान आहे तेथें तुह्मी यावें ह्मणजे चार भले व्यापाऱ्यांचे समक्ष तुमचें बोलणें ऐकून रीतीप्रमाणें निकाल ते करितील. याप्रमाणें तुह्मी नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत करावे. कळावें. तारीख ९ आगष्ट १८७८ इ०

(सही) तयबनूर महमद कच्छी वहिवाटदार नूरमहद कच्छी.

---

नोटिस

जनसिंग वल्लद दिपाजी खलेदार रहाणार मौजे कळंब बुजरुख तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे सापत्न बंधू असून आपला बापमेल्यास सात ८ वर्षें झालीं नंतर दोन वर्षें आपण एकत्र होतों पुढें न बनल्यामुळें वेगळे राहिलों वडिलोपार्जीत शेतें बापाचे नावे असलेलीं तुह्मी फक्त वयानें वडील असल्यामुळें ते वेळेस तुमचे नावानें लागलीं असतां ३ ४ वर्षांपासून तुह्मी आह्मास शेताचे वहिवाटीस हरकत करितां व शेतें वाटून मागितलीं असतां देत नाहीं सबब या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटिस पावले दिवसापासून आठ दिवसांत आमचे हिश्शाप्रमाणें जमीन आमचे ताब्यांत द्यावी न दिल्यास आह्मी योग्य कोडतांत दावा करून नोटिसीचे खर्चासुद्धां भरून घेऊ. कळोंव ता. ९ आष्टग सन १८७७ इ.

[ सही ] रामजी वल्लद दिपाजी बेलदार निशाणी खुद्द हातची

---

नोटिस.

खिंतुपराया रहाणार मंदर प्रगणे वणी यांस पिसी मर्द खितुपराया रहाणार प्रगणे वणी इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा नवरा असून मी तुझे घरीं राहून रीतीप्रमाणें काम धंदा करावा परंतु तसा प्रकार तुजकडून होत नाहीं याचें कारण तुजकडून मला जें सुख व्हावयाचें तो प्रकार तुजपाशीं मुळींच नसून तूं स्पष्ट पणें बाहेर बोलून दाखवितोस यास्तव पुढें माझा तरणोपाय मी आपले उमेदीत आले सबब होणें नाहीं हा विचार करून मला तूं रीतीप्रमाणें कोणती गोष्ट करण्यास स्पष्ट पणें परवानगी देत नाहींस सबब ही नोटिस तुला दिली आहे तर या नोटिसीचे तारखेपासून १५ दिवसाचें आंत मला रीतीप्रमाणें दुसरा नवरा करण्याची परवानगी द्यावी जर तुजकडून होणार नाहीं तर मी कायदेशीर रीतीनें दुसरा नवरा करीन त्याजवर किंवा मजवर तुझा कोणतेही प्रकारें हक्क किंवा दावा चालणार नाहीं. कळावें तारीख २ आगष्ट सन १८७७ इ०

( सही ) पिसी मर्द खितुपराया वस्ती शिरपुर निशाणी हातची बांगडी

नोटिस.

रा. रा. भगवानसा चुलतसासरा सोनार व लक्ष्मणसा सोनार माझा जेठ वस्ती मौजे तेल्हारे खुर्द तालुके अकोट यांस नोटिस देण्यांत येतें कीं, आनंदी मर्द रामा वल्लद झिंगरसा सोनार वस्ती कसबे तेल्हारे तालुके मजकूर इजकडून ह्या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, आज सरासरी ७।८ वर्षे माझा नवरा नामें रामु सोनार याजवर तेल्हारें एथें चोरीचा आरोप आला होता त्या कारणामुळें तो पळून गेला. त्याचा पत्ता अद्याप पावेतों लागला नाहीं. तो पळून गेले दिवसांपासून मी माझे बापाचें घरीं मोल मजूरी करून आज पर्यंत पोट भरलें. हल्लीं महर्गतेचे दिवस आल्यामुळें माझ्यानें उदरनिर्वाह करवत नाहीं. तरी माझे नवऱ्याचा पत्ता तुह्मांस माहित असल्यास त्याजला आणून माझी व त्याची गांठ घालून द्यावी. पत्ता नसल्यास या नोटिशीचा जबाब ८ दिवसांचें आंत द्यावा. ह्मणजे मी आपला घरठाव दुसरा करीन आतां माझ्यानें स्वकष्टानें आपलें पोट भरवत नाहीं. या नोटिसीचें उत्तर वर लिहिलेलें मुदतींत देण्यांत यावें. आजपर्यंत जो माझ्या बापानें मज प्रीत्यर्थ खर्च केला आहे तो देण्याची तजवीज ठेवावी. कळावें तारीख ३० माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) आनंदी मर्द रामा सोनार वस्ती तेल्हारें निशाणी हातची बांगडी.

---

नोटिस.

सोनबा कृष्णाप्पा तगडपलिवार मोरथकर तालुके पुसद जिल्हा वाशिम यांस खाली सही करणार याजकडून नोटिसीनें जबाब देण्यांत येतो कीं, तुमचा आमचा देवघेव संबंधी कांहींच वेव्हार नसतां तुह्मी तारीख २९ जुलै सन १८७७ चे वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांतून आह्मांस नोटिस दिलीत त्यांत जवारीच्या सौद्याबद्दल नुकसानीचे रुपये मागतां याचें कारण काय तें समजत नाहीं. तुमचे इच्छेप्रमाणें तुह्मी पाहिजे त्या कोर्टांत फिर्याद करावी. तुह्मी विनाकारण आह्मांस नोटिसीनें जबाब देण्यास तसदी दिलीत सबब कळविण्यांत येतें कीं, पंध्रा दिवसाचे आंत नोटिसीचे खर्चाचे रुपयांचा आमचे दुकानी येऊन फैसल केल्यास बरेंच आहे नाहींपेक्षां थोडक्या कामाकरितां सरकारमार्फत नोटिसीचा खर्च तुह्मांकडून भरून घेतला जाईल कळावें तारीख ४ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

( सही ) नरसाप्पा वहिवाटदार रामकृष्ण नालमवार दिग्रस तालुके दारव्हा जिल्हा वणी.

---

नोटिस.

तुळशी म॰ कुकाजी सवंदळे रहणार मौजे खिरखेडें प्रगणे अडगाव तालुके अकोट इजला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं ता. २९ माहे जुलै सन १८७७ इसवीची नोटिस मला दिली तिचें उत्तर असें कीं, तूं पांच वर्षांची होती तेव्हां माझ्याशीं तुझें लग्न केल्यावरून मला २०० रुपये खर्च लागला व तूं आजपर्यंत माझ्याशीं रीतीप्रमाणें संसार केला हल्लीं तुला परद्वार करण्याचा छंद लागून तूं आज तीन वर्षांपासून अगदी बिघडली व तूं पालमांडीचा व्यवहार करीत गावोगाव फिरतेस आणि आतां दुसरे धगड्याचे ह्मणण्यावरून तूं मजवर तुफान घेतेस कीं तूं मला माय ह्मटलें व मला दुर्व्यसनाचा छंद लागला तेव्हां माझी साक्ष सर्व गावचे लोक देतील कीं मला कोणतें दुर्व्यसन आहे? व मी तुला कधीं माय ह्मटलें? परंतु तुझीही साक्ष सर्व गावकरीच देतील कीं तूं गावोगाव पालमांडीचा व्यवहार करितेस किंवा नाहीं. त्याचा तपशील येणेंप्रमाणें:—

तूं किती एक दिवस मौजे रुधानें व कोण एथें कोण्या पाटलाचे घरांत होतीस व किती एक दिवस कोठें कोठें फिरलीस हल्लीं किती एक दिवसांपासून कसबे अडगाव एथें होती व आतां खिरखेड एथेंही किती एक दिवसांपासून आहेस तेव्हां तूं इतके गाव फिरली तर तुझे कोण लोक सगे होते व तुला जाण्याचें काय काम होतें द तूं कोणाचे आश्रयानें गेली व तूं परद्वार करितेस तेव्हां कोणी उंच नीच पहात नाहींस तेव्हां ज्यापक्षीं तूं उंच नीच पहात नाहींस ह्मणून मजवर तुफान घेऊन फारकत मागतेस ह्मणजे तूं आणखी मोकळें व्हावें असा तुझें मनातून हेतू आहे तर माझे लग्नास लागलेला खर्च २०० रुपये आणून द्यावा व या नोटिसीचा खर्च चुकवून द्यावा या शिवाय तुझे अंगावर डागिने कंपश १०० रुपयांचे आहेत ते दाखल करावे. आणि ह्मणतेस कीं माझा ३ वर्षांचा पोर्ट खर्च १५० रुपये द्यावा तेव्हां तूं कोणतें मोठे माणसाची लेक आहेस कीं तूं एके ठिकाणीं घरांत बसून पोट खर्च खाल्ला तूं तर जंगलची मोकाट असून मजूरी करून पालमांडीपणाही करितेस तेव्हां मी एक पैसा तुझा देवाल नाहीं परंतु माझे शंभर रुपयाचे डागिने व २०० रुपये लग्नाचे खर्चाचे व या नोटिसीच्या खर्चासुद्धां रुपये तुझ्यापासून चुकवून घेतल्याशिवाय मी फारकत देत नाहीं, असें असून जर तूं दुसरा नवरा करशील तर त्याजवर व तुजवर फौजदारींत रीतीप्रमाणें फिर्याद करीन व या नोटिसीनें असें कळवितो कीं ही नोटिस पावल्या दिवसांपासून १५ दिवसांचें आंत उत्तर द्यावें जर तुजकडून १५ दिवसांचे आंत उत्तर न आलें तर ज्याचे घरांत तू रहाशील त्याजवर व तुजवर रीतीप्रमाणें दावा करून खर्चाचे रुपये तुजपासून घेईन. कळावें ता. ४ आगष्ट सन १८७७ इसवी.

( सही ) कुकाजी वल्लद पुंजाजी वस्ती मौजे अडगाव खुर्द दस्तुर सदाशिव व्यंकटेश कुळकर्णी निशाणी खुद्द हातची

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० १९ माहे आगष्ट सन १८७७ इ० अंक ३३

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## जाहिरात.

## नोंदण्याचा कायदा.

ह्मणजे

**सन १८७७ चा आक्ट ३.**

**ह्यावर विशेष समजूत, आणि मुंबई, मद्रास, कलकत्ता व वायव्य प्रांत येथील हायकोर्टांचे फैसले व प्रिव्हि कौन्सिलचे फैसले ह्यांचा सारांश व निवाड्यास परस्पर हवाले.**

प्रत्येक कामाखालीं दिले आहेत. प्रारंभीं उपोद्घातांत सदर्हू आक्ट संबंधी फार उपयुक्त माहिती दिली आहे. हा ग्रंथ रा. रा. व्यंकटराव रामचंद्र वकील यानीं केला आहे. याची किंमत १८८ व टपाल खर्च ८९ एकून एक रुपया दाहा आणे आह्माकडे अगर ग्रंथ कर्त्याकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. महाराज खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या अंकीं जागा देऊन प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

महाराज मी फिरत फिरत पुसद तालुक्यांत पेणगंगा नदीचे काठीं मुळावें ह्मणून एक गांव आहे तेथें गेलों. तों तेथें आषाढीचा विठ्ठलेश्वराचा उत्साह होता. तेव्हां तेथें मी पांच सहा दिवस राहिलों. तेव्हां उत्साहाचे समारंभांत तेथील लोकांनीं नाटकाचे तीन खेळ आठ्वले. तेव्हां ते पाहून मला फारच आनंद झाला. कारण हे लोक मूळचे वऱ्हाडी असून यांची भाषा व नाटकाची शैलीही पुणेंप्रांतीच्या चालीं प्रमाणें होती. या नाटकांत सुमारें २८ मनुष्यें होतीं. त्यांत मुख्य रा. रा. सारंगधर बापुशास्त्री व रा. रा. जयरामपंत भाऊ कुळकर्णी व केशव नाना कोकलवार हे मुख्य होते. ते ह्या कामासाठीं बरीच मेहेनत घेतात. यांचा उद्देश बहुतकरून देशावर निघावें असा दिसतो. ह्यांचा खेळ करण्याचा नमुना सांगलीकर नाटककारासारखा आहे. हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो. कळावें ही विनंती. तारीख १ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

एक फिरस्ता
क्ष.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. अल्प मतीनें प्रथमच केलेल्या कविता शुद्ध करून घेऊन छापण्याची कृपा व्हावी.

( ईश्वरास व विद्वान लोकांस प्रार्थना )

श्लोक— हे वामना गुणनिधे दुरितांतका तूं मातें चारित्र रचण्या अजि बुद्धि दे तूं। दीनापरीसहि तुझा अति लीन दास। दे शीघ्र ठाव हरि मी नमितों पदास ॥ १ ॥ गीति— पहिलीच वेळ ह्मणुनी वाटे कविता करावया भीती। परि बा तुझे दयेनें भीती नासून दाविजे रीती ॥ २ ॥ माझें मानस घेई कविता करण्यास ओढ हो फार। ह्मणुनि करी यथामति देतिल विद्वान ईस आधार ॥ ३ ॥ वर्णन दुष्काळाचें देतों सुज्ञास आज मी धैर्यें। असल्या जरि यांत चुका क्षमुनि मला सांगिजे तुह्मी आर्यें।४। दिंडी— शहर इंग्लंडीं लंडनाख्य साजे राज्ञि विक्टोरिया जेथ कीं विराजे। या भरतखंडीं करी राज्य तीच। सूख देई हो सकळास नित्य साच ॥ ५ ॥ ॥ केका — सुशील अणि सुज्ञसे सुजन नेमि कामावरी प्रजेवरि दया अणी बहुत लोभ ती हो करी ह्मणे घडलिया विना चुकि नची कुणा दंड हो। फितूर अणि बंड हीं असति जाहलीं बंद हो॥६॥साक्या—तारायंत्र वन्हीरथही तिकडुनि इकडे आले। या राज्यामधि अहो तयानीं बहुत फायदे केले।७। यापासुन हो व्यापाराला कसा फायदा झाला। माल तिकडचा इकडे आणुनि इकडिल तिकडे नेला ॥ ८ ॥ अशा रितीनें जागजागच्या वस्तु मिळती लोकांशी। या राज्याचें वर्णन करण्या अशक्तता वाचेशी ॥ ८ ॥

लोकस्थिति व धान्याचे भाव. लावणी.

[ मृच्छकटिक नाटकांतील वसंतसेना नायिकिणीचा वाडा० या चालीवर ]

इंग्लिश राज्यापासुन लोकां सौख्य बहु जाहलें। नव्हते हो कधीं असें राहिलें ॥ या राज्यामधिं कुणी कुणावर न करी कधीं जूलूम ॥ दिधली स्वतंत्रता बेमालुम ॥ धर्माविषयीं कधीं आपुल्या करित नसे भूपती। घेण्या जुलूम लोकां प्रती ॥ परी शहाणे स्वतंत्र आह्मी ह्मणुनि देति सोडुनी। धर्म आपुला दुसरा स्वीकारुनी ॥ संध्यास्नान ब्रह्मकर्म हीं सर्व अतां सूटलीं। बाटली अग्रगण्य वाटली ॥ वेदांचीं पुस्तकें इंग्रजींत सर्व छापलीं। प्राकृत ही किति करानि ठेविली ॥ यवन अनामिक इह वेदी करिती वेद घोषणा। द्विजांनीं रिलि अंगना ॥ द्विजांगना त्या जार ठेविती पतीस धिक्कारिती। मुलें बापातें मारिती। अइला रांडे खांडे अशा दुर्वाक्यें अळविती ॥ काय सांगावी हे स्थिती॥ पती ह्मणतसे प्रीति करुनी अपुल्या कांतेवरी। माझा प्राण तूंचि सुंदरी। परी तिच्या तो मना येइना जारकर्म ती करी। पतीला दूर करी नोवरी ॥ तरुणी जारकर्मि राहिल्या। वृद्ध पतिव्रता जाहल्या ॥ चाल पहिली ॥ जशा जारिणी तशि ढोंगेही बहुत माजलीं। अशक्त साधुचीं वृंदें जाहलीं। अशी स्थिती बघुनि वाटतें देव मज कोपला ॥ ह्मणुनि काळ दूत धाडिला ॥ चाल ॥ काळ अल्यावर जिकडे तिकडे कशि झाली गर्दी। पोट भराया भाकर कोणा नसे पाव अर्धी। पाउण रुपाया जागिं ज्वारिला साडेपांच लागती। मणभराहि गहूं नवा वीकती। ऊकरा बारा तांदुळ असुनी डाळ तुरीची दहा। हरभरे सात रुपाया पहा। उडिद सातही मसूर नाहीं तुपा आठ लागती। दूध रुपाया आठ शेर वीकिती। तेल चार अणि खजुर खोबरें भाव तोच साखरी, गुळ अडिच तशी विकिति हळद दूसरी। अशा संकटापासुनि वाचू नसे अह्मा खातरी। कृष्णा होई झडकर तरी। तरी होउनी तार अह्माला काळसमुद्रांतुनी किती बघसि अंत कसा लावुनी। अह्मी सकळही दीन अरे तूं दीननाथ ह्मणविशी। मग कसें न जग तारिशी॥ जरी जहाल्या चुका तरी त्या क्षमा करुनिया हरी। अह्माला तार दुःखसागरीं ॥ १० ॥

दुष्काळानें लोकांची झालेली स्थिति, त्यांचा विलाप, व ईश्वराशीं करुणास्वरानें भाषण.

केका—गदारिदरनंदकांबुजधरा अरे माधवा कसें न जग तारिशी बुडतसे खरें केशवा। अशा समयिं तारण्या तुजविना नसे कोणि रे दुकाळ तव दुत हा सकळ मारितो विश्व रे ॥ ११॥ दुकाळ जगिं हा कसा हरि तुवा असे धाडिला। तयें प्रभु पहा कसा जगिं विलास तो मांडिला ॥ मुलें त्यजुनि जातसे जननि दूरदेशावरी। अतर्क्य करणी तुझी मज गमे प्रभो श्रीहरी ॥ १२ ॥ मालिनी वृत्त — कठिण कृति तुझी हे भासते वसुदेवा। सकल जगहि तूतें रक्षणें भाग देवा ॥ उलट करिशि कैसे तूजवाचूनि बाया। जनक, जनानि नाहीं रुक्मिणीवाचुनीया ॥ १३ ॥ वसंततिलका ॥ काळें जगीं बहुतही मधुकैटभारी। श्रीपंत ते बनविले बहुशा भिकारी ॥ उद्वस्त गाव शहरे हि तशींच केलीं। माता सुतें दिखिल बाहिर घालवीली ॥ १४ ॥ सर्वांपरीसाहि असे प्रियरूपखाणी। कांता तिचीहि पतिला पडली शिराणी ॥ सर्वांप्रतीहि पडली प्रभु आज चिंता। तारी जनास सखया अजि एकनाथा ॥ १५ ॥ गीति— देवा तुझी मलारे।भासतसे कोपदृष्टि जगिं साच पर्जन्यवृष्टि ह्मणुनी नाहीं केलीस गोष्ट ही साच ॥ १६ ॥ आतां प्रभो दयाळा आह्मावरि फेक तूं कृपा लहरी। अपराध पोटिं घाली माफ करी एकदां जगा तारी १७॥ साक्या— काय तुझ्या बा अपराधातें केलें याच जगानें।जयासाठिं तूं काळदूत हा धाडिलास रागानें १८॥ दुष्ट तुझा हा दूत काळ रे आटोपी या लागी। जरी मारणें तुझ्या मनामधिं तूंच मारि कां वेगी ॥१९ गदा सुदर्शन तुझीं आयुधें असति तुझ्या हातांत ॥ स्वतां मारण्या रुकळ जगा तूं भीशी कां चित्तांत ॥ २० ॥ धाव पाव तूं सख्या दयाळा लक्ष्मीवाचुनि माता ॥ या समयासि पिताहि नाहीं तुजवाचुनिया त्राता ।२१॥ कां न येशी तूं सख्या दयाळा वाटे मज दुजि जाया ॥ केलि असे कीं, अणी तिनेंही मोड दिला तुज याया ।२२॥ सवतीसुत अह्मि तिचे ह्मणूनी तीच आमुते[illegible]री। परी तिला तूं कशी मदत वा केली ही कंसारी२३ शार्दू. वि.—कांते तूं मज सोडिलेस सजणें ऐसें कुणी बोलतो। कोणाचा सुत कोणि बंधुकरितां शोकेंच आक्रंदतो ॥ ऐसा हा अपकारकारक महा दुष्काळ तूं पाडिला ॥ जेणें ताप बहू महीवरि जना दीनाप्रती दीधला २४। विबुधप्रिया— दीन तारक दुःख हारक जाणशी जगजीवना।नाव होउनि दुःखसागरीं तारि तूं रघुनंदना ॥ तूं जरी न पावशी तरि मारितो जग काळ हा ॥ धाव पाव रमाधवा अजिं दुःख निवावि हें महा ॥ २५ ॥

तारीख ३ आगस्ट सन १८७७ इ० } एक क्ष.

## वसूल

| | |
|---|---|
| रा. रा. मारुती पाटील दहिहांडेकर | ६८८ |
| ,, ,, बाळाजी कोंडेश्वर देशपांडे | २१ |
| ,, ,, सेक्रेटरी नेटिव लायब्ररी | ६८८ |
| ,, ,, सदाशिव झिंगराजी पाटील | ३ |
| ,, ,, मनुलाल मुळचंद गुजराथी | ६८८ |
| ,, ,, चिंधाजी पाटील निमकर्देकर | ६८८ |
| ,, ,, गणेश भास्कर हेडमास्तर | ६८८ |
| ,, ,, आत्माराम गुणाजी | ६८८ |
| ,, ,, दिनानाथ गोपाळ साहू | ६८८ |
| ,, ,, गोविंदा वल्लद राजवा | १८८१२ |
| मे. शाबासखान तहशिलदार | १३ |
| ,, बाकिरअली तहशिलदार | २९८४ |
| रा. रा, रामराव मुकुंदराव देशमुख पातुर्डेकर | ६८८ |
| ,, ,, गणेश बल्लाळ असिस्टंट मास्तर उमरावती | १० |
| ,, ,, गोपाळ रामराव हेडमास्तर शेंदुरजण | ६८८ |

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुध्द ११ शके १७९९

## सिमल्याविषयीं माहिती.

आमचे वाचकांस सिमला हें नाव ठाऊक असेल, आपले वऱ्हाडचे कमिशनर साहेब बरेच महिने सिमल्यास गेले आहेत, आपले राव बहादूर डायरेक्टर साहेब नुकतेच सिमल्याहून आले, व साऱ्या हिंदुस्थानचें मुख्य सरकार व्हाईसराय व गवरनर जनरल हे वर्षांतून सात महिने सिमल्यास असतात म्हणून असें विशेष सिमल्यास काय आहे तें कळण्याविषयीं साहजिकच वाचकांस उत्सुकता होईल व त्याप्रमाणें आम्हासही झाली म्हणून पाहून आलेल्या गृहस्थांस आम्ही कांहीं माहिती विचारिली व कांहीं माहिती ग्रंथावरून मिळविली ती वाचकांस सादर करितों.

सिमल्यास जाण्याला मुंबाबेहून जबलपुरमार्गे अलाहाबादेस जाऊन मग वायव्य दिशेस दिल्ली आग्रा इकडून अंबल्यापर्यंत जावें लागतें. तेथें आगगाडीचा मार्ग संपतो. मग तेथून घोड्याच्या गाडींत बसून जावें लागतें. अंबल्याहून ३८ मैल कालका आहे तेथपर्यंत रस्ता चांगला आहे मग डोंगरवट रस्ता लागतो. कालक्याहून बहुत लोक घोड्यावरून जातात, बाकी तांग्यावरून व खुर्चीला बास बांधून तिजवर बसूनही जातात. कालक्याहून सिमला ६० मैल आहे. तरी डाकेचे तांगे ७।८ तासांत जातात. सिमला समुद्राचे पृष्ठ भागापासून ८००० फूट उंचीवर आहे. कलकत्याहून सिमला १००० मैल व मुंबईहून १४७० मैल आहे. अंबाल्याहून पुढें जाऊं लागलें ह्मणजे सिमल्याच्या डोंगराचा देखावा फार नामी दिसतो. एप्रिल महिन्याच्या सुमारास गवरनर जनरल साहेब आपल्या परिवारासह सिमल्यास जातात. व अक्टोबर अखेरपर्यंत तेथें रहातात, इतक्या सुमारांत अनोळखी मुशाफर सिमल्यास जाऊं ह्मणेल तर त्यास वाहन वगैरे मिळण्याची पंचाईत पडते व ऐन उन्हाळ्याचे हंगामांत कितीही किंमत दिली तरी वाहन मिळत नाहीं.

सिमल्यास Earthly Paradise ह्मणजे इहलोकींची स्वर्गभूमी असें नाव दिलें आहे यावरून हें स्थळ युरोपियन लोकांस किती आवडत असेल याची कल्पना करावी. याचा पहिला इतिहास आहे तो असा:—

सन १८१७ मध्यें सतलज नदीच्या खोऱ्याची पैमाष करणारे जिरार्ड या नावाचे दोघे भाऊ भाऊ युरोपियन होते त्यांनीं प्रथम हें स्थळ पाहिलें. व एथें वस्ती झाल्यास एथील हवा पाणी युरोपियन लोकांस उत्तम प्रकारें मानवेल असें त्यांनीं आपलें मत प्रसिद्ध केलें. त्यावरून सन १८२२त या प्रांतावरील पोलिटिकल एजंट यांनीं तेथें एक बंगला बांधिला. व त्यांनांहि तेथील हवापाणी उत्तम वाटल्यावरून त्यांनीं सरकारास लिहिलें त्यावरून सन १८२३त तो टापु कैंथळच्या राण्याच्या ताब्यांत होता त्याजपासून इंग्लिश सरकारानें आपणाकडे घेतला व राण्यास बदल्यांत दुसरा मुलुक दिला. नंतर सन १८२८ सालीं गवरनर जनरल लार्ड आ[illegible] हे पहिल्यानें जाऊन सिमला पाहून आ[illegible]. सन १८३१ सालीं तेथें ६० युरोपियन लोकांची वसाहत झाली. सन १८४१ त लार्ड अकलंड यांनीं उन्हाळ्यांत सिमल्यास जाऊन वस्ती केली होती. पुढें पंजाब प्रांत इंग्लिश सरकारचे ताब्यात आल्यावर सिमल्याचें वैभव अधिक धिक वाढत चाललें. लार्ड डालहौसी गवरनर जनरल होते त्यांना सिमल्याची हवा फार मानवत असे व त्यामुळें उन्हाळ्यांत ते तेथें आपलें सदर स्टेशन करून राहाण्यास फार इच्छित असत. पुढें लार्ड लारेन्स यांस गवरनर जनरल नेमतांनां त्यांनीं ठरवूनच घेतलें होतें कीं दरसाल उन्हाळ्यांत मला सिमल्यास रहाण्याची परवानगी द्याल तर मी गवरनर जनरलची जागा पतकरतो. मग तेव्हांपासून हरएक गवरनर जनरल एप्रिल तागाईत अक्टोबर पावेतो सात महिने सिमल्यास राहू लागले. सन १८७४ त बंगाल्यांत दुष्काळ पडला होता तेव्हां मात्र गवरनर जनरल कलकत्त्यास होते.

सिमल्याची वस्ती मोठ्या शहराप्रमाणें टुमदार नाहीं. येथें एक बंगला तर १०० हातावर दुसरा बंगला. तसेंच एक बंगला या टेकडीवर तर दुसरा दुसरे टेकडीवर अशी सिमल्याची वसाहत आहे. तेथुन शेंडीडशें मैलावरचे बर्फाचे डोंगर शुभ्र शर्करेचे ढीग याप्रमाणें मोठे सुरेख दिसतात. साहेबलोकांचे साहचर्यानें तेथें नेटिव लोकांची वस्ती पुष्कळ आहे व बाजारही मोठा आहे पण स्वच्छता चांगली नाहीं, आणि पाण्याचें फार तापत्रय आहे. आमचे रा. ब. डायरेक्टर साहेब गेले होते त्यांचे सांगण्यांत आलें कीं डोंगराखालून सुमार एक कोसावरून पाणी आणावें लागतें व तेंही चांगलें निर्मळ नसतें. तेथें अन्नाला विशेष रुचि नाहीं, व भूक चांगली लागत नाहीं, दूध, दही, लोणी चांगलें मिळत नाहीं, भाजीपाला, गवतकाडी, व दूध दुबतें सर्व खालून लांबच्या गावाहून येतें. हवा थंड आहे. वारा कमी असतो. मातीचा रंग पिवळट आहे. शहरांत रस्ते चढउताराचे असल्यामुळें गाड्या, बग्या, शिग्राम वगैरे नाहींत, घोड्यावरून साहेब लोक हिंडतात. तेथें बर्फ पडत असतें तें स्वच्छ पिंजलेला कापूस याप्रमाणें जमीनीवर दिसतें. घर बगीच्या वगैरे साफ ठेवण्याकरितां जसे नोकर असतात तसे बर्फ झाडून काढण्याकरितांही तेथें नोकर ठेविलेले असतात. ते घरावरून व जमीनीवरून बर्फ झाडून जागा साफ करितात. नुकतेच एप्रिल महिन्यांत सिमल्यास पुष्कळ बर्फ पडलें होतें त्याची मे अखेर पावेतो निशाणी होती. कधीं च्यार च्यार महिने ही बर्फ राहतें. चांगल्या हंगामांत युरोपियन लोक सुमार १५०० पर्यंत तेथें जमतात. स्थाईक नेटिव ह्मणण्यासारखे कोणी नाहींत, व्यापारी लोक[illegible]गैरे आहेत ते [illegible]डत, मुनशी, [illegible], व बू हेच आहेत. [illegible] [illegible]ल्यास कामाची घडामोड मोठी, [illegible]कवा व्यापार उद्योग, अथवा कसले कारखाने आहेत असें नाहीं. ऐश आराम, मौज, खेळ, मेजवान्या हींच तेथें विशेष. सरकारी कामाचे संबंधानें तेथें जें घडतें तें बाहेर दुसरे शहरांतून आधीं समजतें पण सिमल्यास रहाणारास समजत नाहीं.

याप्रमाणें सिमल्याची हकीकत आहे. कलकत्याकडील लोकांस गवरनर जनरल यांचें सिमल्यास रहाणें आवडत नाहीं. व विलायत सरकारानेंही तेथें दरसाल अर्ध्याहून अधिक काळ हिंदुस्थान सरकारचें सदर स्टेशन हमेशा रहावेंच अशी आपली संमति दिली नाहीं. कारण तें स्थळ एका कोपऱ्यांत आहे, व तेथें वस्ती वाढत चालल्यानें सुखसोयींत बदल होईल कीं काय असाही संशय आहे. झऱ्याचें पाणी उत्तम असतें पण त्यावर पावसाचें पाणी पडून तें वस्तीच्या दाटीमुळें बिघडतें. चांगलें पाणी व स्वच्छतेच्या चांगल्या सोयी तेथें करण्यास सुमार १० लक्ष रुपये पाहिजेत व ते सरकार देईल किंवा नाहीं याविषयीं संशय आहे. घरंदाज लोकही पाण्याची सोय करून घेतील परंतु सदर स्टेशनचा त्यांस कांहीं भरवसा नाहीं ह्मणून ते कांहीं खटपट करीत नाहींत असा प्रकार आहे.

---

## मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांचा स्तुत्य उद्योग.

आमचे वऱ्हाड प्रांताला मे० दस्तुर बहिमनजी साहेबासारखे पोक्त, उद्योगी, दयाळु, लोकांच्या बऱ्याकरितां स्वतांला झीज घेऊनही झटणारे असे सरकारी अधिकारी आहेत ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. वऱ्हाडांत इंग्लिश सरकारचा अंमल झाल्यापासून ते इकडेच सरकारी नोकरीवर आहेत तेणेंकरून त्यांस सर्व प्रकारची उत्तम माहिती झालेली आहे. व रयतेंत ते फार मिसळून वागतात यामुळें हरप्रसंगीं त्यांच्या शब्दानें जशीं मोठमोठालीं कामें होतात, तशीं दुसऱ्या थोड्याच गृहस्थांकडून होतील. 'काडी तर न मोडावी आणि डाळा तर न फुटावा " अशा सारखें लोकांचें आणि सरकारचें बरें ह्मणवून घेण्याकडे त्यांचें सर्वकाल लक्ष्य असतें ह्मणून ही त्यांची खुबी वर्णन करण्यासारखी आहे यांत संशय नाहीं.

गुदस्तां मुंबई इलाख्यांत मोठा दुष्काळ पडला तेव्हां इकडून त्या प्रदेशास कांहीं मदत करणें अवश्य आहे असें पाहून या गृहस्थांनीं गेल्या नोव्हेंबर महिन्यांत मोठी सभा भरविली व लोकांस द्रव्यद्वारा सहाय करण्याविषयीं स्वतां व्याख्यान दिलें. व ती त्यांची मनापासूनची कळकळ लोकांस इतकी रुचली कीं त्या कामाची सुमार १९०० रुपयांची वर्गणीची यादी झाली. इतक्यांत दोन महिने ते आजारी पडले व पुढें हवा बदलण्यास पुण्याकडे गेले ह्मणून त्या फंडाचें काम पुढें चांगलें चाललें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे, तरी रजेवर जाण्यापूर्वीं दुष्काळाच्या भागांत ५०० रुपये पाठविण्याची त्यांनीं तजवीज केली.

सदरील सभेचा उद्योग त्या काळीं आमच्या प्रांताच्या बाहेरील दुसरे मुलखातील लोकांकरितां होता व त्यास थोडेच महिने झाले तों परमेश्वराच्या अवकृपेचें तेंच वक्र आमच्याही प्रांतावर येण्यास डोकावित आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे! अजून परमेश्वरानें दया केल्यास बलवकर पर्जन्य पाडिल्यास हें अरिष्ट टळण्या जोगें आहे ह्मणून त्याला कठिण हृदय न होण्याविषयीं आह्मी सोत्कंठ प्रार्थितों व त्याची करुणा भाकितों.

वाचकहो, गुदस्तांच्या दुष्काळाचे पुरे बारा महिने तिकडील लोकांनीं कंठिले तरी पण चालू वर्षींही मेघराजानें यथेच्छ कृपा केली नाहीं त्यामुळें तिकडे दहशत असून हिंदुस्थानच्या दुसऱ्याही पुष्कळ भागांत पर्जन्याची ओरड आहे. व रेलवे कंपनीकडून व्यापारी लोकांचें धान्य वक्तशीर जाऊन पोंचत नाहीं यामुळें धान्याचे दर सर्वत्र मनस्वी चढुन मोठा हाहाःकार उत्पन्न झाला आहे व पुढें कसें होईल याची प्राणिमात्रास काळजी उत्पन्न झाली आहे व ते घटके घटकेस आकाशाकडे पहातात व अश्रू गाळतात पण त्या निर्दयाला पाझर फुटत नाहींत ! काय हा कठीण प्रसंग !

हल्लीं लोकांची स्थिति फार बिकट झाली आहे. ज्या अकोल्यास २० रुपयांनीं खंडी जोंधळे मिळत तेथेंच आतां ९० रुपयांनीं खंडी झाले आहेत व याच मानानें बाकीचे सर्व जिन्नस महाग झाले आहेत. आणि गरीब मोल मजुरी करणारास तीन आणे मिळत असत ते आतां दोन आणेही मिळेनासे झाले व दोन शेर जोंधळ्यास तीन आणे पडूं लागले तेव्हां अशा महागाईच्या कडाक्यांत गरीब लोकांचें उदरपोषण व्हावें कसें ? याची परमेश्वरानेंच आतां काळजी केली पाहिजे!

गेल्या महिन्यांत अठरा पैशानीं पायली जोंधळे होते तेव्हां तितक्या महागाईंत ते घेण्यास आह्मास पुरवत नाहींत व आमचा उपासमारा होतो असें ह्मणत व आक्रोश करित, बायका मुलें व पुरुष अशीं तीन चारशें मनुष्यें मिळून मे० दस्तुर बहिमनजी साहेबांचे पुढें जाऊन दंडप्राय पडलीं व आमचे प्राण वाचवा असें ह्मणून आकाशाकडे तोंडें करून एकसारखीं रडूं लागलीं तें पाहून ते अतिशय कळवळले व त्यांचाही कंठ दाटून आला. आणि त्याच पायीं त्यांनीं बाजारांत जाऊन व्यापारी लोकांस असा बोध केला कीं सर्वांनीं मिळून कांहीं पैसा धर्मार्थ जमवून स्वस्त दरानें जोंधळे विकण्याचें एक दुकान घालावें. त्याप्रमाणें तें दुकान चालू करून बारा पैसे पायली या भावानें गोरगरीबास

धान्य विकण्याची एथें सुरुवातही झाली. हा मजकूर दोन आठवड्यापूर्वीं आह्मी प्रसिद्ध केलाच आहे. व हीं यांची प्रसिद्धी बाहेर कळल्या बरोबर गेल्या आठवड्यांत हे शिगावास व बाळापुरास गेले होते तिकडील गोरगरिबांनींही यांच्या बंगल्यावर जाऊन धरणें घेतलें. तेव्हां तेथीलही व्यापारी व इतर गृहस्थास त्यांनीं बोध केला व त्यांचीं मनें त्या कामीं उपतिष्ठित करून रुपये जमविले व दोन्ही ठिकाणीं स्वस्तदरानें धान्य विकण्याचें एकेक दुकान त्यांनीं स्थापन केलें. शिगावेंच कित्येक व्यापाऱ्यांनीं प्रत्येकी १०१ रुपये दिले तेणेंकरून १२०० रुपये एका बैठकीस जमले व अजून हजारभर जमतील असें आहे. बाळापुरास या कामाकरितां १३०० रुपये जमा झाले आहेत. अकोल्याचे दुकानाकरितां ही चांगली मदत मिळावी ह्मणून ते खटपट करण्याच्या प्रयत्नांत होते व शुक्रवारीं मोठी सभा भरणार होती इतक्यात मे० डिपुटी कमिशनर साहेबांकडून त्यांस याच कामाकरितां खामगावास जाण्याचा हुकूम झाला व त्याप्रमाणें शुक्रवारींच ते तिकडे गेले. तिकडेही मोठी रकम जमवून आजकाल त्यांनीं स्वस्तें दुकान सुरू केलें असेल यांत संशय नाहीं.

हा केवढा मोठा उद्योग असून किती परोपकाराचा आहे ! व याजबद्दल मे० दस्तुर बहिमनजी साहेबांची किती स्तुती करावी ! शाबास त्या पुरुषाची ! व धन्य त्याच्या खटपटीची ! परमेश्वर यास अशा सत्कृत्यांत निरंतर यश देवो ! बरें, या सर्व खटपटींत यांच्या पदरास झीज किती लागली ती आपणास ठाऊक आहे काय ? अकोल्याच्या सभेंत त्यांनीं स्वतां २०१ रुपये व चिरंजीव आणि जावई यांजबद्दल ९० रुपये दिले. शिगावास १०१ रुपये दिले, बाळापुरास दिले, अकोल्यास दुसरी सभा झाली तेव्हांही मोठा आकडा त्यांचा होता, खामगावासही ते पुष्कळ रकम दिल्यावाचून रहाणार नाहींत. शिगावास पहिले दिवशीं तर सुमार ४०० मनुष्यांस त्यांनीं पदरचें धान्य दिलें. तेव्हां या सर्व रकमा एकत्र जोडल्या तर बहिमनजी साहेब नुसतें परोपदेशीं पांडित्य करितात असें कोणास वाटेल काय? कधीं वाटणार नाहीं. व आह्मी पुन्हाही ह्मणतों कीं, त्यांची शाबास ! व ते धन्य आहेत!

असो. एथपर्यंत चालू स्थितीविषयीं या सर्व गोष्टी ठीक झाल्या. पण पुन्हा पुढचा विचार केला ह्मणजे भयाचा गोळा पोटांत उभा रहातो. कृपाळु परमेश्वरानें उदकवृष्टी केली नाहीं तर या सर्व देणग्या व हे सर्व सदुद्योग किती दिवस कामास येणार आहेत? तसाच दुष्ट कहर उसळला तर प्रत्यक्ष कुबेराचेंही भांडार रितें झालें तरी खाव खाव मोडणार नाहीं. गुदस्तांच्या सपाट्यांत सरकारानें कोट्यावधि रुपये खर्च केले व उदार लोकांनींही लक्षावधि रुपये दिले तरी हजारों मनुष्यें देशोधडीस लागून अन्नान्न करून मरण पावलीं व त्यांचीं प्रेतें रस्त्यांवर पडून कोल्ह्या कुतऱ्यांनीं खाल्लीं. एकट्या मद्रास इलाख्यांत गेल्या सात महिन्यांत ९ लक्ष मनुष्यें मरण पावलीं आहेत हें मनांत आलें ह्मणजे काळजांत धस्स होतें! हर हर! परमेश्वरा, तसा प्रसंग पुन्हा आणू नको ह्मणून तुला साष्टांग प्रणीपात करितों.

---

**लढायी** संबंधी या आठवड्यांत कांहीं विशेष वर्तमान नाहीं. बलगेरियामध्यें पाऊस पडत असल्यामुळें ४ दिवस [illegible] यन फौजेची हालचाल बंद आहे. [illegible] स्थानच्या लोकांचें एक दुष्ट कृत्य लिहून आलें आहे. तें असें कीं, त्यांनीं ख्रिस्ती लोकांची मोठ्या क्रूरपणानें कत्तल केली. ६० गाव जाळले, ३० भजनालयें व ९०० शाळा यांचा विध्वंस केला व सुमार १९००० ख्रिस्ती स्त्रिया, मुलें व पुरुष निर्दयपणानें हाल हाल करून ठार मारिले. युरोपखंडांतील मुसलमानांचीं मनें विद्येनें प्रकाशित असतील व ते असें अमानुष कृत्य करितील असें आह्मांस वाटत नव्हतें पण हल्लींची स्थितिच विलक्षण आहे त्यामुळें जें जें होतें तें तें संभवतेंच.

---

**पर्जन्य**— मोठी काळजी आहे कीं, याही वर्षीं पर्जन्य हातचें सोडील की काय? नागपुर, कोल्हापुर, सोलापुर, पुणें, सातारा, दक्षिणमहाराष्ट्र व कारवाड इकडे पर्जन्य पडला पण नगर, नाशिक, खानदेश, व गुजराथ इकडे मुळींच नाहीं. मद्रास इलाखा गुदस्तप्रमाणेंच, निजाम सरकारचे मुलखांत पर्जन्य नाहीं, आणि वऱ्हाडांतही हाकाहाक आहे व त्यामुळें धान्याचे भाव विलक्षण चढून गेले आहेत.

झांशीकडे अजून पेरण्याही नाहींत कारण पाउसच पडला नाहीं. मद्रास इलाख्यांत कांहां भागांत बारा बारा कोस प्यावयास पाणी मिळत नाहीं. मग धान्याविषयीं काय पुसावें !

रेलवे कंपन्या दुप्पट, तिप्पट काम करितात, मनुष्याचे चवथ्या, तिसऱ्या, दुसऱ्या व पहिल्या क्लासाचे देखील डबे मालाचे कामास लावून धान्य रवाना करितात. शेळ्या मेंढ्यांचे, कुत्र्यांचे वगैरे हरएक प्रकारचे डबे देखील धान्यांनीं भरून पाठवितात. तरी लाखो खंडी धान्य शेकडो स्टेशनावरून पडलें आहे, या सर्वांची सुव्यवस्था व कोट्यावधि लोकांच्या मनाची शांति एका सर्व समर्थ परमेश्वराच्या कृपादृष्टी वाचून होणें नाहीं. त्यानेंच उदकवृष्टी केली असतां सर्व ठीक; नाहीं तर सर्व कठीण!

---

**प्रमोदसिंधु** कर्त्यांनीं गेल्या आठवड्यांत 'सदर स्टेशन अकोल्यास होणें अवश्य" आमच्या इंग्रजी निबंधावर लांबलचक टीका केली आहे त्यास आह्मी उत्तर देणें जरूर, परंतु दुसऱ्या कित्येक महत्वाच्या विषयामुळें या वादविषयाकडे वळण्यास आह्मास झालें नाहीं. प्रमोदसिंधूनें या लेखाकरितां ७।८ कालम खर्ची घातले पण भारदारतपणाचा त्यांत थोडा लेश असता तर बरें होतें. "पुन्हा चेव येणें" "लोकांच्या डोळ्यांत माती टाकून फसविणें" "वेड्या सारखें" "जांबुवंत" "वेडेपणाचें व लबाडीचें कृत्य करणें" "राजनिष्ठपणाची गुंगी" इत्यादि बहुत प्रयोग त्यांनीं एकट्या आह्मावर आपल्या एका निबंधांत योजिले आहेत. ही लेखाची सरणी व हा संभावितपणाचा मासला अद्भुत होय. किंवा कमिशनर साहेबांनीं एके वार्षिक रिपोर्टांत प्रमोदसिंधूस "रिस्पेक्टेबल पेपर" असें सर्टिफिकिट दिलें आहे त्याला शोभविण्यासाठीं हे प्रयोग असतील तर न कळे ! अस्तु. आमचे बंधू उर्दूअखबार कर्ते यांनीं त्यांस काल चांगलें संबोधिलें आहे तें वाचकांचे पहाण्यांत आलेंच असेल व त्यांचें मतही रास्त असून आह्माप्रमाणेंच आहे हें समजलें असेल.

## वऱ्हाड.

हैदराबादेस १३वे तारखेस चांगला पाऊस पडला असें वर्तमान आलें आहे. तिकडील रायचुर, गुलबर्गा व लिंगसुगूर या ३ जिल्ह्यांत मुळींच पाऊस नाहीं व बाकी जिल्ह्यांत थोडा पडला, आणि गुदस्त सालीं लक्षावधि रुपयांचें धान्य बाहेर गावीं गेलें ह्मणून या वर्षीं कसें होईल अशी निजामसरकारासही काळजी पडली आहे. व रेलवेनें बाहेरून धान्य आपल्या मुलखांत येण्याची तजवीज व्हावी ह्मणून मुंबईचे गवरनर साहेबाकडे त्यांनीं आपली कांहीं मंडळी पाठविली होती त्यांची गोष्ट ऐकून घेउन ट्राफिकम्यानेजर यांच्या विच्यारानें गवरनर साहेबानीं दररोज निजामसरकारचे मुलखांत १०० व्यागन्स धान्याच्या पाठवीत जाव्या असा ठराव केला आहे.

---

शिगावेंच आनररिमाजिस्त्रेट रा. रा. अच्युतराव पुरुषोत्तम देशपांडे यांनां हुकुमाप्रमाणें रा. रा. मारुती पाटील यांस आपले कामाचा च्यार्ज दिला. पण देशपांडे मजकूर यांची अजून कोठें नेमणूक झाली नाहीं. खामगावास जाण्याविषयीं त्यास विच्यारिलें असतां ते नाकबूल आहेत. बाळापुरचे आनररीमाजिस्त्रेट रा. रा. हणमंतरावजी यांची जागा रिकामी झाली आहे पण ती अजून भरीत नाहींत तेव्हां तेथें आन. मा. ची जरूर नाहीं की काय कोण जाणे.

---

पाऊस पडत नसल्यामुळें लोक हवालदील झाले आहेत सबब मे. डिपुटी कमिशनर साहेबानीं प्रांतांत फिरावयास निघण्याची तयारी केली आहे. व सर्व असिस्टंट कमिशनरांसही आपआपले तालुक्यांत जाण्याविषयीं हुकूम दिले आहेत.

---

पुढील महिन्याच्या ९ व्या तारखेस ले० क० मेंजिस साहेब उमरावतीचे स्माल काज जडज अकोल्यास डिपुटी कमिशनरच्या जागेवर येणार असें कळतें. रेजिस्ट्रेशनचें खातें त्यांकडे आहे तें काढून कमिशनरकडे देण्याचा ठराव झाला तेव्हां त्याबद्दलचे त्यांचे ६०० रुपये महिना कमी होणार सबब त्यांस डिपुटी कमिशनर करणें अवश्य आहे व त्यांची न्यांकही त्या बेताची आहे.

---

निजामसरकारानीं तुर्कस्थानांतील जखमी लोकांस मदत करण्याकरितां स्वतां २९००० रुपये दिले. दिवाण साहेबानीं १०००० रुपये दिले, व अवांतर ३०००० मिळून ६९००० रुपये पाठविले.

---

अकोल्यास सत्रामहिन्यांत पाऊस नाहीं. आतां पिकें अगदी डबघाईस आलीं आहेत. बाकी जिल्ह्यांतही या दोन आठवड्यांत पाऊस नाहीं. सबब तो लवकर पडावा ह्मणून सर्वांचें लक्ष्य त्याकडे लागलें आहे. बुलढाणें जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर मे. बुशबी साहेब यांनीं स्वस्तदरानें धान्य विकून गरीबगुरीबाची सोय व्हावी अशा प्रकारच्या दुकानाची खटपट मे० दस्तुर बहिमनजी साहेबाप्रमाणेंच आपले जिल्ह्यांत केली आहे असें कळतें ही संतोषाची व भूषणाची गोष्ट आहे—तेल्हाऱ्याहून [illegible] व आलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं माळेगावकर साधुमास्तर यांनीं शुक्रवारानंतर पाऊस पडेल असें भाकित सांगितलें आहे. ईश्वर करो आणि ते खरें होवो— अकोल्यास दैविक उपाय सुरू झाले आहेत. श्रीखोलेश्वर देव पाण्यानें बुडवून काढिला, श्रीराजेश्वरावर संतत धार धरिली, सप्ताहं सुरू केले व पांच पन्नास प्रतिष्ठित ब्राह्मणानीं माधुकरी मागून खाऊन देवालयांत पडून रहाण्याचें सुरू केलें आहे. या सर्व ओरडीस कृपाळु परमेश्वर लवकर कान देवो.

---

गेले रविवारीं एथील हायस्कुलांतील विद्यार्थ्यांनीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांस पान सुपारीचा समारंभ केला. पुष्कळ मंडळी बोलाविली होती व भाषणें चांगलीं झालीं.

---

गेले आठवड्यांत रविवाराला जोडून नागपंचमीची सुटी असल्यामुळें शनिवारीं सायंकाळीं उमरावतीहून रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हायस्कुलाचे हेडमास्तर रा. रा. बाळकृष्ण शास्त्री बापट डिपुटी इजुकेशनल, इन्स्पेक्टर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर हायस्कुलाचे असि. मास्तर, रा. रा. रा. वामन अनंत भोळे सुपरवाइझर, रा. गोविंद विश्वनाथ भावे मिडल क्लास स्कूलचे हेड मास्तर, व रा. रा. रामचंद्र यशवंत गोडबोले असिस्टंट मास्तर एथें आले होते; व मलकापुराहून रा. रा हरी मोरेश्वर शेवडे हेड मास्तरही आले होते. व याच रात्रीं इचलकरंजीकर मंडळीनीं "कामेडी आफ एरर्स" हें नाटक केलें. त्यामुळें लोकांची दाटी फारच झाली होती. सर्व पहाणारांस संतोष झाला. व नाटक करणारांसही मोठें समाधान वाटलें. त्या दिवशीं पहिल्या प्रतीच्या टिकिटांचे सुमार ६० गृहस्थ होते. विद्वान लोकांनीं तयार करून दिलेलीं नवीं नवीं नाटकें ही मंडळी फार थोड्या काळांत तयार करून तीं रंगभूमीवर उत्तम वठविते. हा गुण फार थोड्या नाटकवाल्यांत सांपडेल. पुढच्या आठवड्यांत एक नवेंच नाटक ते करणार आहेत. व थोड्या आठवड्यानीं शेक्सपियरच्या "सिंबेलाइन" नामक नाटकाचें भाषांतराचा प्रयोग हे करून दाखविणार आहेत.

मद्रासचे नामदार गवरनर साहेबांनीं दुष्काळपीडितास मदत व्हावी म्हणून सभा भरवून जो उद्योग केला तो चांगला सफल होईल असें दिसतें. कारण नेटिव संस्थानिकांच्या मनांत याविषयीं बरीच दया माया उत्पन्न झाली आहे. इंदूरचे होळकर सरकारानीं ४१००० रुपये व बडोद्याचे गायकवाड सरकारनीं १०००० रुपये दिले असें कळतें.

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीविषयीं एक कायदा पुण्यास कौसल भरून एकेच दिवशीं तीनवेळां वाचून पास केला.

लढाईचे कामांत आपण पडत नाहीं असें इंग्लिश सरकारानें पुन्हा प्रसिद्ध केलें आहे.

कर्नल [illegible] लुई पेली यांस मिलिटरी नाईट कम्यांडर आफ्‌धि ब्याथ हा किताब मिळाला.

सिमल्यास गेले आठवड्यांत गवरनर जनरलचे कायदे कौन्सलांत मुंबईचे रिविन्यू जुरिस्डिक्शन बील पास झालें.

ग्रीस आणि सर्व्हिया हे देश लढाईंत शिरतील असें दिसतें.

जर्मनी आणि आस्ट्रिया एथील राजांच्या गेल्या आठवड्यांत भेटी झाल्या.

होळकर सरकारानीं आपल्या गिरणीच्या कारखान्यांत शिकण्याकरितां पगारी उमेदवार ठेवण्याचा ठराव केला आहे. या पगारी जागा बारा होऊन प्रत्येकास १० रुपये पगार मिळेल. होळकरशाईंतील उमेदवारास पहिल्यानें ठेवून मग इतर ठिकाणच्यास ठेविलें जाईल. होळकर सरकारानीं ही योजना फार चांगली केली व इजबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों.

इंग्लंडांत एक नवीनच मंडळी निघाली असून त्यांतील सर्व असामीनीं मासमत्सर दारू वगैरे पदार्थ सोडून केवळ फळफळावळ धान्य व खोबऱ्याचें वगैरे तेल यावर निर्वाह करण्याचें ठरवलें आहे. आतां आमच्या कडील ब्राह्मण लोकांस बरेंच तिकडे जाण्याचें एक साधन झालें.

गेल्याच्या मागील शुक्रवारीं पुण्यास सूर्याच्या भोंवती खळें पडलें होतें त्याबद्दल आमचे भविष्यवादी हें लढाईचें, रोगांचें व दुष्काळाचें उत्पादक आहे असें ह्मणतात.

हिंदुस्थानच्या आरमारावरील मुख्यास पर्शियाच्या किनाऱ्यावर उत्तम बंदोबस्त ठेवण्याबद्दल हुकूम गेले आहेत असें कळतें.

विद्याखात्यांत ४०० रुपयांच्या असिस्टंट इन्स्पेक्टरच्या जागा करून त्या नेटिवांस देण्याचा बंगाल सरकारानें नियम केला आहे.

इकडून आणखी १०० इंजिनें पाठविण्याबद्दल इंग्लंडास लिहून गेल्याचें कळतें. अ. द.

पर्जन्याची हकीकत, तारीख ९ आगष्टः—वायव्यप्रांतांत किस्येक ठिकाणीं पर्जन्य नग पडला व किस्येक ठिकाणीं फार गरज आहे. आग्रा, बरेली, कुमाऊन, लखनौ व सितापुराकडे पर्जन्य नाहीं. आग्र्याकडे धारण चढत चालली आहे. मध्यप्रदेशांत पर्जन्य व पिकें बरीं आहेत. मद्रास, गोदावरी, करनूल व दक्षिण अर्काट एथे पर्जन्य पडला. माळवाप्रांतांत पर्जन्य बरा आहे. ग्वालेरकडे पर्जन्य नसल्यामुळें शेतें सुकलीं.

फ्रान्स देशांत फौजेवरील मार्शल ह्मणून कामदार असतो त्यास सालीना रुपये २१८०० पगार आहे; डिव्हीजनच्या जनरलास ७७८० रुपये, तोफखान्यावरील कर्नलास ३,९६० रुपये, लेफ्टिनेंटास १,०८० रुपये व पलटणीवरील सबलेफ्टिनेंटास ९०० रुपये येणेंप्रमाणें सालीना पगार असतात. यावरून इकडील व तिकडील फौजेवरील कामदारांच्या पगाराची तुलना करून पाहिली असता फार तफावत आहे असें सहज लक्षांत येतें.

मद्रासेंत दुष्काळसंबंधीं चालू असलेल्या कामावर हल्लीं ९,९७,००० लोक आहेत असें कळतें.

ईस्ट इंडिया रेलवे कंपनीचे सेक्रेटरी मि. आर. जे. रेंडल यांनीं बीस वर्षें पर्यंत कंपनीची चाकरी उत्तम रीतीनें बजावून केली ह्मणून सदर्हू कंपनीनें त्यांचे कुटुंबास २०,००० रुपये दिले असें समजतें.

डान्यूब नदीवरील तुर्की फौजेचे सर्व अधिकारी बदलून टाकले याचें कारण असें समजतें कीं, खेदीवचे चिरंजीव प्रिन्स हसन यांनीं सुलतानास अशी तार केली कीं, सदर्हू कामदार लोक तेथील कामास नालायक आहेत सबब त्यांस नोकरीतून दूर करावे.

कटनी जिल्हा जबलपूर एथें आकाशांतून दक्षिणेकडून उत्तरेकडे सुमारें बीस हात लांबीचा तारा तुटला.

कोसाक लोक कितप्रत लबाड आहेत व ते आपल्या जातीच्या लोकांस कसे फसवितात याविषयीं गालाटझ एथें एक चमत्कारिक गोष्ट घडून आली ती अशी कीं, एक कोसाक एका अशक्त झालेल्या जनावराबर बसून रस्त्यांतून जात होता तों तें जनावर एकाएकीं जमीनीवर मेल्या सारखें पडलें. इतक्यांत त्या मनुष्यानें ओरड केली व आपलें जनावर गमावलें ह्मणून रडावयास लागला. हा चमत्कार पहाण्यास त्याचे भोंवतीं पुष्कळ लोक जमले त्यांस त्या मनुष्याची दया येऊन त्यांनीं आपआपल्यांत वर्गणी जमवून ती त्या कोसाकास दिली. ते पैसे घेऊन तो जरा दूर गेला नाहीं तोंच त्यानें शीळ वाजविली त्याबरोबर तें जनावर उठून आपल्या धन्याकडे गेलें. जमलेल्या लोकांस आश्चर्य वाटून आपल्यास फसविलें ह्मणून मनांतल्या मनांत चुरचुरे खात बसले. ने. ओ.

सुरतेस दुष्काळाचीं चिन्हें उद्भवूं लागल्यामुळें तेथल्या लोकांची अगदीं गाळण झाली आहे. गरीब लोकांस अन्नदान देण्याकारितां सुरतेचे फुलपावर माजिस्ट्रेट जगजीवनदास खुशालदास यांच्या स्तुत्य उद्योगानें २६७८ रुपये वर्गणी जमा झाली आहे. इं. प्र.

## नोटिसा

झाडाजी वलद लक्ष्मणजी भांडे राहणार कजबे अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे लाडेगाव व मौजे नागापूर व मौजे औरंगाबाद तालुके अकोट या तीन गावचीं शेतें पांच नंबर तुमचे नांवें असून यांत माझा एक त्रितियांश हिस्सा असोन तो रजिष्टर सर्वेचे जमाबंदीचे वेळेस झालेलें त्यांत शरीक असोन तारीख १९ माहे मे सन १८६८ इसवी रोजीं तुह्मी दस्तऐवज लिहून दिला आहे त्यांत असें लिहून दिलें आहे कीं लाडेगाव येथील जमीन सालीम तुह्मी वाहून उपभोग घ्यावा व औरंगाबाद व नागापूर येथील जमीनीचा सालिम मी उपभोग घेईन एकमेकाचा वर लिहिलेले गावचे वाटलेले जमीनीवर दावा नसोन मजला जो मुबदल्यांत. दोन गावचे हिशाचे जमिनींत जमीन लाडेगाव येथील हवाली केली आहे त्या जमीनीचे खातेंही माझे नांवें करून देण्याचें लिहिलें तेंही करून दिलें नाहीं फक्त जमीन मात्र ताब्यांत दिली हा अशा तऱ्हेचा मुबदला करण्याचें कारण इतकेंच कीं माझा सदर्हू वर लिहिले गावचे जमीनींत २०० रुपये खर्च झाला आहे तो फेडण्यास तुह्मी आपली कमताकद मजला दर्शविल्यावरून असें केलें आहे. त्याप्रमाणें सन १२८६ पावेतों सालीम शेताचा उपभोग दस्तऐवजाप्रमाणें मीं घेत आलों आहों या भोगले सालांत लाडेगाव येथील शेतांत असलेले सिदवंद मी तोडून यासही खर्च रुपये १०० पावेतों केला आहे. सन १२८६ फसली सालांत मी पेरलले जमीनींतील माल तुह्मी जबरीनें घेऊन जाऊन राहिले दोन गावचे जमीनींतील माल नेला मजला बिलकूल मिळाला नाहीं सदर्हू तिन्ही गावचे जमीनींत येले सालास जो माल उत्पन्न झाला तो. लाडेगाव—कापूस खंडी ९ ज्वारी खंडी ९ कडबी पुली ३७१० नागापूर कापूस खंडी ३. औरंगाबाद—कापूस खंडी८। ज्वारी खंडी ७॥ कडबीपुली ३६०० व त्याचप्रमाणें माझे ताब्यांतील जमीनीचा अपरोक्ष साराही गेले सालचा तुह्मी भरला आहे. आजपावेतों सारा सालीम मी दिल्याचा गावचे कोर्दतीं दाखला आहे हिशाप्रमाणें आह्मास माल तीन गावचे शेतांतील तरी द्यावयाचा होता तोही दिला नसून दस्तऐवज लिहून दिल्याप्रमाणेंही तुह्मी वर्तला नाहीं. त्याच्यांतही व्यय आला सबब ह्या कारणाकरिता ही नोटिस देण्यांत आली आहे. तर ही पावले दिवत दावा नाहींपेक्षां या नोटिशीचे खर्चास होत एकंदर फिर्याद योग्य कोर्टांत तुह्मावर करून नुकसान भरून घेतलें जाईल हें खुप समजावें कळावें तारीख १८ माहे आगष्ट सन १८७७ इसवी मुकाम अकोट

(सही) निर्मोचंद चुडामन आगरवाले वहिवाटदार नारायणदास निर्मोचंद भुसारी साहू दुकान अकोट दस्तुर खुद.

नोटिस.

बाळकृष्ण इच्छाराम सोनार रहाणार कसबे पातुर्डे यास मदारी चुडीवाला रहाणार कसबे पातुर्डे याजकडून नोटिस देण्यांतयेते कीं आह्मी तुमचे जवळ तोड्या आपासून याचा योग्य जबाब १९ दिवसांचा जोड करण्यास दिला होता त्यास सुमार ३–४ महिने झाले आपण तोडे देत नाहीं आणि त्याचे दामही देत नाहीं. तुह्मी ह्मणतां कीं आमचे बापास माहित होतें तर तुह्मी त्या वेळेस कांहीं अज्ञान होतेत काय? असो आतां आठ दिवसांत तोड्याचा जोड अगर त्याचे दाम द्यावे. नाहीं तर शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून रुपये नोटिसीचे खर्चासुद्धा घेतले जातील. कळावें ता. १२ आगष्ट सन १८७७ इसवी.

(सही) मदारी चुडावाला दस्तुर देवीदास कन्हयालाल

नोटिस.

रामचंद्र पुरुषोत्तम देशपांडे पातुर्डेकर मुनसरीम वस्ती पातुर नंदापूर सुभेदाराचे यांस देवीदास कन्हयालाल रहाणार पातुर्डे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची खाते बाकी रुपये व ज्वारी नारायण वलद हरी वाघ याचे जामिनीनें तुह्मास दिली होती याजबद्दल आह्मी तुह्मास टपाल मार्गानें दोन च्यार वेळा पत्रें पाठविलें परंतु तुह्मी त्या रकमेचा दस्तैवज अगर रुपये देत नाहीं. तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत येऊन तंटा साफ करावा. नाहीं तरफिर्याद करून नोटिसीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेतले जातील कळावें तारीख १२ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

(सही) देवीदास कन्हयालाल दस्तुर खुद

नोटिस.

नारायण वलद विस्तारी गवंडी रहाणार रामटेक कोंडपेठ इलाखा नागपुर यासी गुनी मर्द नारायण गवंडी रहाणार अर्जुने प्रगणे काटर तालुके वणी इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असोन माझा प्रतिपाळ करण्याचा तुझा हक्क आहे असें असतां तूं मजला रीतीप्रमाणें वागवून माझें संरक्षण करीत नाहींस ह्मणोन एक दोन वेळा पत्रें पाठविलीं व निरोपही सांगून पाठविले असतां तिकडे तूं लक्ष्य दिलें नाहीं. यास्तव आतां मी लाचारींत येऊन ही नोटिस दिली आहे तरी नोटिस पावल्याचे तारखेपासून पंधरा दिवसाचे आंत रीतीप्रमाणें निकाल केला असतां फार बरें आहे नाहीं तर कायदेशीर रीतीप्रमाणें दुसरा नवरा करीन. मग त्याजवर किंवा मजवर तुझा कोणतेही प्रकारें हक्क किंवा दावा चालणार नाहीं. व आज पावेतों लोकाचे कर्ज काढून खाल्लं तो पैसा नोटिस पावल्या बरोबर दिला असतां बरें आहे नाहीं तर रीतीप्रमाणें दिवाणींत दावा करून पैसे घेईन ही नोटिस लिहिली आहे कळावें तारीख १० माहे जुलै सन १८७७

[सही] गुनी मर्द नारायण गवंडी निशाणी हातची रेघ

हे पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ — अकोला, रविवार ता० २६ माहे आगष्ट सन १८७७ इ० — अंक ३४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### नोंदण्याचा कायदा.

ह्मणजे

सन १८७७ चा आक्ट ३.

ह्यावर विशेष समजूत, आणि मुंबई, मद्रास कलकत्ता व वायव्य प्रांत येथील हायकोर्टाचे फैसले व प्रिव्हि कौन्सिलचे फैसले ह्यांचा सारांश व निवाड्यास परस्पर हवाले.

प्रत्येक कामाखालीं दिले आहेत. प्रारंभीं उपोद्घातांत सदर्हू आक्ट संबंधी फार उपयुक्त माहिती दिली आहे. हा ग्रंथ रा. रा. व्यंकटराव रामचंद्र वकील यानीं केला आहे. याची किंमत १०८ व टपाल खर्च ०५ एकून एक रुपया दाहा आणे आह्माकडे अगर ग्रंथ कर्त्याकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.

ज्ञानचक्षूचे मालक.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पुढील दोन ओळीस येते अंकीं जागा मिळेल तर बरें होईल.

काल बुधवारचा बाजार आमचे ग्रामस्थ लोकांस (विशेषें कनिष्ठावस्थेंतील) असा कठीण गेला कीं, तो सांगतां देखील पुरवत नाहीं. ह्मणजे गरीबगुरीब लोक व मध्यमावस्थेंतील लोक दोन प्रहरचे समर्मीं बाजारांत ज्वारी विकत घेण्याकरितां पैसे घेऊन आले तर पैसे देऊन त्यास ज्वारी मिळेना. दुकानावर सारी एक दोन ठोपल्यांतच प्रथमारंभीं ज्वारी विकण्यास आली होती. तिचा भाव काय विचारावा? आमचे एथील पायलीप्रमाणें. प्रथम ९ पैसे मग १०।११।१२ व १३ पैसे पावेतों ह्मणजे पायलीस साडेसहाआणे भाव लागला. मग काय पुसता जी गरीब लोकांची धांदल उडाली ती कांहीं अतोनात. सारांश इतकेंही करून कोणास ज्वारी मिळेना. शेवटी ही ओरड आमचे ग्रामाधिकाऱ्याकडे जाऊन त्यांनीं लागलाच याचा बंदोबस्त केला. ह्मणजे कांहीं सावकार लोकांचे दुकानावरून ज्वारी विकण्यास आणवून तिचा भावही चांगला मध्यमच ठेविला ह्मणजे १० पैसे पायली. (आपले एथील पायलीप्रमाणें पांच आणे पायलीप्रमाणें) विकाविले. याजबद्दल खचित देशमुख यांची तारीफ केली पाहिजे. एथील बहुतेक सर्व लोकांची चित्तवृत्ती अगदी चमत्कारीक झाली आहे. कारण आज एक महिन्यांत पाऊस मुळींच नाहीं. ह्मणजे पुष्य व आश्लेषा हीं नक्षत्रें अगदीं कोरडी गेली. व नुकतेंच काल मघा नक्षत्र लागलें त्याचाही अजून कांहींएक उपयोग दिसत नाहीं. मात्र गरमी अतिशय होऊन राहिली आहे. आणि आमचे माळेगांवकर साधू मास्तर यांनीं चार दिवसांनीं ह्मणजे शुक्रवार नंतर पाऊस येईल असें कित्येक पृच्छकांनीं विचारिलेवरून सांगितलें आहे. ह्याजवर फार लोक अवलंबून आहेत. तेव्हां पुढील बाजार पावेतों पर्जन्य न आल्यास एथील पुष्कळ हलके वर्गांतील लोकांचे विचार फारच विलक्षण दिसतात. ह्मणजे ते उघडपणें ह्मणतात कीं, काय करावें? इतके महागाईचें धान्य कसें घ्यावें? तेव्हां अर्थांतच धान्याची लूट पोटा करितां करणें प्राप्त आहे. एकपरी त्यांचें हें ह्मणणें खरें आहे कारण पोटाचे आगीसारखी विलक्षण आग दुसरी कोणतीही नाहीं. हें सर्वत्र अनुभवसिद्ध आहेच. सारांश असें झालें असतां श्रीमंत लोक कसेही रीतीनें आपला निर्वाह करितील परंतु एकंदरींत मध्यमावस्थेंतील लोकांचें मरण आहे. जे कनिष्ठ आहेत ते तर लुटण्यास मागें पुढें काय पहाणार आहेत? कोणी कडून तरी सरकार खाण्यास देईलच. असो पण दयाळू परमेश्वरास दया येऊन हे सर्वांचे विचार जागचे जागींच राहोत. फार काय लिहूं ही विनंती. कळावें तारीख १९ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

एक

तेल्हारेकर.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

शिगावाहून वि. वि. सुमार २०।२२ दिवस झाल पाऊस नाहीं. पिकें सूर्याचे प्रखर किरणांनीं वाळून चालली आहेत. ऊष्मा होतो. अभ्रें येऊन सवेच नाहींशीं होतात यामुळें लोक अगदी हवालदील झाले आहेत. शेकडों मनुष्यांच्या झुंडीच्या झुंडी दक्षिण प्रांतांतून इकडे पोट भरण्याचे उद्देशानें येत आहेत. परंतु कोकणांत गेलें तरी 'पळसास तीनच पानें' ह्या ह्मणीप्रमाणें इकडेही महर्घतेनें आपला सदळ पाय पुढें करून गोरगरिबास धान्य मिळण्याची मुष्किल आणली. मेघराजा, असा आम्ही रयतेनें तुझा कोणता अन्याय केला कीं, तूं आपलें टवटवीत मुख अच्छादित केलें?

लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, तारीख १४ मिनहू रोजीं बाजार झाला त्या दिवशीं धान्य अगदीच कमी आलें होतें किंबहुना नाहीं ह्मटल्यासही चालेल. यामुळें कित्येक गरीब लोकांस मिळालें नाहीं. व कित्येकांस मिळालें ते सात साडेसात आणे पायली ह्या भावानें मिळालें. दिवसभर मजुरी करून प्राप्त आणा दोन आणे. त्यांत दहा मनुष्यांचे कुटुंबाचें धान्य कसें मिळून त्यांचा निर्वाह कसा व्हावा? बरें मजुरी ही नित्याची नाहीं, कधीं मिळतें व कधी मिळत नाहीं यामुळें उपाशी मरण्याचा प्रसंग आहे व कित्येक त्या कामीं लागले ही आहेत तेव्हां ह्याविषयीं आमचे वरिष्ठ व दयाळु सरकारास विनंतीनें सुचवा व आमची दाद लावा ह्मणजे आह्मी आपले व आमचे हितेच्छु सरकारचे मोठे उपकार मानू.

मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंठ कमिशनर तारीख १३ मिनहू रोजी कांहीं सरकारी कामा निमित्त एथें अले होते. त्या वेळीं सुमारें ४००।५०० लोक आह्मास खावयास द्या ह्मणून आपली लाच्यारी दाखविण्यास गेले होते त्या वेळीं त्यांची केविलवाणी तोंडें पाहून व दीनवाणीनें मागणें ऐकून भाई साहेबांस दया आली व त्यानीं त्यांस ज्वारी वाटली तेणेंकरून तो दिवस त्या लोकांस सुखांत गेला. आणखी कांहीं दिवस भाई साहेबांचा मुक्काम झाला असता तर दररोज ज्वारी वाटण्याचें त्यांचे मनांत होते परंतु निकडीच्या कामामुळें व आमचे दुर्भाग्यामुळें दुसरेच दिवशीं त्यांची स्वारी निघून गेली.

मुख्यत्वें गोष्ट लिहिण्याची तशीच राहिली ती ही कीं भाई सा० यांणीं या गावीं सभा करवून त्यांत सावकार लोकांस उत्तेजन देऊन दुष्काळसंबंधी वर्गणीची यादी करविली. या शिवाय आणखी धर्म फंडांत देण्याचें ठरविलें तें:—

दलालो पैकीं एक आणा धर्मफंड्यांत द्यावा.

प्रत्येक ज्वारीचे गाडींतून दोर शेर धान्य बालाजीच्या नावानें पूर्वीं जें काढील जात होतें त्या पैकीं एक शेर धर्म फंड्यांत घेऊन एक शेर बालाजीस देत जावा.

दहा वाघणीवर माल भरून त्यावर जो नफा मिळतो तो धर्म फंड्यांत द्यावा.

येणेंप्रमाणें धर्म फंड्यास आश्रय झाल्यावर आह्मास काय पण सर्व गोरगरीबास अत्यानंद झाला. गरीब लोकांस बाजारभावापेक्षां कमी दरानें धान्य देऊन जो नफा सानी येईल ती या पैशांतून पुरी करावी ह्मणून ठरविलें आहे. व त्याप्रमाणें काल तारखेपासून धान्याचे विक्रीचें दुकान घालून त्यावर कुकाजी वल्लद महादाजी पाटील यांस सेक्रेटरी नेमिलें आहे.

परंतु या कृत कार्यास अडथळा न यावा ह्मणून कनवाळु सरकार या वेळीं पाण्याचे पुरवठ्याचें काम व सडका वगैरेचें काम काढील तर त्यावर सहस्रावधि लोकांस उदरनिर्वाहार्थ मजुरी मिळून स्वस्थ दरानें धान्य घेण्यास सोयवार होईल.

शिगाव एथें पाण्याचा हमेशा फार तोटा असतो. या गावास एक मोठा तलाव करण्याबद्दल सुमार दोन वर्षें झालीं आमचे दस्तुर बहिमनजी साहेब हे खटपट करीत आहेत. लोकांची मनें वळवून काही वर्गणीचा पैसा जमा केला आहे व मिमे पैसा सरकारानें द्यावा अशी मंजुरातही त्यांनीं मिळविल्याचें समजतें. करितां सरकारी काम या महर्गतेंत सुरू करण्याची तजवीज प्रजापालक सद्विवेकी जे सरकार यांस सुचवून हातीं धरलेला स्तुत्य उद्योग लवकरच ते शेवटास नेतील ही आशा आहे.

पत्रविस्तार फार झाला यास्तव आतां पुरें करितों. लोभ करावा ही विनंती. कळावे तारीख २० आगष्ट सन १८७७ इसवी.

ग्राम कनवाळु

पाटील कुळकर्णी शिगाव.

## वसूल

| | रु० |
|---|---|
| रा. रा. बाळकृष्ण चिमणाजी | १०८ |
| ,, ,, केवळराम चतुर्भुज साहू | १५ |
| ,, ,, मारुती पाटील शेडगावकर | १०८ |
| ,, ,, नागोजी पाटील कसुरेकर | १०८ |
| ,, ,, भावजी पाटील चिचोलीकर | १०८ |

**वऱ्हाडसमाचार**

मिति श्रावण वद्य २ शके १७९९

## मागच्याहून अधिक भयंकर दुष्काळ.

पर्जन्याच्या संबधानें प्रस्तुत जीं चिन्हें दिसत आहेत तीं फार भयंकर आहेत व त्याविषयीं विच्यार केला असतां छाती फाटून जाते. याविषयीं मुंबईच्या टाइम्स आफ इंडियाच्या इंग्लिश वर्तमानपत्राचे विद्वान, नामांकित व नेटिवांचे हितेच्छु कर्ते

काय ह्मणतात तें आह्मी आपल्या वाचकांस आज सविस्तर कळवितों.

या प्रसंगीं हिंदुस्थानच्या स्थितीविषयीं कांहीं सांगणें कठीण आहे. मुंबई आणि मद्रास इलाख्यांतील बऱ्याच भागानें बारा महिने दुष्काळाचें सहन केलें तरी पुन्हा त्याच भागावर दुष्काळाची दुःखकारक झडप येऊं पहात आहे एवढेंच नव्हे तर ते भाग व हिंदुस्थानांतील आणखी पुष्कळ देश गुजराथ, काठेवाड, कच्छ, रजपूत संस्थानें, पंजाब, व वायव्य प्रांत इत्यादिकांवर दुष्काळाची भयंकर गदा येऊन पडणार असा धाक आहे. हे इंग्लिश सरकारचे देश झाले याशिवाय निजाम सरकारचा मुलुख व गायकवाड सरकारचा मुलुख हेही या तडाक्यांत आहेत. हैदराबादेकडे तर दुष्काळ पडणारच, व बडोद्याकडे इतक्यांत चांगला पाऊस पडला तर कांहीं सुधरेल असें वाटतें पण कांहीं विशेष आशा दिसत नाहीं. साऱ्या गुजराथेची हीच स्थिति आहे. पिकें अजून जळालीं नाहींत पण आणखी १५ दिवस पावेतों पाऊस आला नाहीं तर मात्र तीं जळून खाक होतील. काठेवाडांतील कपाशी तर जळालीच. आतां कदाचित् इतक्यांत तिकडे चांगला पाऊस पडला तर पहिली मोडून नवी लागवड करितील, पण धोलरा वगैरे चांगला कापूस आतां तिकडे होणें कठीण आहे. व तेणेंकरून पुढील वर्षी मुंबईच्या व्यापाराला व गिरण्या वगैरेला धक्का बसणार आहे. कारण कापूस मुबलग मिळणार नाहीं. दैवाची गोष्ट आहे कीं, वऱ्हाडांत कापूस चागल्या उमेदीवर आहे व तेणेकरून आपले देशांतील गिरण्यास कापूस मिळेल व त्या केवळ बंद होणार नाहींत. तथापि कापूस पुष्कळ महाग व दुर्मिळ होईल. गिरणीवाले लोकांस वऱ्हाडाशिवाय अधिक कापसाकरितां इजिप्त देशाकडे पहावें लागेल. अस्तु. हें सर्व व्यापाराविषयीं झालें. पण खाण्याच्या पदार्थांची वाट काय ? इतक्या देशांतील कोट्यावधि प्रजा जी दुष्काळाचे तडाक्यांत सापडली व कांहीं सापडण्याचे नेटांत आहे तिला अन्न कोठून पुरवणार ? व कोठें धान्य मिळालें तर ते कोना कोपऱ्यांतीलही भागांत पुढें जाणार कसें? व इतक्या लोकांनां जगविण्यापुरतीं कामें काढण्यास पैसा कोठें आहे ?

धान्याच्या साठ्याविषयीं पाहिलें तर मुंबई व मद्रास इलाख्यांत जेवढा पुराणा गल्ला होता तेवढा गेल्या सालांत सर्व खलास झाला. एवढेंच नव्हे, पण हैदराबादेकडून व गुजराथेकडून मागल्या दुष्काळाला पुष्कळ पुरवठा झाला व त्यामुळें या दोन्ही भागांतीलही धान्य बरेंच कमी झालें त्यामुळें त्यांकडून पुरवठा होण्याचे बदला तेच प्रांत धान्य खरेदीकरितां बाहेर निघतील. आतांशा एकट्या मुंबईहूनच हैदराबादेकडे दररोज ३०० टण धान्य जात आहे. गुजराथेनेंही बाहेर धान्य पाठविण्याचें बंद केलें व तीच आतां खरेदीस निघेल. पंजाबांत दक्षिण आणि पश्चिम भागांत दुष्काळाचें चिन्ह आहे. तें नसतें तर तिकडील धान्य येऊन साऱ्या मुलुखास पुरविलें गेलें असतें. तथापि मागील तीन साल तिकडे उत्तम पीक झालें आहे त्यामुळें पंजाबांतून पुष्कळ धान्य या भागांत या प्रसंगीं येईल यांत संशय नाहीं. आह्मास असें समजलें आहे कीं पंजाबांतून कांहीं धान्य मुंबईकडे येण्यास रवाना झालें आहे व एकंदर सुमार अडीच लक्ष टन धान्य पंजाब प्रांत मुंबई इलाख्यांत पाठवील. व तिकडून कांहीं हैदराबादेकडे व कांहीं मद्रासेकडे जाईल. हल्लींच तिकडे दररोज १२०० टन धान्य जात आहे व जी. आय. पी. रेलवेला अधिक नेण्याचें सामर्थ्य असतें व दक्षिणेंतील खपास पुरून अधिक धान्य पाठवण्याजोगें असतें तर तिनें अधिकही पाठविलें असतें. मद्रास इलाख्यानें बंगाल इलाखा व ब्रह्मदेश यांकडे तोंड करून बसलें पाहिजे. ईश्वरकृपेनें त्या दोन्ही भागांत पिकाचा हंगाम चांगला दिसत आहे. तसेंच मद्रास इलाख्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं अलीकडे पाऊस पडला आहे तेणेंकरून सुमार तिजाई पीक साधेल अशी आशा आहे व तेणेंकरूनही बऱ्याच लोकांचा गुजारा होईल. तथापि अडचणी पुष्कळच आहेत. जें धान्य मिळेल तें देशांत ठिकठिकाणीं पोंचतें होणार कसें? बैल तर बहुतेक गेले, व मजूर माणसेंही गेल्या वर्षाच्या हलाखीनें निःशक्त व अस्थिपंजरशेष झालेली आहेत तरी इंग्लिश सरकारचे अडचणी निवारणाचे उपायही अलंघनीय आहेत. मद्रासेकडे युरोपियन कामदार हल्लीं जितके आहेत त्याहून अधिक पाहिजे आहेत. व सरकारानें जिल्ह्यानिहाय कांहीं लष्करी युरोपियन कामदार या कामासाठीं तयार करावे. दळण वळणाचे मार्ग असतील तितके सर्व उपयोगांत आणावे व नवीन ही कांहीं योजावे. मद्रासेहून बेलारीला व कोइमतूरला ज्या आगगाड्या आहेत त्यांचे रेल दुहेरी करावे. रेलवेच्या कांहीं हंगामी शाखा किंवा आबड धोबड त्रामवे करावे. व जें जें आणखी करण्याजोगें असेल ते करून लोक जगवावेत आणि जगताला समाधान द्यावें.

मुंबई इलाख्यांत काठेवाडांत व गुजराथेंत काय काय केलें पाहिजे या गोष्टीकडे सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं लक्ष्य पुरविलें आहे. व अखेरपर्यंत पर्जन्य न पडतां तसाच कठीण प्रसंग आला तर एकदम कामें सुरू केलीं जातील व तीं अशीं केलीं जातील कीं, त्यांपासून पुढें सतत देशाचा फायदा व्हावा. ह्मणजे भावनगर पासून उत्तरेकडे वढवणपर्यंत व पश्चिमेस काठेवाडांत रेलवे नेणार. व पात्रीपासून भुजपर्यंत ही रेलवे करणार. गुजराथेंत ही बडोद्यापासून डभोईपर्यंत एक व दुसरी एक अशा रेलवेच्या दोन शाखा करणार. व पाट बंधारे आणि तलाव करणार आहेत. काठेवाडांत पाट बंधाऱ्याची फारच अवश्यकता आहे सबब ते करून एक दोन रेलवेही करणार. इत्यादि प्रकारानें मुंबई सरकार दुष्काळांत असें काम करीत आहे व पुढें करणार कीं, जेणेंकरून यावर्षी पाऊस पडला तर याच वर्षी नाहींपेक्षां दुसरे वर्षी पाऊस पडल्यावर देशाचा शाश्वत नफा झाल्याशिवाय रहाणार नाहीं व पुढें दुष्काळाची भीति रहाणार नाहीं. दक्षिण देशांत कित्येक तलाव व नद्यांनां बंधारे असे उत्तम झाले आहेत कीं, त्या प्रांतांत पाण्याचा अतिशयित साठा होऊन देशचादेश सर्वकाळ बागाईत व सुपीक होऊन जावा. शिवाय गारदोंडापासून मनमाडपर्यंत रेलवेचा रस्ता झाला. आणि आतां त्यावर फक्त रेलं पसरले कीं, तो उपयोगांत येईल. हा व असेच दुसरे कित्येक लाभ दक्षिण देशास फार मोठे झाले आहेत यांत संशय नाहीं. दुष्काळग्रस्त लोकांस जगविण्याकरितां पैसा खर्चण्याचे कामांत इतके पुढील सुखाकडे व फायद्याकडे लक्ष देऊन चिरकालिक केले हें त्यांचे प्रवर्तकास मोठें भूषणाहे आहे यांत संशय नाहीं. प्रारंभापासून वेळोवेळ आह्मी या कामांची वाखाणणी केली आहे व यांस उत्तेजन दिलें आहे आणि तीं कामें आतां शेवटास जाणार हें पाहून आह्मांस संतोष होतो. आणि गुजराथ व काठेवाड यांवरही हल्लीं दिसतो आहे तोच दुष्काळाचा कठिण प्रसंग खरोखर येणार असला तर त्यांतूनही आमचें सरकार त्यांस पार पाडील व त्या योगें पुढील निरंतर फायद्याचीं बहुत कामें तयार करून ठेवील यांत संशय नाहीं. तथापि या इतक्या गोष्टी पार पाडण्याला पैशाचें साधन कोणतें आहे? येकट्या मद्रास इलाख्याला ९ कोटि रुपये पाहिजेत. दक्षिणदेश व दक्षिणमहाराष्ट्रदेश बऱ्या स्थितींत दिसताहेत ही आनंदाची गोष्ट आहे. तरी गुजराथ काठेवाड, कच्छ, रजपुतसंस्थानें, पंजाबचा पश्चिमभागचा प्रदेश आणि सारा वायव्यप्रांत यांत जर अजूनही पाऊस पडला नाहीं तर यांच्या उपजीविकेकरितां सरकारास किती कोट रुपये खर्च पडतील याची कल्पना मोठी बिकट आहे. हिशेबीखात्याचे जे उत्तम पंडित असतील तेच याची व्यवस्था लावितील. हा इतका पैसा आणावा कोठून? कर्ज काढून? कां लोकांवर नवे कर बसवून? इनकम ट्याक्स बसवावा त्यानें? किंवा जकात वाढविल्यानें? कशानें हा एवढा महत्कार्यभाग होणार? कल्पना करा कीं म्यांचेस्टरच्या कापडावर आणखी ५ रुपये शेकडा वाढवा झटलें, किंवा कांहीं झटलें, तरी त्याला अनेक अडथळे पुढें येणारच. आणि ते कितीही आले तरी त्यांचें निवारण करून सरकारानें पैसा काढला पाहिजेच. त्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## व्हाईसराय साहेब.

सिमल्याहून व्हाईसराय साहेबाची स्वारी ३।४ सेक्रटरी, एडिक्यांप वगैरे सह १६ वे तारखेस तिसरेप्रहरीं ३ वाजतां निघाली. ती रात्रीं धर्मपुरास विश्रांती घेऊन दुसरे दिवशीं कालक्यास आली. व तेथून भोजनोत्तर निघून मध्यान्ह रात्रीं अंबाल्यास आली. व त्याच रात्रीं आगगाडींत बसली. ती रविवारीं पहाटे ६ वाजतां जबलपुरास आली. व संध्याकाळचे ९ वाजतां तेथून निघाली ती २० वे तारखेस ह्मणजे सोमवारीं रात्रीं १०॥ वाजतां पुण्यास आली. पुण्यास काल शनिवारपर्यंत मुक्काम होऊन तेथून रात्रीं निघून पुढें बेलारीस जाणार. तेथें मद्रासचे गवरनर ड्यूक आफ बकिंगहाम यांची भेट होईल व ते उभयतां मिळून म्हैसुराकडे जातील तेथें ३।४ मुक्काम होऊन पुढें मद्रासेस जातील व तेथें कांहीं मुक्काम होऊन माघारे परततील.

पुण्यास २१वे तारखेस दुष्काळ संबंधानें कानफरन्स ( खलबत ) झालें त्या संबंधी मजकुर अजून समजण्यांत आला नाहीं. २२वे तारखेस लेव्ही ह्मणजे सर्वांच्या भेटी झाल्या. तिसरे प्रहरीं इंजिनियरिंग कालेज पाहण्यास स्वारी गेली होती. डेक्कन कालेजाचे प्रोफेसराच्या भेटीही तेथेंच झाल्या. नंतर कलाकौशल्याचें प्रदर्शन जाऊन पाहिलें. तेथें स्वारी खुश झाली. नंतर शहर पाहात पाहात सरकारी बंगल्याकडे गेली.

---

**आश्चर्यकारक कंडी**— विलायतेहून तारेतून असें वर्तमान आलें आहे कीं, कोंबुलांत व हिंदुस्थानांत रशियाचे लोक हिंडताहेत व कित्येक संस्थानिकाशीं ते खलबतें करीत आहेत कीं, रशियाचें व इंग्रजांचे युद्ध उभें राहिल्यास त्यांनीं रशियास मिळावें. ही बातमी विलायतेस हिंदुस्थानची मुख्य कचेरी जी इंडिया आफिस त्यापर्यंत जाऊन पोंचली आहे. परंतु आह्मांस ही खरी असावी असें वाटत नाहीं. कारण आमच्या संस्थानिकांत कित्येक मूर्ख असतील तरी त्यांस इंग्रज सरकारची सद्दी, पराक्रम, आणि दरारा चांगला ठाऊक असेल! आणि त्यांच्या युध्दोत्सुक शत्रूस मिळाल्यानें आपली काय दशा होईल हेंही सन १८५७ सालच्या बंडांत मिळालेल्या लोकांच्या घडून आलेल्या डोळ्यापुढल्या गोष्टीवरून त्यांस स्पष्ट कळत असेल. सबब ही कल्पनाच संभवत नाहीं. उगीच येकाद्या राजावर त्याचा कोणी दुसमान कांहीं किटाळ रचून त्याची उचलटांगडी करावयास पाहत असेल तर तो असल्या दुष्ट कंड्या पिकवूं शकेल. आतां काबुलाविषयीं आह्मांस कांहीं माहिती नाहीं. व इंग्लिश वर्तमानपत्रांतून तिकडील जीं वर्तमानें येतात तीं नित्य नवीं व परस्परविरूध्द अशींही कित्येक येतात ह्मणून त्याविषयीं आह्मांस कांहीं सांगवत नाहीं. आणखी रशियन लोक शाहणे असले तर काबुलासारख्या राज्यांत त्यांचा प्रयत्न कांहीं साधेल तरी, पण आमच्या प्रतापि इंग्लिश सरकारच्या राज्यांत छीः! विघ्ननमः!

---

## वऱ्हाड.

**दाणेबाजाराविषयीं**—महागाईमुळें धान्याची फार चणचण झाली आहे. जो तो व्यापारी दुष्काळाचे मुलखांत धान्य पाठवितो येणेंकरून गांवोगांव लोकांस पैसे खर्चूनही धान्य विकत मिळत नाहीं असा फार बोभाटा झाला आहे. व अकोल्यास ही शेकडों खंडी धान्याची नित्य घेवदेव होत

असून पायली, दोन पायली धान्य कोणास विकत घ्यावयाचें तर मिळत नाहीं. या स्थितीमुळें गेल्या शनिवारीं बाजारांत बराच दंगा होण्याचा समय आला होता. पण डिपुटी कमिशनर साहेब व पोलिसची मंडळी यांनीं व्यापाऱ्यांस, व लोकांस चांगली समजूत देऊन गडबड होऊं दिली नाहीं. व व्यापाऱ्यांनीं फुटकळ विक्रीचें दुकान मांडून धान्य न मिळाल्याबद्दल कोणाचा बोभाटा येऊं देऊं नये असें त्यांस सांगितलें.

कित्येक लोकांस वाटतें कीं, यांत व्यापारी लोकांची लबाडी आहे, ते कट करितात व रयतेस फसवितात सबब सरकारानें त्यांची चांगली खोड काढावी. व अमुक दरानें धान्य विका असें त्यांस सांगावें व सक्तीनें त्यांकडून तसें करवावें; पण असें करणें सरकारास योग्य नाहीं या विषयीं आह्मी आपलेच केवळ मत देऊन रहात नाहीं. आपले वऱ्हाडास व साऱ्या हिंदुस्थानास माहित असे नामांकित व विद्वान मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब यांचें या विषयींचें मत आह्मी आपले वाचकांस एथें कळवितों. गेल्या आठवड्यांत ते साताऱ्यास गेले होते तेथें दरबार झाला त्या वेळीं तेथील दुष्काळामुळें. गांजलेल्या लोकांनीं त्यांस इकडील लोक ह्मणतात तशाच मतलबाचा एक अर्ज केला होता व त्यांत दाणेवाल्यांची निर्भर्त्सना करून त्यांजपासून गवरनर साहेबांनीं एक सोयवार दर ठरवून द्यावा; नाहीं पेक्षां सरकारानेंच दाण्याचें दुकान घालून स्वस्तदरानें दाणे विकावे व लोकांस मदत करावी. ह्मणजे फयामिन रिलीफ वर्क्ससाठीं कोट्यावधि रूपये खर्चण्याचीही गरज नाहीं वगैरे मजकूर लिहिला होता. त्यावर गवरनर साहेबांनीं थोडक्यांत उत्तर दिलें तें असें:—

आपण ह्मणता कीं दाणेवाल्यांवर सक्ती करून सरकारानें त्यांस अमुक एक दरानें धान्य विकण्याचा निरख घालून द्यावा. पण असें सरकारास करतां येत नाहीं व असें करण्यापासून चांगला परिणाम होईल असें आपण इच्छितां पण तसा न होतां तो फार वाईट होईल अशी खात्री बाळगा. सरकारानें लोकांचे खासगी व्यापाराचे कामांत हात घातला तर धान्य मुळींच विकावयास येणार नाहीं व हल्लीं आहे त्याहूनही अधिक भयंकर अशी लोकांची स्थिति होईल याविषयीं आपणास कल्पना नाहीं असें दिसतें. सरकार तुह्माला व त्यांनां सोयी करून देईल. ह्मणजे सडका बांधून देईल, रेलवे करून देईल. झालें इतकेंच. लक्षावधि व कोट्यावधि लोकांस धान्य आणून पुरविण्याचें जोखीम सरकाराच्यानें आपणावर घेववत नाहीं. तसें करण्यानें सरकारास असंख्यात खर्च लागेल. तरी सरकार सर्वांस वचन देतें कीं केवढाही भयंकर दुष्काळ पडो, व कितीही धान्य महाग होवो त्याची फिकीर न करितां सरकार आपले सर्व रयतेचे जीव बचावील. अन्न न मिळाल्यामुळें कोणासही मरूं देणार नाहीं. हें सरकारचें व्रत पूर्ण लक्ष्यांत ठेवावें. जे लोक सशक्त असून कामें करण्याजोगे आहेत त्यांकरितां सरकार कामें काढून त्यांस जगवील. जे अशक्त आणि दुबळे असून ज्यांस निर्वाहाचें कांहींच साधन नाहीं तशास सरकार धर्मार्थ अन्न देऊन त्यांचे प्राण वांचवील. आतां या दोन वर्गांत न येतां जे बाकी रहातील त्यांविषयीं सरकारचा निरुपाय आहे!

दुसरी गोष्ट, दाणेवाल्या व्यापाऱ्याविषयीं आपण फार कठोरपणानें लिहिलें आहे याबद्दल आह्मास वाईट वाटतें. अशा प्रसंगीं ते जो अचाट उद्योग करितात व आपलें सर्वस्व धोक्यांत घालून हा धंदा चालवितात याजबद्दल त्यांची तारीफ करून आभार मानणें योग्य आहे. पहा, अगदीच धान्य न मिळण्यापेक्षां रुपयास थोडे शेर तरी मिळावें हें चांगलें नव्हे काय? उत्तर हिंदुस्थानाच्या शेवटाहून ते धान्य विकावयास आणितात. व ते कां आणितात ह्मणून ह्मणाल? तर किंमत चांगली येते ह्मणून. त्यांत पावसानें आखडून धरिलें तर ते धान्यही आंखडून धरितात आणि त्यामुळें अधिकाधिक महागाई होते. ह्मणून या सर्वांचें कारण पाऊस न पडणें अथवा पडणें हें होय आणि तें एक परमेश्वराचे मात्र हातीं आहे.

हे विच्यार किती उत्तम आहेत! खरोखर पहातां दाणेवाल्यांनीं कट करून चालणार नाहीं. पाऊस पडून दर उतरतांत तेव्हां त्यांच्या नुकसानास कोणी जबाबदार होतो असे नाहीं. दुसरी गोष्ट—सरकार लोकांस संकटाचे प्रसंगीं जगवील याविषयींही आतां भ्रांति राहिली नाहीं. पहा मद्रास इलाख्यांत ९९९१६६ लोक रिलीफ कामावर व ८३९०६९ लोक धर्मार्थ अन्न घेऊन जीव जगवीत आहेत व त्या कामीं आजपर्यंत १८१४४९१० रुपये सरकारास खर्च आला. तेव्हां सरकार रयतेचें मायबाप आहे व कितीही महागाई झाली तरी तें रयतेस जगवील याविषयीं सर्वांनीं भरवसा बाळगावा.

---

हैदराबादचे निजाम सरकार वयानें लहान आहेत ह्मणून त्यांची राज्यव्यवस्था पहाण्यांस दिवाण सर सालरजंग साहेब रिजेंट ह्मणजे प्रतिनिधि आहेत. व त्यांस कोरिजेंट ह्मणजे मदतनीस नेमण्याचा विचार आहे त्याविषयीं अशी बातमी उठली आहे कीं ती गोष्ट दिवाण साहेबांस नापसंत आहे व सर्व राज्यसूत्र आपल्या एकट्याच्या हातीं असावें असें ते चहातात. हल्लीं त्या संबंधांत रेसिडेंट साहेब, दिवाण साहेब, व हिंदुस्थान सरकार यांच्या दरम्यान पत्रव्यवहार चालू आहे असेंही वर्तमान आहे.

---

फिर्याद अर्जास जो स्टांप लागतो त्याच्या निमा स्टांप विशेष न्यायाचा आक्ट सन १८७७ चा पहिला यांतील कलम ९ बरहुकूम स्थावर मिळकती ताब्यांत घेण्याकरितां जे फिर्याद अर्ज होतील त्यांस लावीत जावा अशा विषयीं हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा नंबर २१२७ ता० २७ जुलै सन १८७७ इसवीचा झाला आहे.

---

एकादे फौजदारी मुकदम्यांत सरकार तर्फे काम चालविण्याकरितां आडवोकेट जनरल, वकील. अगर दुसरा कोणी यास कांहीं कागदांच्या नकला घेणें अवश्य असलें तर त्याजबद्दल फी पडावयाची नाहीं तसेंच जबान्या व कोर्टाचे ठराव यांच्या नकला सरकार तर्फे अपील चालविण्यासाठीं पोलिस आफिसरास पाहिजे असतील तर त्यांजबद्दल फी पडावयाची नाहीं असा सरकारचा जाहिरनामा नंबर २०४१ तारिख २० जुलै १८७७ इसवीचा झाला आहे.

---

वणीचे सिविल सर्जन मि. पी शायरेट रजेवरून येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

हैदराबाद स्टेटरेलवे जी. आय. पी. रेलवेचे ताब्यांत देण्याचा निजामसरकारचा व त्यांचा ठराव झाला. अक्टोबर महिन्यापासून तशी वहिवाट सुरू होईल. व मि० डेंजरफील्ड साहेब तेथें सुपरइंटेंडिंग इंजिनियर आहेत ते धोंड मनमाड रेलवेकडे जातील असें कळतें.

---

हैदराबादेकडे महगाईचा कहर उसळला आहे. गुलबुर्ग्याच्या स्टेशनाकडे जागोजाग धान्याचीं पोतीं लोक चोरून नेतात. व कित्येक लोक पोटाकरितां बायका मुलेंही विकण्यास तयार झाले आहेत. लोकोपयोगी कामें तिकडे सुरू आहेत पण तीं फार थंड चालतात त्या खात्यावर झिसूर सारखा हुशार मनुष्य नाहीं असें ह्मणतात. येकानदीचा कालवा ६० मैल लांब खोदून नेला तें काम पुरें होत आलें आहे.

---

उमरावतीस गेल्या महिन्यांत म्युनिसिप्यालिटीची जनरल कमिटी भरली होती तिचें प्रोसिडिंग रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिध्ध झालें आहे त्यावरून समजतें कीं मोरी पट्टी ह्मणून तेथें एक कर आहे तो बंद करणार व त्या ऐवजीं दुसरा कांहीं कर बसविणार.

म्युनिसिप्यालिटीच्या सेक्रटरीला २०० रूपये पगार आहे तो १२५ रुपये करावा व कारण पडेल तर वर्षास त्यांत अधिक उणें करावें अशी प्रेसिडेंट साहेबांनीं सूचना केली व खानबहादुर शाबुदीन साहेब यांनीं त्यांस अनुमोदन दिलें आणि पुढचे जनरल कमिटींत या विषयीं ठराव व्हावा असें ठरलें.

धर्मार्थ दवाखान्याचें काम लोकांच्या वर्गणीवर चालावें. तसें येथें नसून हल्लीं त्याचा सर्व खर्च म्युनिसिप्यालिटी देत आहे याजकरितां अशी तजवीज करावी कीं, गरीब लोक खेरीज करून बाकी सर्व लोकांनीं दवाखान्यांतून औषध घेण्याबद्दल कांहीं नियमीत फी देत जावी किंवा दरवेळीं औषध घेत जातील त्याची किंमत द्यावी अथवा दोन्हीं द्यावीं अशाबद्दल कांहीं नियम करावे ह्मणून प्रेसिडेंट साहेबांनीं सूचना केली. व त्यावरून त्याविषयीं विच्यार करून कसा प्रकार असावा याजबद्दल पुढच्या जनरल कमिटीपुढें रिपोर्ट आणला जावा ह्मणून एक सब कमिटी मुकरर केली व तींत तालुका आफिसर, डाक्टर हावर्ड, आणि मि० भिकाजी मेरवानजी यांस मेंबर नेमिलें.

बैलाच्या जोडीच्या कंत्राटदारानें अर्ज केला कीं, महागाईमुळें ८ रुपयांत भागत नाहीं, त्यावरून त्यास तूर्त ९॥ रुपये देण्याचा ठराव केला.

भिस्ती लोकांवर पट्टी आहे व आगीच्या प्रसंगीं त्यांस धरून नेऊन कामास लावितात त्याजबद्दल त्यांनीं अर्ज केला कीं, आमची पट्टी माफ करावी किंवा आगीच्या वेळीं आह्मी जी मेहनत करितो तिजबद्दल आह्मांस पैसा मिळावा. त्याजबद्दल ठराव झाला कीं, त्यापासून पट्टी घेऊ नये.

---

मे० दस्तुर बहिमनजी साहेब खामगावाहून काल एथें आले. गरीब लोकांस स्वस्त दरानें धान्य देण्याच्या फंडांत त्यांनीं २३०० रुपये जमविले असें कळतें.

---

मे० मेन साहेब डिपुटी कमिशनर तालुक्यांत फिरावयास गेले होते ते परत आले. पुन्हा लवकरच जाणार आहेत.

---

**पर्जन्यवृष्टी**—आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, कृपाळु परमेश्वरानें आमच्या प्रांतावर अगदी ऐन बाणीच्या प्रसंगीं पर्जन्यवृष्टि करून सर्व लोकांस आल्हादित केलें. गेल्या पौर्णिमेचें ग्रहण सुटतांच पर्जन्य सुरूं झाला. तो इतका कीं, ग्याटीचे लोक जसा पहारा बदलतात! अथवा राहूनें आपल्या मुखांतूनच जसें कांहीं चंद्रावरोबर पर्जन्यास सोडून द्यावें तसा प्रकार झाला. ज्या मिनिटास ग्रहण सुटलें त्याच मिनिटास पर्जन्याचे पहिले थेंब अले ही मोठी चमत्कारिक गोष्ट होय! यापुढें ह्मणजे शुक्रवार संध्याकाळपर्यंत कांहीं नव्हतें. नंतर अभ्रें वगैरे, येऊन रात्रीं बुरबुर सुरू झाली ती दोन प्रहर रात्रीपुढें बंद झाली. आणि काल शनिवारीं पहाटेपासून पुन्हा पाऊस पडूं लागला तो लहान मोठ्या थेंबानें पांच वाजतपर्यंत होता. मोठ्याशा चळक धारेच्या सरी आल्या नाहींत तरी गटारांतून पाणी बरेंच वाहिलें व हा पाऊस साऱ्या वऱ्हाडांत असावा असें दिसतें. पिण्याच्या पाण्यास जरी नाहीं, तरी मृतास जशी संजीवनी तसा पिकास यापासून अत्यंत उपयोग होईल यांत संशय नाहीं.

गुजरार्थेत २१ वे तारखेस उत्तम पाऊस पडला. व पुण्याहून दक्षिणेस कोल्हापुर धारवाडपर्यंत थोडाच पण पिकास हितावह असा पाऊस आहे असें समजण्यांत आलें आहे. ही मोठी संतोषाची गोष्ट आहे.

---

मि. एच एफ काटग्रेव्ह पोलिस सुपरइंटेंडेंट पुढील महिन्याचे पहिले तारखेपासून एक महिन्याचे हक्काचे रजेवर जाणार आहेत.

---

## वर्तमानसार

---

इटाली देशांत कागद एक प्रकारचे निघाले आहेत. त्यास अगीचें भय नाहीं.

**लढायी संबंधी**— कार्स शहराजवळ रशियन फौजेचा आणखी मोठा पराभव झाला. त्यांचें पायदळ ३५०००, घोडेस्वाराच्या पलटणी १०, व तोफा ११० असून त्यांनीं १८ वे तारखेस अहमद मुख्त्यार पाच्छा याचे हाताखालचे फौजेवर चाल केली. तेव्हां साऱ्या दिवसभर लढायी झाली व तुर्की लोकांचा जय झाला. रशियन मागें हटले व त्यांचे १२०० लोक मेले. टर्कीचे सारे १०० लोक जाया झाले.

शिपका घाटाजवळ तुर्की लोकांनीं रशियावर चाल केली होती पण तेथें रशियाची सरसी होऊन टर्कीचा पराभव झाला.

बलगेरियांत डोब्रुडशा प्रांतात रशियन फौजेमध्यें बराच आजार उत्पन्न झाला आहे.

बगदाद एथील तुर्कस्थानची ३५००० फौज त्यांनीं कानस्टंटिनोपल एथें माघारी बोलाविली आहे.

डॉविसपाच्छा लिहितात कीं, बाटोम एथें नुकतीच लढाई झाली. तींत पराजय म्हणण्यासारखा कोणाचा झाला नाहीं

अबदुल कादर पाच्छा माजी कमांडर इन चीफ आणि रेडिफ पाच्छा लढाईकडील माजी प्रधान यांच्या चौकशीचें कोर्ट मार्शल सुरू झालें आहे.

कासलार एथें लढाई झाली तींतही रशियन फौजेचा पराभव होऊन ती केसरोवा एथें परतली. तींतील ५०० लोक मेले व जखमी झाले.

रशियाच्या बादशहानें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं, फौजेंतील चाकरी सोडून हल्लीं जे लोक घरीं आहेत व ज्यांस शस्त्र परजण्याचें सामर्थ्य आहे त्या सर्व रशिया देशांतील लोकांनीं लवकर येऊन फौजेंत भरती व्हावें.

रशियाचा इंपेरियल गार्ड लढाईच्या जागीं आणण्या करितां एक सेनाधिकारी सेंटपिटर्सबुर्घ एथें गेला आहे.

पोटीचें ठाणें रशियन लोकांनीं सोडून दिलें.

सिर्कासीयन लोक तुर्कस्थानांत अधिकाधिक येत आहेत.

---

पार्लमेंटसभा बरखास्त झाली त्याप्रसंगीं चक्रवर्तिनी साहेबांनीं भाषण केलें त्यांत टर्कीरशियन लढाईविषयीं व हिंदुस्थानांतील दुष्काळाविषयीं दुःख दाखविलें.

लंडनशहरांत मद्रासच्या दुष्काळास मदत व्हावी म्हणून तेथील मेयर झटून तजवीज करीत आहेत. त्यावरून तिकडून चांगलें सहाय मिळेल अशी उमेद आहे.

आफ्रिकाखंडांतील नीळ नदीला मोठें पुर येउन त्यांवर पीक होत असतें. तसे पूर यंदा अजून आले नाहींत असें कळतें.

लंकेकडेही धान्याविषयीं हकाटी आहे तिकडील लोकांनीं बंगाल वगैरेकडून तांदूळ मागविले आहेत.

पुण्यास गवरनरसाहेबांनीं कलाकौशल्याचें प्रदर्शन २१वे तारखेस सुरू केलें.

मद्रास भागाच्या रेलवेकडे सामान कमी असल्यामुळें धान्याचा पुरवठा होतनाही असें पाहून हिंदुस्थान सरकारानें उत्तर हिंदुस्थानांतील रेलवेकडून १२ इंजिनें व शें दीडशें व्यागन्स तिकडे पाठविल्या. व जलमार्गानें बंगाला व ब्रह्मदेश ईकडून धन्य पाठविण्याची तजवीज चालविली आहे

काटेवाडांत राजकोटचें प्रदर्शन १५ वे तारखेस सुरू झालें.

सिमल्यास १५ वे तारखेस पांच तास पाऊस पडला.

सर डब्ल्यू मीरवेदर सिंधचे कमिशनर पुढील महिन्याच्या ११ वे तारखेस विलायतेस जाण्याकरितां तेथून निघतील.

मद्रासेकडील निगापट्टणचे माजिस्त्रेट ज्यानीं संन्याशाचें प्रेत उकरून काढण्याचें महत्कृत्य करून प्रसिद्धी मिळविली व सरकारांतून टपका मिळाला तेव्हां रजा घेऊन विलायतची वाट धरली ते मि. वेल्ड साहेब आपले नोकरीवर रुजू होण्याकरितां इकडे परत आले आहेत.

मुंबईत ट्रामवेंतून जात असतां एका युरोपियन स्त्रीनें एका पारशाला मारिलें त्याजबद्दल त्यानें पोलिस माजिस्त्रेटाकडे फिर्याद केल्यावरून त्या स्त्रीला १५ रुपये दंड झाला.

बंगाल्याकडून जलमार्गानें ९०००० टन धान्य मद्रासेस जाण्यास निघालें आहे.

---

## मुक्याचा जाण कोणी नाहीं म्हणून आपणास झालेलं दुःख आपणच प्रसिद्ध केलं पाहिजे.

आमच्या देशांतील धर्माबाबदच्या समजुतींच्यायोगें लोकांवर व देशावर चमत्कारिक परिणाम झाला आहे. यद्यपि आमच्या धर्मामध्यें कर्ममार्ग सांगितला आहे व प्रत्येक गोष्ट धर्म म्हणून केली जाते; तथापि सर्व कर्मांचा व धर्माचा परिणाम निदान ऐहिक व्यवहार संबंधानें तरी निराशा व शिथिलता हीं उत्पन्न करितो. लोकांचा सर्व हवाला दैवावर आणि पूर्वकर्मावर असतो आणि स्वतां करावा तसा सतत उद्योग व खटपट ते करीत नाहींत. आतां हा प्रकार, असेल त्या स्थितीमध्यें एका अर्थी संतोष व समाधान वाटण्यास, फार उपयोगीं पडतो हें खरें; परंतु लोकांच्या अंगामध्यें या समाधानवृत्तीचें बीज रुजलें म्हणजे आळस प्रधान होऊन जगामध्यें ऐहिक व पारलौकिक हितसाधनाच्या कामीं औदासिन्य उत्पन्न होतें व लोकांचा व देशाचा उत्कर्ष होण्याचा मार्गच बंद होतो. या जगाचा हा मोठा नियम आहे कीं, मुक्याचा जाण कोणीच नाहीं. फार तर काय परंतु मुलास भूक लागली असतां तें जर रडत नाहीं तर त्याचे आईस देखील त्याला भरविण्याचें होत नाहीं. मग याच्या पुढें काय पाहिजे? सारांश स्वतः जे बोलत नाहींत व उद्योग करीत नाहींत त्यांस दुसरे त्याचा गुण किंवा गरज जाणून कधीं सहय करीत नाहींत. उद्योगावांचून दैव पंगु आहे असें जरी सर्वलोक बोलतात तरी त्याप्रमाणें त्यांची वागणूक होत नाहीं. औदासिन्य व दैववादी ग्रह यांनीं आमच्या लोकांस जंगाप्रमाणें सर्वथैव खाऊन टाकलें आहे याजमुळें कोणत्याही प्रकारचीं संकटें आलीं असतां ते निमूटपणें कल्पनेनें ईश्वरेच्छा प्रधान मानून सहन करितात, आमच्या देशांतील लोकांच्या सहनशीलताविषयीं, आज्ञाधारकपणाविषयीं व परमेश्वर व सरकार यांच्या इच्छेवर निमूटपणें अवलंबून राहण्याविषयीं या दुष्काळाच्या प्रसंगीं पराकाष्टा झाली. घरांत खावयास अन्न नाहीं, बाहेर जावयास जागा नाहीं, देशांत मदत करावयास कोणी समर्थ किंवा तयार नाहीं, सरकारानें व्यवस्था केली ती पुरती नाहीं, याजमुळें हजारों जनावेंर व मनुष्यें मेलीं व अन्नवस्त्राच्या कमताईमुळें अनंत लोक मरणाच्या पंथास लागले तथापि दांडगाई, गैरकायदा वर्तन, अथवा विशेष ओरड देखील त्यांनीं केली नाहीं. तोच दुसऱ्या देशांचा प्रकार पाहिला तर अगदीं भिन्न आहे असें दिसून येतें. आमच्यायेथें रेलवेस्टेशनांवरून धान्याच्या पोत्यांचे डोंगर पडलेले असतां लोकांनीं कधीं त्यांस हात लावला नाहीं व सरकारानें मजुरीचे दर एकंदर कमी केले होते तरी लोकांनीं गडबड केली नाहीं. इंग्लंडांत किंवा इतर देशांत असें कधींही झालें नसतें. आतां सध्या अमेरिकेंत नुकताच असा एक चमत्कारिक घोटाळा झाला आहे. त्या प्रदेशांततील रेलवेवरील मजूर वगैरे लोकांचे मजुरीचे दर कमी केले त्याजमुळें त्या लोकांनीं एकंदर गडबड करून सोडली. तेथील ठिकठिकाणची पोलिससारखी मिलिशिआ फौज इनें बंदोबस्त करण्याकरितां प्रयत्न केला; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलटी त्यांणीं तिशीच मारहाण केली. कितीएक लोक या साधारण दंग्यांत मारले गेले व जखमी झाले. दंगा पसरत चालला सबब तेथील सरकारास जागोजागची फौज जमा करणें प्राप्त झालें आहे, यावरून लोकांच्या मनाची स्थिति कशी आहे! यांत कांहीं लोकांचें नुकसान तर होईलच; परंतु या त्यांच्या वर्तणुकेवरून त्यांस कांहीं तरी विशेष त्रास झाला असावा असें सर्वांस वाटून त्यांची दाद लागून कांहीं तरी नीट व्यवस्था होईल यांत संशय नाहीं.

आतां हा प्रकार योग्य व चांगला आहे असें तर बिलकुल नाहींच; परंतु ते लोक आमच्या लोकांसारिखे निमूटपणें आपलीं दुःखें सोशीत बसले असते तर त्यांची दाद कोणी घेतली नसती कारण मुक्याचा जाण कोणीच नाहीं. यावरून आमच्या लोकांनीं दांडगाई किंवा दंगा करावा असें सर्वथैव आमचें म्हणणें नाहीं आणि तो प्रकार करण्याची आमच्या लोकास गरजही नाहीं. आमचें सरकार दयाळु आहे आणि कायदेशीर रितीनें सर्व लोकांनीं मिळून दाद मागितल्यास ती मिळेल यांत संशय नाहीं, परंतु अशा प्रकारें दाद न मागतां आम्ही मरेपर्यंत देखील हालचाल करीत नाहीं ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. मेंढरें देखील मरायाच्या वेळेस ओरडतात व हातपाय आपटतात; परंतु आमच्या देशांतील लोकांच्यानें ओरडवतही नाहीं, तर त्यांची दाद कोण कशी घेईल हें समजत नाहीं. त्यांनीं कायदेशीर रितीनें व एकोप्यानें नेहमीं आपल्या अडचणी जगास व सरकारास कळविण्यास तयार असलें पाहिजे- पोकळ दैवावर भरवसा ठेऊन कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.

सु. प.

---

## नोटिसा

चौथमल सोवनाथ मारवाडी रहाणार अकोली तालुके अकोट यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आमचा सवदा ज्वारी १९८१।चा असा केला कीं ही ज्वारी मोजून देऊ. यावरून आम्ही तुम्हास रुपये दर खंडीस १६ प्रमाणें रुपये ३०५ दिले असतां तुम्ही ज्वारी मोजून दिली नाहीं सबब तुमचेवर आम्ही ज्वारीचे किमतीबद्दल फिर्याद दाखल केली आहे याजकरितां ही नोटिस देण्यांत येते कीं सदरील पेवाबाहेर काढून टाकलेली ज्वारी तुम्ही आपले स्वाधीन करून घ्यावी असें नोटिस पावल्या पासून च्यार दिवसांत न केल्यास अकोला यथील त्रयस्थ मनुष्याचे जिमेस सदरील ज्वारी करून देण्यांत येईल. व त्याबदल जें भाडें पडेल तेंही फिर्यादीचे रकमे सिवाय तुमचेकडून घेण्यांत येईल आणि ज्वारी चोरीस गेली अगर दुसरे कांहीं नुकसान झालें तर आम्ही जबाबदार नाहीं कळावें तारीख २१ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

[ सही ]चुणीलाल सिवचंदराय वहिवाटदार रामजस प्रसादिराम राहणार अकोट दस्तुर खुद.

---

नोटिस.

सदाराम सालिगराम साहू वहिवाटदार सांगीदास दुकान मालेगाव तालुके अकोट यास रामलाल नथमल दुकान मालेगाव याजकडून नोटिस देण्यात येतें कीं, तुम्हाकडून ज्वारी खंडी २३॥४ मालेगाव पायलीची घेणें आहे ती शिवागास गणेशदास भिवराज याचे कोठ्यांत भाड्यानें तुम्ही ठेवलेली त्याचें माप तुम्हाकडून घेण्याचें तो माल हल्लीं आम्ही बंकुलाल जुलाखीदास साहू मालेगावकर याला श्रावण शुद्ध ६ रोजी फरोक्त केला आहे करितां या नोटिसीनें कळवितो कीं सदर्हू माल बंकुलालजी याला तुम्ही बिलकुल उजूर न करितां मोजून देऊन तुमची रकम ७११ आम्हाकडेस आहेती शेकडा एक रुपयाप्रमाणें व्याजासहित रकम हिसेबानें होईल ती. शिवाय ज्या कोठ्यांत माल आमचा तुम्ही ठेवून राखला आहे त्याचें भाडें वाजवी याजपासून घ्यावें याजबद्दल तुम्हाकडून तक्रार झाल्यास बंकुलालचें नुकसान होऊन त्यानें फिर्याद केल्यास त्याचा जबाबदार मी नाहीं. तुम्ही आमची ज्वारी मोजून देऊन रकम घ्यावी. कळावें तारीख १८ आगष्ट सन १८७७ इसवी.

( सही ) रामलाल नथु मारवाडी दस्तुर खुद

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.